म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १४८९



REFBK-0013123

# ाझं विश्व

श्यामकांत गोखले

३५६८२
निबंध
३०.११.८३.

[illegible] ग्र. ठा. [illegible] स्थळप्रत
अनुक्रम ३५६८२ वि: निबंध
[illegible] नों दि: ३०।११।८३

# माझं विश्व

REFBK-0013123

शामकान्त गोखले

रा म कृ ष्ण बु क डे पो


गि र गां व, मुं ब ई ४.

प्रकाशक :
**वि. रा. बाम**
रामकृष्ण बुक डेपो
मुंबई ४.

प्रथमावृत्ती १९६३

**मूल्य तीन रुपये**

मुद्रक :
**चिंतामण वामन जोशी**
माधव प्रिंटिंग प्रेस
अलिबाग–कुलाबा.



"माझं विश्व" हा माझा पहिलाच ललित निबंध संग्रह. ह्या संग्रहांतील निबंधांचे विषय अगदी साधे, रोजच्या व्यवहारातले असेच आहेत.

माझ्या विश्वाची पार्श्वभूमी अशी, उगाच कुणाला पटकन् वाईट म्हणणं किंवा कृतीला चूक म्हणून शेरा देणं माझ्या प्रकृतीला मानवत नाहीं, फारसं कारण नसतांना उगाच कुणाचं तरी अवास्तव कौतुक करणं माझ्या वृत्तीला पटत नाहीं नि जीवनाकडे बघण्याचा अश्रद्ध दृष्टिकोन मला खपत नाहीं. जगांतील सगळीं संकटें आपल्यावरच पडलीं आहेत असा चेहरा करून वावरणाऱ्या बरोबर माझा प्रवास नाहीं कीं ढोंगांचें पांघरूण घेऊन मिरविणाऱ्याशीं माझी संगत नाहीं. जीवनांतील शाश्वत मूल्यांचा मला आदर आहे, माणसाच्या चांगुलपणावर माझा विश्वास आहे आणि सामान्य गोष्टीबद्दल विचार करण्याची मनाला संवय लागली आहे. माझ्या ललित निबंधांचा उगम इथेंच आणि म्हणूनच माझ्या विश्वाचा व्यापहि बेताचा. उपदेशाचा त्यांत आंव आणलेला नाहीं नि माझंच खरं ही भावनाहि नाहीं. आहेत ते माझे स्वतःचे कांहीं विचार.

महाराष्ट्रांतील लोकप्रिय मासिकांतून प्रसिद्ध झालेल्या ह्या ललित निबंधाबद्दल सिद्धहस्त लेखकांनी चांगले अभिप्राय दिले. कांहीं अपरिचित वाचकांचेहि सूर जमलेले दिसले नि म्हणूनच हा संग्रह प्रसिद्ध करण्याचा प्रपंच.

रामकृष्ण बुक डेपोचे माझे मित्र श्री. वि. र. बाम ह्यांनी हा संग्रह प्रसिद्ध करण्याची जबाबदारी स्वीकारली ह्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. तसेंच माझे ज्येष्ठ मित्र श्री. बापूसाहेब काटदरे ह्यांनी माझ्याकडून पुष्कळसे निबंध लिहून घेतले त्याबद्दल त्यांचेही प्रेमपूर्वक आभार.

नवी दिल्ली<br>नोव्हेंबर १९६२

—श्यामकांत गोखले

## अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | बिन तारखेचं पत्र | ५ |
| २ | कांहीं सूर कांहीं बदसूर | ११ |
| ३ | नेंमेचि येतो मग पावसाळा | १७ |
| ४ | आशावाद | २१ |
| ५ | अखेर न्याय मिळाला | २७ |
| ६ | नावांतच सारं कांहीं आहे | ३३ |
| ७ | आरसा | ३८ |
| ८ | स्मृति | ४४ |
| ९ | रिकामी खुर्ची | ५० |
| १० | पाट्या आणि पाट्या | ५७ |
| ११ | भरलेलें बाळ | ७१ |
| १२ | न सुटलेले प्रश्न | ७७ |
| १३ | अतिरेक | ७७ |
| १४ | शोकांतिका | ८३ |
| १५ | पुष्कळदां असं वाटतं | ८९ |
| १६ | मागील रांगेंत उभे | ९४ |
| १७ | वत्सा ! वर माग | ९९ |
| १८ | छंद | १०५ |
| १९ | कंटाळा | ११३ |
| २० | कुर्यात सदा मंगलम् | १२० |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३५६०२ वि: निबंध
क्रमांक ... नों: दि: २०/११/६७
93923

१

# बिन तारखेचं पत्र

मला आलेलें तें पत्र माझ्यानें पुढें वाचवेचना. माझ्या परिचयांतील एका वयस्कर व्यक्तीला कांहीं महत्त्वाची माहिती हवी होती. ती माहिती मिळवणं सुद्धां जरा कठीणच होतं पण तरीसुद्धां त्यांना ती 'उलट टपालीं' हवी होती. सदर गृहस्थ वडिलांचे स्नेही असल्यानें नि माझ्या निमित्तानें, नव्या पिढीबद्दल त्यांचें मत सरसकट वाईट होऊं नये ह्या सदूहेतूनें मी ती माहिती ताबडतोब धाडली होती, नि बऱ्याच दिवसांनंतर त्या गृहस्थांनीं धाडलेलं तें पत्र होतं. खरं म्हणजे तितक्याच तातडीनें मला ते शाबासकीचें पत्र धाडतील नि त्यांत 'लहानपणापासूनच तूं हुषार दिसत होतास आणि तसं मी तुझ्या वडलांना किती वेळां बोलून दाखवलंहि होतं. एकंदर तुझी प्रगती पाहून बरं वाटलं.' अशा चालीचं एखादं वाक्य असेल असं मला वाटलं होतं. पण आलेल्या पत्राची सुरवात 'तुझें बिनतारखेचं पत्र मिळालं.' अशी होती नि त्यामुळें माझ्यानें पुढचें पत्र वाचवेचना.

त्या वाक्यामुळें इतिहासाच्या तासांत छत्रपती शिवाजी महाराजांची जन्मतारीख जुनी व नव्या शोधाप्रमाणें मान्य झालेली न सांगतां आल्यामुळें दिपोटीसमोर मुलाला बाकावर उभं करणाऱ्या शालेय

युगांतील राकट मास्तराची आठवण झाली. एकदां वाटलं लिहावं त्या गृहस्थाला कीं पत्राची तारीख माहित असणं इतकं महत्त्वाचं होतं तर पोस्टाचा स्टॅम्प बघायचा होता म्हणजे कळली असती. माझ्या-सारख्या माणसाला ह्याबाबतींत मदत करायला सरकारचं सबंध पोस्टखातं तयार असतांना माझ्या पत्रांतील त्या मानानं किरकोळ उणीवेला इतकं महत्त्व देण्याची जरूर काय? एकदां वाटलं कीं लिहावं सरळ; 'तें पत्र अमक्या अमक्या तारखेला, अमक्या वेळेला [स्टॅ. टा. प्रमाणें], अमक्या स्थळीं म्हणजे पोस्टांतूनच तिथला टाक नेहेमीप्रमाणचें लिहावयाच्या दृष्टीनें उपयोगी नसल्यानें पोस्टांत आलेल्या एका तिऱ्हाइताकडून (नांव माहित नाहीं) त्याचा फाउन्टनपेन्—दिसायला पार्करसारखा पण बहुधा जपानी असावा— घेऊन लिहिलं आहे. पण पुन्हा वडिलकीचा मान त्यांचा असल्यानें अजूनहि मी त्या सद्गृहस्थांना पत्र धाडलेलं नाहीं.

तसं म्हणावं तर त्या पत्राचा अगदींच फायदा झाला नाहीं असं नाहीं. केव्हांहि आतां मी पत्र लिहितो तेव्हां माझा हात नेहमीच्या संस्कृतीला डावलून श्रीकाराच्या आधींच तारीख लिहितो. पुष्कळदां तर असं वाटतं कीं श्रीकारच काय पण पत्ता लिहायचा सुद्धां विसरेन पण पत्रावरची तारीख विसरणंच शक्य नाहीं.

मला वाटतं, एका रांगोळी काढणाऱ्या व्यक्तीला पाहून अगदीं साध्या विषयांतून फार मोठा आशय काढणाऱ्या कवीची जर 'बिनतारखेचं पत्र मिळालं' अशी रसीद धाडणाऱ्या गृहस्थाशीं गांठ पडली असती तर त्यानं रांगोळीची उजवीकडची रेघ तरी वाकडी असल्याचं दाखवून दिलं असतं किंवा ठिपके कुठल्या ओळींत मोजायला चुकले आहेत तें दाखवून दिलं असतं. पुष्कळदां, कुठल्या गोष्टीला किती महत्त्व द्यावयाचं हें माहीत नसल्यामुळंच असला रुक्ष अनुभव

येतो आणि बहुधा ह्यामुळंच शिक्षकावर प्रेम करणाऱ्या तरुणीची किती केविलवाणी स्थिती त्या प्रसंगीं झाली असेल ह्याची मला नेहमी जाणीव होते. संत्रयीचा परिणामच म्हणून कीं काय, शिक्षकाला तिनें धाडलेल्या प्रेमपत्राचें उत्तर, परीक्षेचा पेपर तपासल्याच्या थाटांत लिहिलें होतें. "तुझ्या पत्रांत 'प्रिय' शद्बांतील 'प्रि' तूं ऱ्हस्व ऐवजी दीर्घ लिहिली होतीस" हें पत्र वाचून त्या तरुणीला खचितच वाटलं असेल कीं तिच्या प्रेमाचा रंग किती गडद आहे हें पाहाण्याऐवजीं तिचा प्रियकर तिच्या प्रेमपत्राचा तिमाही पेपर करून तपासतो आहे. भावना किती उत्कट आहे हें जाणून घेण्याऐवजीं 'शुद्ध कसें बोलावें नि शुद्ध कसें लिहावें' ह्याचा धडा शिकवतो आहे; सहजीवनाच्या इच्छेनें लिहिलेल्या पत्रांत एक चतुर्थांश मार्जिन सोडलेलं आहे कीं नाहीं हें पाहतो आहे नि मीपणाच्या अपेक्षेनें लिहिलेल्या मनीच्या संदेशाला गणमात्रांचं रुक्ष कोष्टक लावतो आहे. एखादा कवी असता तर म्हणाला असता प्रिय शद्बांत व्याकरणदृष्ट्या प्रि ऱ्हस्व असली तरी आपुलकीच्या नियमांत दीर्घच नव्हे तर प्रदीर्घ, अतिदीर्घच हवी पण फळापेक्षां सालाकडेच लक्ष देणाऱ्या व्यक्ती असल्या म्हणजे त्याला कोण काय करणार?

एकदां एका हुषार मुलानें गणित विषयांत सत्याऐशीं मार्क मिळाल्याचें वडिलांना सांगितलें नि मोठ्या कौतुकानें पेपर दाखवतांच 'बाकीचे तेरा मार्क कुठें गेले?' म्हणून बिचाऱ्या मुलाच्या थोबाडींत ठेवून दिल्याची हकीगत असल्याच सदरांत मोडण्यासारखी आहे. केवळ अज्ञानापेक्षां फाजील निरीक्षणाला नि त्यावर आधारलेल्या टीकेला बळी पडणारे हे सारे लोक 'बिनतारखेचं' पत्र मिळाल्याची ग्वाही देणाऱ्या गृहस्थाच्या जातींतील आहेत. द्रोणाचार्यांच्या तालमींत तयार झालेल्या सबंध पक्षाऐवजीं पक्षाचा लक्ष्य ठरलेला डोळा तेवढाच दिसणाऱ्या

अर्जुनाप्रमाणें ह्या जातींतल्या लोकांना नेमकं न्यून तेवढंच दिसतं. जणूं तेंच त्यांच्यां आयुष्यांतलं महत्त्वाचं लक्ष्य असतं. त्या प्रवाहांत ते इतके वाहवून जातात कीं त्यांना विचारलेल्या प्रश्नाला किंवा लिहिलेल्या पत्राला पुष्कळदां हास्याचं नि कांहीं वेळां चिडीचं स्वरूप प्राप्त होतं.

माझ्या एका मित्रानें आपल्या परदेशच्या दौऱ्यावर असतांना 'मी युरोपांत काय पाहिलें' अशा चालीच्या लेखाला पुरून उरतील इतके लंडन, पॅरिस इ. शहरांतील प्रसिद्ध स्थळांचे ठिकाणीं स्वतःचे मुद्दाम काढवून घेतलेले फोटो घरीं धाडले. भूगोलांत काय, कोठें व कशाकरितां प्रसिद्ध आहे ह्या माहितींत वाचलेल्या किंवा इंग्रजी चित्रपटांत सहज चुकून दृष्टीस पडणाऱ्या जगन्मान्य स्थळीं आपला मुलगा प्रत्यक्ष हिंडून आला आणि हा पहा त्याचा थेट तिथला फोटो अशा थाटांत आपले वडील घरीं येणाऱ्याजाणाऱ्याला दाखवितील ही सातसमुद्रापलीकडे असलेल्या माझ्या मित्राची अपेक्षा असली तर त्याला कोण दोष देईल. पण त्याला पत्र गेलं होतं तें मोठं मौजेचं होतं. "कशाला इतके फोटो धाडतोस. लहानपणापासून तुला आम्हीं पाहतों आहोंत तेव्हां सहा महिने आमच्यापासून दूर गेलास म्हणून विसरणार आहोंत कीं काय तुला? इ." त्यानंतर बहुधा माझ्या मित्रानें साधीं कार्डंच धाडलीं असतील आणि तींहि कृतानेक साष्टांग नमस्काराच्या सुरवातीनं नि सदैव आज्ञाधारकपणाच्या शेवटानं."

अत्यंत तयार गळ्याच्या एका गायकाच्या ठुमरी गायनाचा मनसोक्त आनंद लुटल्यावर घरीं परत येत असतांना एका संवादामुळें असाच धक्का बसला होता मला. त्या गायकाच्या लठ्ठ शरिराबद्दल नि गालावरच्या गळवाबद्दल ते लोक बोलत होते. संगीताच्या प्रांतांतले हे औरंगजेब सभागृहाची जागा अडवायला येतात तरी कशाला असें मला वाटलें. प्रियकराच्या विरहामुळें "नैन निंद न आये" म्हणणाऱ्या,

नि शद्वशः त्या विरहिणीचं चित्र उभं करणाऱ्या, ‘पिया गयें परदेस’ हे आळवून त्या विरहाची वाढती आग भासविणाऱ्या नि ‘आयेना बालम क्या करू सजनी’ ची प्रेमविव्हल अगतिकता गोड गळ्यांतून काढणाऱ्या कलावंताऐवजीं त्यांना दिसला तो त्याचा बटबटीतपणा, त्याचं गळूं नि त्याला बसायला लागणाऱ्या जागेचं चौरस क्षेत्रफळ. त्यानं निर्माण केलेला सूरश्रृंगार बिचाऱ्यांच्या ‘कानीं’ ही नव्हता. असले अरसिक कोकिळेचा रंग पाहून नाक मुरडतील, राजहंसाच्या चोचीला थोडी लांब म्हणून नांव ठेवतील आणि कदाचित् गुलाबाच्या फुलाऐवजीं त्याचे काटे त्यांना दिसतील नि बोचतील.

मला नेहमीं वाटतं कीं असल्या मानसिक बांधणीचे नि वैचारिक ठेवणीचे लोक विवाहासारख्या मंगलप्रसंगीं सुद्धां, दारावरच्या तोरणाचे सोनेरी कागद डकवलेले नारळ लहान आकाराचे होते आणि पाण्याचे नसतीलच असा अंदाज बांधतील, ‘अमक्याचा सुत नि अमक्याची सुता’ एवढ्याच भांडवलावर कोणातरी जवळच्या नातेवाईकानं रचलेली नि तीन वेगळ्या वयाच्या नि बहुधा वेगळ्या सुरांच्या बहिणींनी हातांत कागद घेऊन म्हटलेल्या मंगलाष्टकांत प्रेमाचा आढळ होण्याऐवजीं, वृत्त शार्दूलविक्रीडीत असूनहि एकोणीसापेक्षां जास्त अक्षरं होतीं अशी तक्रार करतील, नवऱ्या मुलीपेक्षां जास्त नटलेल्या करवलीच्या हातांतल्या चकचकीत घटावरचे ओरखडे त्यांना दिसतील, साजुक तुपांतहि मोठ्या कणीची अपेक्षा करतील नि दक्षणेचा पैसा चकचकीत हवा होता असं भरल्या पोटीं म्हणतील. ही सारी तऱ्हा आमच्या वयस्कर गृहस्थाच्या ‘बिनतारखेच्या पत्रांत’ जमा होण्यासारखी नाहीं का?

तपशीलाकडे इतकं बारीक लक्ष देणाऱ्या लोकांच्याबद्दल आदर असावा पण असल्या तपशीलांत शिरून विचारलेला प्रश्न किंवा दिलेला शेरा खरा असला तरी प्रसंगोचित आहे का हा विचार मला वाटतं

रोजच्या व्यवहारांत जास्त महत्त्वाच ठरावा. प्रसिद्ध आंग्ल राजकारणी-व्यक्तीची अशा संदर्भांतली एक क मोठी मनोरंजक आहे. लांबवरच्या प्रवासांत असतांना त्याच्या बरोबरच्या व्यक्तीनं धावत्या गाडींतून दिसणारा एक मेंढरांचा कळप दाखविला नि सहजच त्या मेंढरांची लोकर काढलेली असल्याचें सांगितलें. लोकसभा नि विधानसभांच्या प्रांगणांत जपून बोलायच्या सवयीमुळं म्हणा किंवा इतर कारणांमुळें त्या मुत्सद्यानें 'मेंढरांची आपल्याला दिसणाऱ्या भागाची लोकर बहुधा काढलेली दिसते असें उत्तर दिलें. नुसतं 'हो' म्हणून चालण्यासारख्या प्रश्नाला सबंध मेंढरांची लोकर काढलीच असेल कशावरून? आपल्याला धांवत्या गाडींतून जेवढा भाग दिसतो आहे त्याचीच आणि ती सुद्धा 'बहुधा' काढली असेल असल्या आशयाची मल्लीनाथीहि बिनतारखेष्टिच्या पत्राच्या दृष्टिकोनांतच बसणारी असते.

स्वतःचा जीव धोक्यांत घालून बुडत असलेल्या मुलाला वाचवल्यानंतर नि मोठ्या अभिमानानें मुलाच्या पालकासमोर सारी हकीकत सांगितल्यानंतर, "तें सगळं ठीक झालं पण मुलाची टोपी कुठं आहे?" हें विचारणारा पालक, तो गाडींतला मुत्सद्दी, तोरणाचे नारळ लहान म्हणणारा नि करवलीच्या हातांतल्या घटावरचे ओरखडे बघणारा वऱ्हाडी, गायकाच्या लठ्ठ शरिराला हंसणारा अरसिक, प्रेमपत्रांतील 'प्रि' ऱ्हस्व कीं दीर्घ ह्यावर भाष्य करणारा शाळामास्तर, लहानपणापासून तुला बघतोय, वरचेवर फोटो कशाला धाडतोस म्हणणारा पालक हे सारे माझ्या वडिलांच्या स्नेह्याचे 'तुझें बिनतारखेचें पत्र मिळालें' असें लिहिणाऱ्याचे फार जवळचे नातेवाइक असावेत हेंच खरं!

•••

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३५६८२ वि: १०८०५४
क्रमांक १४५७० नों: दि: ३०।११।६७

२

# कांही सूर कांही बदसूर

सौंदर्याची व्याख्या कठीण नव्हे अशक्य आहे, असें एक इंग्रजी सुभाषित आहे; पण मला वाटतें, त्याहिपेक्षा जीवनाला हें सुभाषित जास्त प्रमाणांत लागू पडेल.

जीवनाच्या कितीतरी निरनिराळ्या व्याख्या आपण वाचतों. कोणी 'जीवन महासागर आहे' म्हणून लाटांची खळबळ आपल्या कानापर्यंत पोचवितो, तर कोणी 'जीवन हें युद्ध आहे' म्हणून चिलखत घालायला सुचवितो; 'जीवन हें नृत्य आहे' म्हणून एकजण पायांत चाळ बांधायला सांगतो, तर दुसरा कोणी 'जीवन म्हणजे तारेवरची सर्कस आहे' म्हणून बँडच्या संथ लयीच्या पार्श्वसंगीतांत घट्ट फ्रॉक आणि लांडी चड्डी घालून, हातांत छत्री घेऊन, तोल संभाळत चालणाऱ्या सर्कस-युवतीचें चित्र पुढें करतो!

'जीवन म्हणजे स्वप्न नव्हे' हें आपणांस जागेपणीं एखादा तत्त्वज्ञानी सांगतो, तर दुसरा हें स्वप्न आहे, हा बुडबुडा आहे. ही सारी माया आहे असें न कळणारें तत्त्वज्ञान गुणगुणतो. जीवन म्हणजे एक परिकथा आहे असें हॅन्स ॲन्डरसन सांगतो,

तर 'मूर्खानें सांगितलेली नि कुठलाहि संबंध नसलेल्या घटनांची मालिका असणारी गोष्ट' असें म्हणून आपल्या जीवनाचें निकृष्ट 'साहित्य' करून टाकतो. कोणी 'कोणीकडून कोणीकडे ?' असल्या न सुटणाऱ्या प्रश्नांची पत्रिका आपल्यापुढे टाकतो.

'जीवन हें क्रिकेटच्या खेळासारखें आहे; त्यांतला प्रत्येक चेंडू जपून खेळला पाहिजे' अशी शिकवण एखादा लघुनिबंधकार ह्या क्रिकेट खेळाच्या ढांसळत्या काळांत देतो; तर एखादा निराशावादी 'कृतकर्मांचीं फळें भोगण्याचें नांव जीवन' असा गेल्या जन्मापर्यंतच्या धाग्यादोऱ्याचें बिंडोळं फेकून आपल्याला स्वस्थ बसायला सांगतो.

शेक्सपीयरसारखा थोर नाटककार व त्याहूनहि थोर मानसशास्त्रज्ञ जगाला रंगभूमि म्हणून आपल्या जीवनाची नाटकमंडळी करून टाकतो. एखादा लेखक सुखदुःखाच्या अनुभवांचें विणलेलें वस्त्र असें म्हणून साहित्यांतहि हातमागाचें महत्त्व पटवून देतो, तर आणखी एखादा 'हास्य आणि अश्रूंचें अभेद्य मिश्रण' असें म्हणून चिंचोळ्या ग्लासमधून तीन वेळां मोजून बाटलींत औषध ओतणाऱ्या कंपाऊंडराची आठवण करून देतो.

एखादा विचारवंत मानवी जीवित हा एक बाजार आहे, येथें किंमत दिल्याशिवाय कांहीं मिळत नाहीं. असें म्हणून आपल्याला स्वतःच्या किंमतीचें मूल्यमापन करायला लावतो.

ह्या आणि अशा कितीतरी व्याख्या मीं वाचल्या; पण फारशा पटल्या नाहींत मला ! खरें म्हणजे उघड्या डोळ्याने जगूनसुद्धां कोडें वाटणारें आपलें जीवन लहानश्या व्याख्येंत कसें बसवितां येणार ? आणि तरीहि मला 'जीवन हें एक संगीत आहे' ही व्याख्या मात्र आवडते.

ही व्याख्या सर्व दृष्टींनी परिपूर्ण आहे म्हणून नव्हे; कदाचित् संगीताची आवड म्हणून ही व्याख्या जास्त आवडली असावी. पु. ल. देशपांड्यांच्या 'तुझें आहे तुजपाशीं' मधील काकाजींच्या विचाराची सुरवटसुद्धा 'जीवन हें एक संगीत आहे' ह्याच थाटाची आहे, आणि म्हणूनच आचार्यांच्या आत्मनिरीक्षणाच्या वेळीं "जीवनाचे तंबोरे काय मस्त जुळून राहिले आहेत!" असें चांगला सुरेल लागलेला तंबोरा छेडल्यासारखें तें वाक्य वाटतें. मला वाटतें, आयुष्यांत दुःखाचें, असमाधानाचे, अश्रूंचे, सुडाचे, भांडणांचे कारुण्याचे–सारे बदसूर ऐकू येतात ते न पेलणाऱ्या पट्टींत गायल्यामुळेच!

जीवनांतल्या अगदीं साध्यासाध्या गोष्टींतहि मला कांहीं सुरांची नि कांहीं बदसुरांची जाणीव होते. माझा एक रसिक मित्र आहे. लक्ष्मीच्या वरदहस्तामुळें त्याच्या रसिकतेला जास्त उठावहि आला आहे. त्याच्या दिवाणखान्यांत गेलं म्हणजे मला असाच एक बदसूर कानाला त्रास देतो. उंची गालिच्यांनी नि रोझवुडच्या अद्ययावत् परदेशी फर्निचरने भरलेल्या दिवाणखान्यांत मध्यभागीं चांदीच्या मोठ्या करंडकावर महिरापीवजा असलेल्या दोन हस्तीदंतांमध्यें बसविलेली बुद्ध मूर्ति आहे. त्या अपार्थिव मूर्तीलासुद्धां कदाचित् सर्वसंगपरित्याग करणाऱ्या महान् संताची आपण प्रतिमा असून असल्या राजेशाही थाटाच्या दिवाणखान्यांत मध्यभागीं विराजमान झाल्याचें दुःख होत असावें, असें मला नेहमी वाटतें.

सूट घालून देवासमोर 'पाहि माम् पाहि माम्' असें कानाला नी गालावर थपडा मारून म्हणणाऱ्या भक्तांना पाहून, धोतर नेसून क्रिकेट खेळणाऱ्या खेळाडूंना पाहून; वीतभर रुंदीचें जरीकाठीं उपरणें, कोरी पगडी नि रेशमी कोट घालून पगडीच्या झिरमिळ्यांच्या नि टपोऱ्या मोत्यांच्या भिगबाळीच्या झटक्याबरोबर समेवर येऊन अध्यात्माची

शिकवण देणाऱ्या तुकारामादि संतांचे अभंग गाणाऱ्या हरदासाला पाहून; दुष्काळाची, अपघाताची पाहाणी करतांना घेतलेला हंसऱ्या चेहऱ्याच्या मंत्र्याचा फोटो पाहून; वेड्यावांकड्या वाढलेल्या वहिवाटीच्या वयस्क स्त्रीनं षोडशकन्यकांना शोभेल असा पोषाख अट्टाहासाने केलेला पाहून; स्थितप्रज्ञाचा आव आणलेल्याने जिभेपासून साऱ्या शरिराचे चोजले पुरवितांना पाहून; मोठ्या संतानें आपल्या चेल्याचाट्यांच्या बरोबर ऐहिकाची देवाणघेवाण करतांना पाहून; याचकानें मोठ्या भिक्षेला नाक मुरडलेलें पाहून; एका नटीनें दुसऱ्या नटीच्या चारित्र्याबद्दल काढलेले उद्गार ऐकून; राजकीय आखाड्यांत उतरलेल्या मल्लांनीं तत्त्वाबद्दल बोलायच्या ऐवजीं वैयक्तिक टीकेची लाल माती उधळलेली पाहून; तरुणांनीं बायकी चाळे करतांना पाहून नि बायकांनीं पुरुषी पेहेराव केलेला पाहून; वंदेमातरम् किंवा राष्ट्रगीत म्हटलें जात असतांना स्वस्थ उभें राहायचें देशकार्यहि करूं न शकणाऱ्यांना पाहून असाच बदसूर माझ्या कानाला नेहमी बोचत आला आहे.

जसे कांही बदसूर मला बोचले आहेत, तसेच आजहि आठवणींच्या झुळकेबरोबर मस्त लागलेले, सारंगींत मिळून गेलेले, जीवनाशीं संपूर्णपणें एकरूप झालेले कोमल सूर पुनःपुन्हा कानाला आनंद देतात.

मला वाटतें, रामानें पितृवचनाकरिता वनवासाला जायचें ठरवलें तेव्हां सीतेनें त्याच्याबरोबर 'सुखद हा सौख्याहून वनवास' असें म्हणतांना असाच स्वर लागला होता. लक्ष्मणाने तोच स्वर लावल्याने त्याला जास्त वजन आलें. भरतानें पादुका घेऊन अयोध्येचें राज्य करावयाचें ठरवलें तेव्हां; बुद्धानें यशोधरेला व राहुलाला प्रासादांत सोडून निर्वाणाची वाट चालतांना; छत्रपती शिवाजीनें रामदासांच्या भगव्या झोळींत स्वतःच्या जोरावर मिळविलेलें महाराष्ट्राचें राज्य टाकलें होतें तेव्हां; झांशीच्या राणीनें 'माझी झांशी देणार नाहीं!' असें

म्हणून म्यानांतून तलवार काढतांना; लोकमान्य टिळकांनीं 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' असें आव्हानाचें ब्रीदवाक्य म्हणतांना; महात्माजींनीं 'चलेजाव'ची घोषणा करतांना; नेहरूंनीं ऐहिक सुखांचीं सर्व साधनें ऋद्धिसिद्धिसारखीं भोवतीं असतांनाहि तीं झुगारून देश-भक्तीचें वाण घेतांना असाच सूर लागला लोकहित-परिमलाचा सुगंध त्या स्वरांना होता.

ध्येयाच्या, प्रेमाच्या, त्यागाच्या सेवेच्या साऱ्या कठीण स्वरांच्या वाद्यांत त्यांचा स्वर एकरुप झाला होता नि म्हणूनच त्यांनीं निर्माण केलेलें संगीत जीवनाचें उत्कृष्ठ संगीत झालें. ऐकलेल्या स्वरांपेक्षा न ऐकलेलें सूर जास्त गोड असतात असें म्हणणाऱ्या कीटस् कवीच्या मनांतहि मला वाटतें, असल्याच सुरांच्या सुखद आठवणी घोळत असाव्यात. जो तो आपापल्यापरीनं स्वतःच्या आयुष्यांत तें संगीत घटवायचा प्रयत्न करीत असतो; पण तिथेंहि न पेलणाऱ्या पट्टींत तें गायलें म्हणजे गणपती करायला जाऊन वानर व्हावा, तशी स्थिति होते!

थोड्याशा भांडवलावर एकदम श्रीमंत म्हणून मिरवणाऱ्या नि फसणाऱ्या व्यापाऱ्यांची, चार इंग्रजी पुस्तकें वाचून स्वतःला विद्वान् समजणाऱ्या व्यक्तींची; भाऊगर्दींत पकडला गेल्यामुळें कधीकाळीं तुरुंगांत गेला म्हणून स्वतःला देशभक्त म्हणवून घेणाऱ्यांचे; एका प्रहसनांत, दोन एकांकिकांत नि तीन नाटकांत जुज भूमिका केल्यामुळें स्वतःला नटसम्राट म्हणवून घेणाऱ्याचे, आरे अवरोहांची पुरतीशी तोंडओळख नसतानांहि कसलेल्या गायकीच्या घराण्याची गोतावळ सांगणाऱ्या संगीततज्ज्ञांचे; केवळ वर्तमानपत्रांचे मथळे वाचून राजकारणावर बोलणाऱ्याचे नि मुरलेल्या मुत्सद्यांच्यावर टीका झोडणा-

त्याचे बोल–हे सारे मला न पेलणाऱ्या पट्टींत गायलेल्या संगीतासारखे वाटतात.

ह्या जीवनाच्या संगीतांत पुष्कळांना प्रयत्न करून स्वरच सांपडत नाहीं. कुणाला स्वर सांपडूनहि तो नीट लागत नाहीं. तर कुणी जन्मभर कण्हत-कुंथत एकाच पट्टीला धरून बसतात आणि जीवनाचें संगीत उगाचच कंटाळवाणें करतात. ठराविक चाकोरींतील माणसें असल्याच खर्जांतल्या एखाद्या पट्टीला धरून बसतात. सामान्य माणूस जीवनाच्या आस्ताई ध्रुव पदाच्या आसपास रेंगाळत राहातो; बेजबाबदार वर्ग कुठल्याहि स्वरांची ओढाताण करतो, तर तार सप्तकाकडेच राजकारणी पुरुषाचें सारें लक्ष असतें.

चढत्या सुराचा षडज् लावल्याशिवाय त्याच्या अस्तित्वाची कुणाला जाणीव होणार नाहीं ही त्याची खात्री झालेली असल्यामुळें चढत्या सुरांचें तत्त्वज्ञान त्याच्या जीवनाचें ध्येय झालेलें असतें.

विरहिणीच्या कारुण्याचा कालिंगडा नि जोगिया, तरुणतरुणींच्या मीलनाचा वसंतबहार, सुखी दांपत्याचा चंद्रकंस, मालकंस, सासूसुनेचा अडाणा, तराणा, राजकारणी पुरुषांची शंकरा, देसकाराची जुगलबंदी, पुत्रदर्शनाचा भटियार, लोकसेवेच्या तपश्चर्येचा कौसी व दरबारी कानडा, त्यागाची आसावरी, प्रेमाची भैरवी, ध्येयपूर्तीची भूपाळी, ही नित्याच्या जीवनांतील सारी सुरावट माझ्या कानाच्या परिचयाची आहे. नि म्हणूनच मला 'जीवन हें एक संगीत आहे' ही व्याख्या मनापासून आवडते; आणि वाटतें, माणसाने गावें, गातच राहावें, पेलणाऱ्या पट्टींत गावें म्हणजे भोंवतालच्या जीवनाच्या विसंगत स्वरांतहि त्याच्या मस्त लागलेल्या वेगळ्या स्वरांनीहि जीवनांत आनंदाचा वसंत फुलेल!

●●●

मराठा ग्रंथ संग्रहालय. ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५६६२ वि: निबंध
क्रमांक .................... नों: दि: ३०।११।६

३

# ‘ नेमेंचि येतो मग पावसाळा ’

दर पावसाळ्यांत ‘नेमेंचि येतो मग पावसाळा’ ह्या लहानपणीं पाठ केलेल्या ओळीची मला आठवण होते ती मोठ्या विचित्र संदर्भांत! पावसाळ्याबरोबरच परीक्षेचे निकाल जाहीर होतात आणि ह्या नेमेंचि येणाऱ्या पावसाळ्याबरोबरच आत्महत्त्येच्या बातम्याहि अगदीं तितक्याच नेमानं छापल्या जातात. परीक्षेंतील अपयश हें असल्या आत्महत्त्यांचं मुख्य कारण असतं. कोणी गाडीखालीं झोपून, त्यामुळं गाडी लेट होत असली तरी स्वतः फार लवकर इच्छित स्थळीं पोचायची सोय करतो. कोणी विषाची पुडी घेऊन झोपतों तर कोणी केरोसीनचा डबा रिकामा करतो. आत्मनाशाची एकदां मनाची तयारी झाली, कीं स्वतःला झेपणारे मार्ग पत्करणाऱ्या ह्या व्यक्ति नि वृत्तपत्रांत पहिल्या पानावर चौकटींत छापल्या जाणाऱ्या त्यांच्या आत्महत्त्येच्या बातम्या ह्यांच्या जोडीनं नियमितपणें येणाऱ्या पावसाळ्याच्या आठवणीनं ‘हें सृष्टिचें कौतुक जाण बाळा’ ह्या ओळीपर्यंत मला कधी पोचतांच आलं नाहीं.

सृष्टीचं कौतुक करायच्याऐवजी माणसाच्या मनाचं कोडं मात्र

पुढें उभं राहतं. सगळ्यांत जर कुणाला कांहीं प्रिय असेल तर तो स्वतःचा जीव, स्वतःचा प्राण, आणि असं असतांना आत्मनाश करून घेणाऱ्या व्यक्तींना भित्रं म्हणून हिणवायचं कीं जें साधारण माणसाला कधींच शक्य झालं नाहीं तें करून दाखविल्याबद्दल त्यांचं कौतुक करायचं? जगांतील सर्व मोठीं बक्षिसं जीव धोक्यांत टाकून केलेल्या पराक्रमाकरिता असतात आणि त्यांतहि पराक्रमाइतकंच स्वतःच्या जिवावर उदार होणं ह्यालाहि महत्त्व असतंच.

आत्महत्त्येच्या बाबतींत पराक्रम नसला, राष्ट्रासाठीं, दुसऱ्यासाठीं मरण्याचा त्याग नसला तरी आत्मनाशाची कठीण कर्तबगारी निश्चितच आहे आणि तरीहि जीवनाला भ्यालेला, मनाचा कच्चा, परिस्थितीला घाबरलेला, भित्रा अशीं विशेषणं असल्या व्यक्तींच्या नांवांवर लावलीं जातात. चांगले शब्द कुणाच्या तोंडून निघालेच तर ते केवळ दयेच्या पोटीं उगम पावतात. अशा बाबतींत 'बिचारा' अशी सुरवात असते आणि शेवट होतो तोहि 'गेला बिचारा' असल्या जोडीच्या सलामीनंच. आणि मग वाटतं, इतकं का सोपं आहे हें सारं! आणि इतक्या लवकर विसरण्यासारखं? आंकडेशास्त्रज्ञांच्या मतें सबंध जगांत दरवर्षी सुमारें ३,२०,००० आत्महत्त्या होतात. त्यांतल्या एकट्या अमेरिका खंडांत वीस हजारांवर आत्महत्त्या होतात. सुखवादी तत्त्वज्ञानाचा भोक्ता म्हणून प्रसिद्ध असलेला देश, ऐश्वर्य बेरेमाप उधळणारा देश, माणसागणिक मोटर असलेला देश ह्या बाबतींतहि पहिला कां असावा? केवळ दुःख, उपासमार एवढं कारण पुरेसं नसतं आत्मनाशाला! हा सिद्धान्त मांडण्यासाठीं हें अमेरिकेचं उदाहरण, एवढाच का ह्याचा उपयोग?

एकोणिसाव्या शतकापर्यंत खरं म्हणजे आत्महत्त्येचे आंकडेहि कुणीं गोळा केलेले नव्हते. वेडाच्या पोटीं केलेल्या आत्मनाशाला महत्त्वच

दिलं नव्हतं तेव्हांच्या समाजानं. एमिली डुरखम् ह्या फ्रेंच लेखकानं १८९७ सालीं प्रथम ह्या विषयावर पुस्तक लिहून त्याची मानसशास्त्राच्या दृष्टीनं चर्चा केली. फ्राइडनं आपल्या नेहमीच्या लैंगिक तत्त्वज्ञानाच्या पार्श्वभूमीवरून भावनात्मक विषयाचं रूपांतर अखेर आत्महत्त्येंत होतं असा निर्वाळा दिला तर संकटाला धैर्यानं तोंड न देण्याच्या स्थितींतून निर्माण झालेल्या अगतिकतेंत, सामाजिक हेटाळणी व प्रियजनांचा राग ह्यांची भर पडली म्हणजे आत्महत्त्या घडून येते असं कांहीं तत्त्वज्ञांनीं कोष्टक मांडलं. दारुण निराशा, काळोख ही एवढीच एकमेव परिस्थिती आत्मघातास मनुष्यास कारणीभूत करते, असा तिसऱ्यानं शोध लावला.

ह्या साऱ्या कारणमीमांसेंत कोणीं अपयशाला मुख्य समजलं तर कोणी प्रेमभंगाला गडद रंग दिला, कोणीं निराशेचं अभ्र जीवन व्यापून टाकणारं ठरवलं तर कोणी भित्रेपणाला प्रमुख कारण मानलं. कोणी अपकीर्तीचा डाग धुण्यासाठीं केलेला प्रयत्न पुढें मांडला तर कोणी समाजाच्या हेटाळणीचा नि त्यांतून जन्मलेल्या अगतिकतेच्या मोडक्या रथाकडे बोट दाखवलं. हीं सारीं कारणं आपापल्या परीनं खरीं असलीं तरी तीं सारीं अर्धसत्यं आहेत. अमकंच एक कारण खरं असं कधींच कुणाला सांगतां येणार नाहीं. स्वतःच्या प्राणावर निस्सीम आसक्ती हा प्राणिमात्राचा जन्मजात धर्म! तो वांचविण्याकरिता सारे ‘ धर्म ’ विसरायचे ही सामान्य तऱ्हा. आणि असं असतांना अगतिकता, भित्रेपणा असा ठसा मारून आत्मघाताला दप्तरीं दाखल करणं अगदीं चुकीचं ठरेल, नाहीं का? आत्मघात करणाऱ्या व्यक्तींत केव्हांकेव्हां नितान्त आदरणीय असे देशभक्त, अध्ययनाकरिता जन्मभर पुरून उरतील असले ग्रंथ लिहून ठेवणारे विचारवंत, कुबेराच्या जोडीचे लक्ष्मीपुत्र, जन्मभर मानाची, कीर्तीची पताका मिरवणारे भाग्यवंत

असलेले पाहिले म्हणजे फक्त बातमी छापण्यापुरतंच आत्महत्येचं महत्त्व असावं ह्याचा विषाद वाटतो.

उलट जगण्याकरिता कांहीं जवळ नसतांना हजारो जीव जगत असतात· अपमानाचं जिणं, दारिद्र्याचा फास, कलंकित आयुष्य, सामाजिक निर्ममता–हीं सारीं ओझीं वाहूनहि चिकाटीनं जगत असतात. एवढंच नव्हे, तर त्यांची स्वतःच्या जीवनावरील आसक्ति कधींच कमी झालेली नसते. त्या जिण्याला किती कवडीचं मोल आहे ह्याचा ते कधींच हिशेब करीत नाहींत, कीं आपला आतां जगाला काय उपयोग असल्या समस्या स्वतःपुढें मांडून घेत नाहींत. शक्य तसं नि शक्य तितकं जगायचं हा एकच हेतु त्यांत असतो आणि असं करतांना बाकीचे सगळे धर्म विसरायला ते तयार असतात. अशा व्यक्ति केवळ जगतां यावं म्हणून समाजानं दुष्ट गणलेली, दुराचारी ठरविलेली, कायद्यानं दंडनीय मानलेली, निसर्गानं गर्हणीय ठरविलेली, प्रेमानं हद्दपार केलली, भावनेनं झिडकारलेली, बुद्धीनं अवमानलेली, नीतीनं निंद्य ठरविलेली, धर्मानं त्याज्य गणलेली अशी वर्तणुक बिनदिक्कत करीत असतात. हें सारं केवळ जगण्याकरितां! केवळ जगण्याकरितां! आणि मग वाटतं, वाटेल तें करून जगण्याकरिता धडपडणारं हें माणसाचं मन नि कांहींहि करून जगाचा निरोप घ्यायचाच असा अट्टाहास धरणारंहि माणसाचंच मन आणि ह्या दोन ध्रुवांमधलं, उगवलेला दिवस सोनियाचा मानून निसर्गानंच शांत झोप देईतों निसर्गाच्या 'नेमेंचि येतो मग पावसाळा'–सारखंच सामाजिक, धार्मिक रीती-रिवाजाचं पालन करत जगणारं–तेंहि माणसाचंच मन–असा विचार करीत असतांना 'नेमेंचि येणाऱ्या' पावसाळ्यांतल्या इंद्रधनुष्याऐवजीं मानवी मनाच्या एकमेकांत मिळून जाणाऱ्या गडद नि फिक्या रंगांचं इंद्रधनुष्य समोर दिसतं नि वाटतं, की तें सृष्टीचं फक्त कौतुक असलं तरी हें मात्र अगम्य कोडं आहे हेंच खरं!

●●●

४

# आशावाद

१९४४ सालची एक गोष्ट मला नेहमीच आठवते. आम्ही कांहीं महाराष्ट्रीय, चक्रवर्ती राजगोपालाचारी ह्यांना त्यांच्या सिमल्यांतील निवासस्थानीं भेटावयास गेलों होतों. क्रिप्स मिशन्, व्हॅवेल प्लॅन, पेथिक लॉरेन्स बरोबरच्या प्रदीर्घ मुलांखतींचे दिवस होते ते. स्वातंत्र्य मिळण्याचीं स्पष्ट चिन्हें दिसत होतीं पण निश्चित असं हातांत कांहीं नव्हतंच. भारतांतील सारीं वर्तमानपत्रें ह्याच बातम्यांनीं भरून जनतेला त्यांच्या मताप्रमाणें लावलेला अन्वय अर्थ सांगत होतीं. भाषणें, सभा, पुन्हा बोलणीं, पुन्हां एकदा विचारविनिमय नि बोलणीं मग दुसऱ्या कोणातर्फे नवा 'फिरून एकदा'च्या चालीवर प्रयत्न, असा सारा मामला होता. भारताच्या स्वातंत्र्याची नांदी उद्यांच ऐकूं येणार असं वाटूं लागावं; तोंच बोलणीं फिसकटल्याची बातमी जाड टाईपांत वाचावी लागे. अशा परिस्थतींत आम्ही चक्रवर्ती राजगोपालाचारी ह्यांना भेटावयास गेलो होतो. आमच्यापैकीं एकानं "कांहीं आशा आहे कां ह्या एकंदर वाटाघाटींतून?" असा प्रश्न विचारला. त्यांच्या नेहेमीच्या स्वभावाप्रमाणें मोजकीं उत्तरें देणारे राजाजी एकदम

दिलखुलासपणें बोलूं लागले. "सबंध जग आशेवरच जगतं. आशा आहेच. असणारच. आपण आहोंत तोपर्यंत आशाच आपली सोबत करते. तात्पुरती निराशा झाली तरी पुन्हा त्यांतूनच आशेचा किरण दिसतो." एक ना दोन कितीतरी प्रकारानें राजाजी आम्हांला एकंदर परिस्थिती समजावून सांगत होते. त्यानंतर आम्हीं घरीं आलो होतो, ते त्या वयोवृद्ध नेत्याकडून एक नवा धडा शिकूनच. बोलणीं अखेर फिसकटलीच होतीं पण आशा तग धरून होती.

१९४१ सालीं विन्स्टन चर्चिलनें आपल्या देशबांधवांना हेंच आव्हान केलें होतें. त्यावेळीं नाझी राजवटींतलं जर्मन सैन्य विजयाच्या धुंदीनं देशामागून देश आपल्या पोलादी बुटाखालीं चिरडत आगेकूच करीत होतं. ब्रिटिश बेटाकडे मुसंडी मारत होतं नि सबंध इंग्लंड जाळून भस्मसात करण्याच्या धमक्या देत होतं. फील्ड मार्शल गोअरिंग दोन दोनशें विमानांनी लंडन शहरावर राक्षसी बॉम्ब हल्ले करत होता नि डॉ. गोबेल्स राईचा पर्वत करून भीतीदायक प्रचार करीत होता. जर्मन देशाच्या सरशीची भाषा सर्वत्र बोलली जात होती आणि त्याचवेळीं इंग्लंडचा युद्धकालीन पंतप्रधान आपल्या उत्स्फूर्त वाणीनं लोकांना सांगत होता कीं आशा सोडूं नका. घाबरून जाण्याचं कांहीं कारण नाहीं. आधीच्या सुरवातीच्या कितीहि लढाया हरलो तरी शेवटचं युद्ध आपणच जिंकणार आहोंत. त्याच्या त्या भाषणाला हजारो लोक हंसले असतील, खोटी आशा म्हणून किती लोकांनीं त्याचे वाभाडे काढले असतील, पण चर्चिल मात्र शेवटपर्यंत तेंच बोलत होता नि बॉम्ब हल्ल्यानं, अपयशानं निर्जीव झालेल्या नागरिकांना त्यानं पुन्हां एकदा आशेची पाउलवाट दाखविली होती. नव्या नेटानें, नव्या जोमानें, नव्या उत्साहानें त्या भयंकर काळांतहि इंग्लंडची जनता रुपेरी रेषा बघूं लागली नि अखेरीस शेवटची लढाई ब्रिटिश जिंकलेच. जर्मन

सैन्य; इंग्लंड, अमेरिका आणि रशिया ह्या त्यावेळपुरत्या मित्र राष्ट्रांपुढें टिकूं शकलं नाहीं. पण एक काळ मात्र असा होता कीं जर्मनीच्या पॅन्झर डिव्हिजन्चे स्वस्तिक चिन्हाचे रणगाडे लंडनच्या रस्त्यांत केव्हां दिसतील ह्याचा नेम नव्हता.

वर्तमान काळांतली आणि अगदी निकटच्या भूतकाळांतलीहि नी अशीच असंख्य उदाहरणें असतांना एक वर्ग ह्या दुर्दम्य आशावादा-विरुद्ध नेहमीच हाकाटी करीत असतो. निराशावादाच्या संपूर्ण आहारीं गेलेल्या ह्या मंडळींना सारें हास्य, सारा आनंद, सारा रम्य भावी काळ म्हणजे एक वेडं स्वप्न वाटतं. "कठीण आहे बाबा! कुणास ठाऊक कसं व्हायचंय् पुढं तें!" असे उसासे टाकूनच हे लोकांना भिववीत असतात. कडूलिंब प्यायल्यासारखा लांबट चेहरा करून जगाकडे, त्यांतील घटनांकडे असा विचित्र चष्मा लावून हे बघतात कीं त्यांना सारं दुःखमय, काळजीचं, काळोखाचं, निराशेचं असं सारं कांहीं दिसतं. वसंतऋतुची पारख नसतेच त्यांच्या डोळ्याला. रसरसतं तारुण्य दिसत नाहीं त्यांना. उगवत्या सूर्याचें ताम्रबिंबहि मावळत्या सूर्याची साक्ष समजणाऱ्या वर्गाला मला नेहेमी सांगावसं वाटतं कीं "बाबांनो, चष्मे बदला."

ह्या संदर्भातच स्टीव्हनसन्च्या एका वाक्याची मला आठवण होते. तुरुंगांतल्या एकाच कोठडींत दोन कैदी होते. जाड गजांच्या खिडकींतून बघणं हाच त्यांचा उद्योग होता. त्यांत मात्र एकाला आकाशांतले तारे दिसले नि दुसऱ्याला बाहेरचा चिखल दिसला. निराशावादी पठडींतल्या जमातीचं नेमकं असंच होतं. ह्या दृष्टिकोना-मुळंच जबरदस्त आशावादी संकटालाहि संधी मानतो तर निराशावादी संधीलाहि संकट समजतो. इलाज नसतांना पुढें आलेल्या दोन वाईट गोष्टींपैकीं एकीला त्यांतल्यात्यांत कमी वाईट आपत्ती भोगून आशावादी

मोकळा होतो तर निराशावादी दोन्हीं वाईट घटनांना कवटाळून बसतो. जीवनाकडे बघण्याची इतकी कडवट दृष्टी असली म्हणजे नीरसताच पदरीं यावयाची हें साहजिकच आहे. अतिशय कठीण परिस्थितींत असतांना, जन्मठेपेच्या शिक्षा झालेल्या दिवशींसुद्धां "अजिंक्य मी, अवध्य मी, अनंत मी" असं ब्रिटिश सरकारला बजावणाऱ्या स्वातंत्र्य-वीराच्या दुर्दम्य आशावादापासून ही मंडळी कांहीं शिकायला तयार नाहींत, एवढेंच नव्हे तर आशेच्या हिंदोळ्यावर बसलं म्हणजे भोंवळ येण्याचाच संभव जास्त, आशा म्हणजे कधीं खरं न ठरणारं एक स्वप्न, आशा म्हणजे आपल्याला फसवणारी एक किमया, आशा म्हणजे एक बुडबुडा असलं सुतकी तत्वज्ञान थंड मनानं उसास्यांच्या पार्श्वसंगीतावर रडक्या आवाजांत आळवत राहातात. अगदीं ह्याच्या उलट लहानपणीं वाचलेली एक गोष्ट मोठी सूचक वाटते. एका चाणाक्ष शेतकऱ्याला देहांत शासनाची शिक्षा झालेली असते. दुसऱ्या दिवशीं सकाळीं फांशीं दिला जाणार असतांनाहि तो निश्चिंत असतो. अखेरची इच्छा म्हणून तो राजाची भेट हवी असं सांगतो. त्याचा स्वतःचा पांढरा उमदा घोडा राजाला भेट द्यावयाचा आहे. खरं म्हणजे त्या पांढऱ्या घोड्याचं पुरतं शिक्षण झाल्यावरच तो भेट म्हणून द्यावयाचा होता पण उद्यांच फांशीं जाणार असल्यानं शिक्षण पूर्ण होणं शक्य नाहीं असंहि सांगतो. "घोड्याला असं काय शिकविणार होतास?" हा अपेक्षित प्रश्न गोष्टींतला राजा अर्थातच विचारतो. सहा महिन्यांत त्या घोड्याला आपल्या स्वारासकट उडता येऊ शकेल अशी विद्या हस्तगत केली असल्याचे तो सांगतो नि त्या दैवी विद्येचा खास राजाकरितांच उपयोग करण्याची त्याची इच्छाहि दर्शवितो. राजा अर्थातच आश्चर्यचकित होतो. शेतकऱ्याचा कांहीं फसवणुकीचा डाव असेल अशीहि शंका त्यास येते. पण तरीहि त्यास सहा महिन्यांची

मुदत देण्यांत येते नि एवढ्या अवधींत घोडा उडू न लागल्यास फांशीची शिक्षा कायम असेंहि फर्मावितो. त्या शेतकऱ्याचे मित्र त्याला हंसतात, त्याची चेष्टा करतात नि जीवाच्या भीतीमुळें त्याला वेड लागलं आहे असा निर्वाळा देतात. शेतकऱ्याचं आशावादी तत्वज्ञान त्यांना समजतच नाहीं. त्याची भूमिका नंतर तो आपल्या जीवश्च कंठश्च मित्राला सांगतो. ती अशी, "आजचं मरण सहा महिन्यांवर गेलं त्यांत न जाणो मला नैसर्गिक मृत्युहि येऊ शकेल, परचक्र येऊन कदाचित राजाच बंदिवासांत पडूं शकेल नि मला सोडतील आणि एवढंच कशाला, पण काय नेम सांगावा एखादे वेळेस घोडाहि उडूं लागेल." ह्या त्याच्या अशक्यांतल्या आशावादाला विनोदाची झालर असली तरी प्रत्यक्ष मृत्युच्या दाढेंत असतांना लावलेला "नवा चष्मा" निश्चितच वाखाणण्यासारखा आहे. ह्याच भिंगाचा चष्मा पर्ल हारबर् च्या बॉम्ब स्फोटानंतर प्रत्येक अमेरिकन सैनिकानें लावला असावा. जपानी सैनिकांच्या 'मारूं किंवा मरू' ह्या चालीच्या तुफानी हल्ल्यांमुळें अमेरिकेचें सैन्य कामीं येत होतें. त्यावेळचा त्यांचा सेनानी, युद्धाच्या तीव्रतेची, मृत्यूसंख्येची खरी जाणीव देण्याच्या दृष्टीनें त्यांना सांगत असे कीं शंभर जर लढाईवर गेले तर फक्त एकच जीवंत परत येऊ शकेल इतके घनघोर युद्ध चालू आहे आणि असं असतांनासुद्धा अमेरिकन सैनिक हंसत हंसत काडतुसाचे पट्टे अंगावर चढवीत असत. अमेरिकन आशावादाचा हा पराकाष्ठेचा विजय आहे, असे तोच सेनानी म्हणत असे. कारण प्रत्येक सैनिकास जीवंत परत येणारा सैनिक आपणच असणार अशा सहजतेनें, खात्रीनें ते सैनिक युद्धावर जायला तयार होत असत.

आजची जागतिक परिस्थिती, वाढती महागाई, मानवी संहाराच्या शस्त्रांची धांवती प्रगती ह्या साऱ्या गोष्टींमुळें निराशावाद्यांना उसासे

टाकायला हवं तेवढं खतपाणी मिळतं. नाहीतरी ज्या पावसामुळें आशावादी माणसाला त्याची हिरवळ शोभिवंत दिसू लागते त्याच पावसामुळें निराशावादी माणसाच्या पायाखालीं शेवाळ वाढावं हाच जणूं निसर्गाचा नियम असावा. 'शब्दकोडें जो हातांत फाउन्टन पेन घेऊन सोडवितो तो खरा आशावादी ' अशी एक इंग्रजी विनोदी व्याख्या आहे. हें कांहींहि असलं तरी मला नेहमीच वाटतं कीं राजाजींनी जें आवर्जून सांगितलं, चर्चिलनें दुर्दम्य आत्मविश्वासानें शिकविलं तेंच सूत्र आजच्या मानवाला तारक ठरणार आहे. जिकडे पहाल तिकडे पाणी, अथांग महासागर आणि प्रचंड लाटा अशा परिस्थितींतहि, लाटांच्या तांडवनृत्यांनीं भिवविणाऱ्या समुद्राला सुद्धां,

"अनंत अमुची आशासक्ती ॥
अनंत अमुच्या आशा ॥
किनारा तुला पामराला ॥"

असं कुसुमाग्रजांनीं कोलंबसाला म्हणायला लावलं त्यांत केवढं मोठं, चिरंतन स्वरुपाचं तत्वज्ञान साठवलेलं आहे हें काय वेगळं सांगायला पाहिजे ?

● ● ●

५

# अखेर न्याय मिळाला

वर्तमानपत्रांतल्या एका लहानशा बातमीनं परवा माझं समाधान झालं. हल्लीं दैनिक वाचल्यानंतर माणूसकीचं माप रोज कमी होत असावं असं वाटूं लागतं. व्यक्तीव्यक्तींतल्या, जमातीजमातींतल्या, राष्ट्राराष्ट्रांतल्या एकापेक्षां एक वरचढ शत्रुत्वाच्या बातम्या वाचल्या म्हणजे ह्यापेक्षां दुसरं तरी काय वाटणार? फार वर्षांपूर्वी वाचलेल्या, एच्. जी. वेल्सच्या एका वाक्याचा मला भारी राग यावयाचा. The more I see of man, the more I love my dog. असं अत्यंत माणूसघाणं वाक्य होतं तें. कुत्रा हें इमानी जनावर आहे ही लहानपणापासून जाणीव असूनहि इतक्या तिडीकेनें ह्या आंग्ल लेखकानं सबंध मानव जमातीवर कां तुटून पडावं हें मला कळत नसे. युद्धाच्या बातम्या, खुनाचे प्रयत्न, पैशाकरतां विकलेले धर्म, विसरलेलीं वचनें, सोयिस्करपणें बदललेलीं मतें, स्वार्थाकरतां गहाण ठेवलेलीं कर्तव्यें, फायद्याकडे लक्ष ठेवून चालू असलेली एकंदर वागणूक नि ह्या सर्वांचा मोठ्या टाइपांत प्रसिद्ध होत असलेला, दैनंदिनी व्यसन म्हणून वाचला जाणारा मजकूर बहुधा त्याच्या ह्या अश्रद्ध मताला कारणीभूत झालेला

असावा आणि मग त्याला वाटलं असावं कीं ह्या दोन पायाच्या, खोट्या बुद्धीच्या नि बिनभरंवशाच्या द्विपादापेक्षां हा इमानी नेहमी पायाजवळ बसणारा नि शिटीला सुद्धां शेपटी हलवून दाद देणारा चतुष्पाद प्राणीच बरा. त्यांतून कुत्रा हें आज इमानाचं प्रतीक होऊन बसलेलें जनावर ! कालच्या इतिहासांतल्या शिवछत्रपतींच्या वाघ्यापासून ते इटलींतल्या फिडोपर्यंत मालकाकरतांच जगलेल्या कुत्र्यांची नामावळीच इतकी मोठी आहे कीं कुत्रा म्हटलं कीं इमानी हा शब्द उच्चारला नाहीं तरी मनांत येतोच. अलिकडच्या कथानाटकांतून हा शद्व तितक्याशा श्रद्धेनं वापरत नाहींत अशी तक्रार कोणी केल्यास चुकीची नाहीं हेंहि खरेंच.

कुत्र्याचं जसं असामान्य कौतुक तसाच दुसऱ्या एका चतुष्पादावर मला वाटतं भयंकर अन्याय झाला आहे. शालेय आठवणींपासून ते अगदीं सुधारलेल्या देशांतल्या विधानसभेपर्यंत गाढवाला बिचाऱ्याला नेहमींच लाथा खाव्या लागल्या आहेत. मूर्ख मुलाला, चुकीचें उत्तर सांगणाऱ्याला, उशीरा वर्गांत येणाऱ्याला, सांगितलेलं काम करूं न शकलेल्याला सरसकट ‘ गाढव ’ म्हणण्यांत आज कितीतरी शिक्षकांच्या पिढ्या खर्ची पडल्या. संस्कृत शिकविणारा शिक्षक ‘ शुद्ध गाढव आहेस ’ असं सबंध वाक्य म्हणायचा हाच काय तो फरक !

शालेय शिक्षणांतून ह्या चतुष्पाद संबोधनानें पुष्कळदां गौरविलेला विद्यार्थी कॉलेजांत गेला तरी त्याचा फारसा उपयोग होत नाहीं. केवळ भाषिक माध्यमांत फरक झाल्यानें संस्कृत शिक्षकानें म्हटलेल्या वाक्यांत तूं ह्या सर्वनामाची भर पडून आंग्ल भाषेंत ह्या वाक्याचा आहेर होतो एवढंच. एवढंच कशाला पण राजकारणांत पुष्कळदां पुरेसा भामटेपणा नसल्यामुळें मागें राहिलेल्याला, हवं तें वातावरण अनुकूल नसल्यामुळें मागें राहिलेल्याला, शैक्षणिक पातळी कमी असलेल्याला, तुमच्या मताप्रमाणें न वागणाऱ्याला, वादविवादांत तुम्हांस हरवणाऱ्याला

कुठल्याहि परिस्थितींत न चिडतां शांत राहाणाऱ्याला, सांगाल तें काम करणाऱ्याला, द्याल तें ओझं वाहाणाऱ्याला, खायला घालाल तें खाणाऱ्याला, नि स्वतःचं मत नसलेल्याला कुणालाहि आज सरसकट गाढव म्हणायचा सबंध जगांत परिपाठ आहे. पटकन् कुणालाहि खालच्या वर्गांत ढकलायचं असलं, स्वकीय म्हणून मानायचं नसलं, हीन दर्जाचं ठरवायचं असलं म्हणजे अगदीं एक सोपा उपाय आणि तो म्हणजे त्याला 'गाढव' म्हणून मोकळं व्हायचं. ह्या असल्या निष्ठूर वागणुकीमुळेंच मला त्या वर्तमानपत्रांतील साध्या बातमीनंहि समाधान झालं होतं.

दिल्ली नगरपालिकेंतील एक ठराव एकमतानें मंजूर झाला होता. सगळ्या धर्मांचे, सगळ्या पंथाचे, सगळ्या प्रांताचे, सगळ्या पक्षांचे, सगळ्या मतांचे, सधर्मी, निधर्मी नि सर्वधर्मी सभासद असूनहि हा ठराव कुठल्याहि प्रकारची चर्चा न होतां, जास्त चौकशीकरितां वेगळी समिती न नेमतां, एकमतानें मंजूर झाला आणि मला वाटलं उशीरा कां होईना पण अखेरीस एका प्राण्यास न्याय मिळाला होता. सगळ्यांचं एक मत. अगदीं कुणीहि तटस्थसुद्धां न राहतां पसार झालेला हा बहुधा पहिलाच ठराव असावा. गाढव ह्या अत्यंत उपयुक्त अशा भारवाहू प्राण्यावर कर बसवावा किंवा नाहीं ह्या प्रश्नाचं साधं उत्तर, 'कर बसवावा' असंच असणार. पण घडलं तें अगदीं वेगळंच. निरनिराळ्या प्रवक्त्यांनीं गाढवाचे गुण गाणारीं भाषणें करून गरिबांच्या पाल्य नि अति गरीब जनावरावर कर बसविण्यास एकमतानें इन्कार केला नि अखेरीस त्याला न्याय मिळाला. निदान गाढवासंबंधीं तरी एकमत ह्या देशांत होऊं शकतं हा शोध प्रथमच जाणत्यांनीं लावला नि कमालीचे गुण असलेल्या ह्या चतुष्पादाला सरकारदरबारीं मान्यता मिळाली आणि त्यानं केलेली आजवरची जनतेची शांत-मधून मधून ओरडणं

सोडल्यास सेवा जनताजनार्दनांनीं, नगरपित्यांनीं रुजु करून घेतली. गाढवावर कर न लावल्यामुळं होणारं नुकसान भरून काढण्याकरतां कुणी मार्ग सुचविल्याचं वर्तमानपत्रांत नव्हतं; पण यापुढें गाढव हा शब्द अयोग्यरीतीनें वापरणाऱ्यास अगदीं एका नव्या पैशाइतका जरी कर ठेवला तरी नगरपालिका हवा तेवढा पैसा मिळवूं शकेल; असं एखाद्या आंकडेशास्त्रज्ञानं सांगावयास हरकत नव्हती. शिक्षकवर्ग, संगीत शिक्षक धरून, दुय्यम अधिकारी, पालक, सामान्य पुढारी, किरकोळ व्यापारी, बिऱ्हाडकरूसंबंधीं बोलतांना घरमालक किंवा घरमालकांसंबंधीं बोलतांना बिऱ्हाडकरू, सुनेसंबंधीं बोलतांना सासू, आपला पक्ष सोडून दुसऱ्या कुठल्याहि पक्षाच्या राजकारणाविषयीं बोलतांना सामान्य नागरिक ह्यांच्याकडून मुख्यतः हा कर मिळूं शकेल नि ह्यापैकीं कुठल्यांना कुठल्या भूमिकेंत तरी आपल्यापैकीं प्रत्येकजण असल्यामुळें, मिठावरच्या करासारखाच किंवा राजकीय निष्ठेमुळें व कृतज्ञता बुद्धीनें मिठाचा कर जरी सोडला तरी कुठल्याहि नित्यगरजेच्या वस्तूवर लावलेल्या करा इतकाच हा करहि लाभदायक होऊं शकेल.

आजवर लाथाडलेल्या चतुष्पादासंबंधीचा हा एक नवा विचार आहे म्हणून नव्याची वेळीं अवेळीं तरफदारी करणारा तांडा पुढें येऊन न जाणो ह्या प्राण्याला भलत्याच उच्चस्थानीं बसविल. एका पुढारलेल्या देशांतल्या राज्यकर्त्या पक्षाच्या निवडणुकीचें चिन्ह म्हणून ह्या प्राण्याच्या चित्राचा उपयोग करतात. हा मुद्दा ‘भारताबाहेरचं तेवढं चांगलेच’ ह्या विचारसरणीच्या अनेक लोकांना ह्या प्राण्याची श्रेष्ठता, पात्रता स्पष्ट करण्यास पुरेसा ठरावा.

ह्या प्राण्यासंबंधीं ‘अर्धवट डोळे मिटून तीन पायांवर उभीं असलेलीं बिचारीं गाढवें’ असं थोडं वेगळ्या रसानं लिहिलं ते बापूसाहेब माट्यांनी; नंतर विनोदानं कां होइना पण वि. आ. बुवांनी नि

पु. ल. नी त्याला थेट स्थितप्रज्ञाच्या रांगेंत नेऊन बसवलं. ‘जो तो उठल्या सुटल्या तुम्हांला गाढव म्हणूं लागला कीं ओरडण्याची वेळ आली आहे असं समजा.’ असं निक्षून सांगणाऱ्या आंग्ल लेखकालाहि किंवा ‘स्वतःला गाढव म्हणवून घेतलंत कीं जो तो आपलं ओझं तुमच्यावरच लादील’ ह्या डेन्मार्कमधील म्हणींत किंवा ‘दुसऱ्याच्या ओझ्यांनी मेलेल्या, अशी व्याख्या करणाऱ्या सर्व्हंटीज्‌ला ह्या प्राण्या-बद्दलचा आदरच जास्त असावा असं वाटतं.

खरं म्हणजे ज्या गोष्टींना आपण आज सर्रास गाढवपणा म्हणून ठरवतों त्यापैकीं कितीतरी गुणांना आज माणूस पारखा झाला आहे. ‘कोणालाहि गाढव म्हणावयाची घाई करूं नका. आधीं तो तितका सोशिक आणि उपयुक्त आहे का हें पहा’ असा इशारा देणाऱ्या मिस्किल लेखकाला मला वाटतं हेंच म्हणावयाचं होतं. सहिष्णूता हा त्या चतुष्पादाचा धर्म असला तर आजचा माणूस असहिष्णुतेचा मूर्तीमंत पुतळा होऊन बसला आहे. थोडंहि मनाविरुद्ध, स्वतःच्या मताविरुद्ध झालं कीं आजचा माणूस त्या प्राण्यापेक्षांहि मोठ्यांदा बरळूं लागतों; ओरडूं लागतो. पण लोकशिक्षण किंवा हक्काकरतां भांडण असं त्याला लेबल चिकटवितो.

घोड्याच्या उंचीचा नि वेगाचा किंवा खेचराच्या शक्तीचा कधींहि गर्व न करणाऱ्याला मात्र गाढव म्हणायचं; नि धडपणें स्वातंत्र्यप्राप्तीचा इतिहासहि माहीत नसलेल्यानं पुराणांतल्या देवापासून ते कालच्या लढ्यांतल्या पुढाऱ्यापर्यंत उगाचच वारसा हक्क सांगणाऱ्याला माणूस म्हणायचं, हवं तेवढं ओझं पाठीवर असतांना मालकाकरतांहि त्यावर जागा ठेवणाऱ्या जनावराला गाढव म्हणायचं नि स्वतःचं ओझं मग तें रोजच्या कामाचं असो कीं न पेलवणाऱ्या जबाबदाऱ्यांचं असो, शक्य तो दुसऱ्यावर कसं टाकतां येईल ह्यांतच वेळ घालविणाऱ्याला

माणूस म्हणायचं, मिळेल त्या गवतावर खुष राहाणाऱ्याला गुळाची चव नाहीं म्हणून हिणवायचं नि खालीं मान घालून परदेशांतून आणाव्या लागलेल्या अन्नालाहि नांव ठेवून खाणाऱ्याला माणूस म्हणायचं; दिवसभर मजूरी करून जागा मिळेल तेथें विश्रांति घेणाऱ्याला उकिरडे फुंकरणारा म्हणायचं नि चार पिढ्यांपूर्वीच्या, चार खणांच्या खोलीकरतां चाळीस वर्षें कज्जेदलाली करणाऱ्याला माणूस म्हणायचं, उंट आणि गाढवाच्या माणसानंच लिहिलेल्या संवादाला 'अहो रुपम् अहो ध्वनी,' म्हणून हिणवायचं, नि अध्यक्षानं वक्त्याच्या, वक्त्यानें अध्यक्षाच्या किंवा तशाच प्रकारच्या परस्पर प्रशंसेच्या पेढ्या चालविणाऱ्यांनी तें केलं म्हणजे 'परिचयात्मक उल्लेख' असं म्हणायचं. मला वाटतं ह्यामुळेंच चिडून गाढवाच्या वतीनें चेस्टरटननें लिहिलं असावं. "अगदीं गाढवच! खरं आहे पण त्या गाढवावर बसूनच येशू ख्रिस्त जेरुसलेममध्यें गेला. हिकसन् कवीच्या Ass Speaks ह्या कवितेच्या ओळींतून सुद्धां त्यानं माणसाला हेंच सांगितलं कीं, 'मूर्खांनो, कुणाला हंसतां तुम्ही? माझ्या आयुष्यांत असा एक क्षण होता कीं पृथ्वीमोलाचं धन स्वर्गाच्या वाटेला नेलं तें मीच,"

•••

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ...३५६८२... विः ...निबंध...
क्रमांक ...२४७७८... नोंः दिः ...३०/११/८

६

# नावांतच सारं कांहीं आहे

कांहीं वर्षांपूर्वींचं मला आवडलेलं तें शेक्सपीयरचं वाक्य ' नांवांत काय आहे ? ' आज मला आवडेनासं झालं आहे. अर्थात् ह्या वाक्याचा वेळीं अवेळीं दुरुपयोग केला जातो म्हणून किंवा ह्या वाक्याचा नाटक, प्रहसनापासून तें संवादात्मक लिहिलेल्या लघुकथांतून, कंटाळा येईपर्यंत सारखा उपयोग केला जातो म्हणून नव्हे, तर खरं म्हणजे ह्या वाक्याला आज अर्थ राहिला नाहीं म्हणूनच हा प्रश्न ऐकून मला पंचवीस वर्षांपूर्वीं शाळांतून लावलेल्या एका पुस्तकांतील धडयाची आठवण येते. शाळा तपासणीस आलेल्या अधिकाऱ्यानें एका विद्यार्थ्यास तीन प्रश्न विचारले होते. ' ईश्वर कोठें आहे ? ' असा त्यांत एक प्रश्न होता. विद्यार्थी हुशार असल्यानें त्यानें ह्या प्रश्नाचें उत्तर म्हणून ' ईश्वर कोठें नाहीं ? ' असा प्रतिप्रश्न विचारला होता.

मला वाटतं ' नांवांत काय आहे ? ' ह्याचं उत्तर त्या विद्यार्थ्याप्रमाणेंच ' नांवांत काय नाहीं ? ' अशा प्रतिप्रश्नांतच असूं शकेल. अगदीं परवाचीच गोष्ट, सिटी स्टोअर्समध्यें गेलों असतांना स्टेनलेस्स्टीलची लहानशी वाटी बरीच घासाघीस केल्यानंतर विकत घेतलेल्या एक बाई

'हें पहा, चि. सुरेशला अमक्या अमक्या कडून' असं लिहावयास बजावून बजावून सांगत होत्या मालकांना. अवघ्या दीड रुपायाच्या वाटीवर कायमचा स्वतःच्या नांवाचा ताम्रपट खोदून घेण्याच्या कल्पनेचं मला हसूं आलं. मला वाटतं नित्योपयोगी वस्तू ह्या दृष्टीनं स्टेनलेस् स्टीलची भांडी आपण भेट देतों हा सुसंस्कृत मनानं नकळत आणलेला आव तर नसावा? अर्थात् चकचकीत भांड्यावर स्वस्तांत नांवाची जाहिरात करणं हाच हेतू असावा असं कोणी म्हणाला तर त्याची दृष्टी गढूळ, विकारी, विकृत असावी असंच म्हणावं लागेल हें खरं; पण एक मात्र तेवढंच निश्चित की जेथें जेथें म्हणून संधि मिळेल तेथें नांव लिहिल्याशिवाय, मनुष्य सहजासहजीं राहात नाहीं.

नैनिताल ह्या युक्त प्रांतांतील थंड हवेच्या ठिकाणीं 'चीना पीक्' नांवाचं त्या भागांतलं समुद्रसपाटीपासून जास्तींत जास्त उंच (बहुधा ९००० फूट) असं ठिकाण आहे. तेथून हिमालयाच्या बर्फाच्छादित धवल रांगा दिसतात. त्यांतील अहमहमिकेनें जणूं मान उंच करून पहाणाऱ्या पर्वतराशींची नांवें प्रवाश्याला कळावी ह्या हेतूनें 'चीना पीक्' वर एका अर्धवर्तुळाकार बांधलेल्या भिंतीवर वरच्या बाजूला पितळी पत्रा लावलेला आहे नि त्या पत्र्यावर हिमालयाच्या निरनिराळ्या शिखरांचीं नांवेंहि लिहिलेलीं आहेत. पण आज शिखरांच्या नांवांऐवजीं ती टेकडी चढून गेलेल्यांची नांवें त्यावर कोरलेलीं दिसतात. लोखंडी सळीदगडापासून तें मिळेल त्या उपलब्ध हत्यारानं नांव कोरलेलं आढळतं. तेथील कोरलेल्या निरनिराळ्या नांवांवरून एक मात्र कळतं कीं ह्या साऱ्या छोटेखानी 'तेनसिंगांत' जातीचा, धर्माचा, प्रादेशिक भाषेचा किंवा प्रांताचा असा भेदभाव नाहीं. सामाजिक, राजकीय किंवा सांस्कृतिक मतें एकमेकांचा जीव घेण्याइतकी भिन्न नि आततायी असलीं तरी नांवाचा महिमा सर्वांना मान्य आहे आणि

म्हणूनच आग्ऱ्याच्या किल्ल्याच्या देवडीवर, कुतुबमिनारच्या साऱ्या दरवाजांवर, फत्तेपूर सिक्रीच्या जोधाबाईच्या महालावर, अजंठा, वेरुळच्या लेण्यांवर, मिनाक्षी देवळाच्या मंडपांत, वेरुळच्या सभा मंडपांत साऱ्या धर्मांच्या, साऱ्या जातीच्या कक्षेंत येणारीं नांवं आढळतात नि तींहि तारखांसकट.

प्रत्यक्ष देवालयांतून जेव्हां चांदीच्या घंटावरून नि प्रवेशद्वाराजवळील बसलेल्या दगडावर 'दीनदयाल' शेठजींच्या नांवाचा महिमा गाईलेला आढळतो नि त्यांच्या गत पत्नीच्या किंवा मातोश्रीच्या स्मरणार्थ हा सारा खटाटोप असतो तेव्हां मानवी मनाच्या घडणीचं कौतुक करावंसं वाटतं.

खडूनें किंवा रंगीत पेन्सिलीनें लिहिलेल्या नांवापेक्षां दगडावर कोरलेलं नांव जास्त काळ टिकेल ही अपेक्षा कालाच्या दृष्टीनें 'किफायत' ठरली तरी वृत्तीच्या तराजूंत दोघांचंही पुण्य सारखंच. कोणी नांव कायम राहावं म्हणून महाल बांधतो, कोणी स्वतःच्या हातानंच तें कोरतो; तर कोणी साध्या खडूनं लिहिलेल्या नांवातच सार्थक मानून घेतो. उद्देश साऱ्यांचा एकच—प्रथम पुरुषी एकवचन मी नि माझं नांव. इतिहासांत दाखल दप्तर झालेले जयस्तंभ, विजयाचे मनोरे, तोऱ्यानं तळपणाऱ्या दीपमाळा; नि सत्तेची तोरणं लटकावणाऱ्या कमानी हीं सारीं ह्याच वृत्तीचीं, आपापल्या मिजासीला, वैभवाला, सत्तेला साजेशी मोठी प्रतीकं आहेत येवढंच. बाकी साऱ्यांचं मूळ तेंच, चाल तीच, ढंग तोच नि वृत्तीहि तीच. मी आणि माझं नांव.

ह्या नांवाकरतांच लढाया होतात. नष्ट झालेलीं नांवं लोक विसरण्याच्या आधींच दुसरी लाट येते. नि कालची संस्कृति, कालची रचना मागासलेली ठरते, कोसळून जाते. पुन्हां नवी नांवें, नवी बिरुदें, नवीं मूल्यें, नवे संस्कार आणि पुन्हां माणसाच्या अहंमन्य मनांतून

निर्माण झालेलें नवें तत्त्वज्ञान ! पण हें सारं होत असतांना आग्र्याच्या किल्ल्यावर स्वतःच्या नांवाखालीं तारीख लिहिणाऱ्या विद्यार्थ्यासारखीच सर्वांची अवस्था असते. किती दिवस 'काळ' त्यांच्या बाजूला होता एवढाच काय तो निष्कर्ष त्यांतून निघत असला, तरी नांवाच्या नंतर ह्या जन्ममृत्यु दर्शविणाऱ्या सनांच्या आंकड्यांतून ह्या लहान राजाराणींची स्वतःची कारकीर्द दर्शवावी हाच हेतु असावा अशीच शंका येते. आणि मग असल्या गोष्टींतून सेवेपेक्षां स्वार्थाचा, कार्यापेक्षां जाहिरातीचा, दानापेक्षां दिमाखाचा, प्रेमापेक्षां अहंकाराचा, सत्वृत्तीपेक्षां दिखाउ-पणाचाच वास येतो नि वाटतं हें सारं केवळ नांवाकरताच असावं.

'मातीवर चढणें एक नवा थर अंतीं !' असल्या तत्वज्ञानावर जोपासलं जाणारं राष्ट्र, गुप्तदानाचं मोल मानणारं राष्ट्र, कुणाला कळण्याची शक्यता नसतांनाहि वाकडं पाऊल न टाकलेली व्यक्ति, स्वतःला शक्य असूनहि दुसऱ्याला मान देऊं करणारी उदारता, प्रबल असूनही दयाशील असलेली वृत्ति, विजयी होऊनही धुंदी नसलेली सत्ता, ज्ञानी असूनहि गर्व नसणारी विद्वत्ता, केलेला उपकार विसरणारी पण घेतलेली मदत कायम स्मरणारी कृतज्ञता, त्यागाचं मोल देणारी भक्ती, सर्वस्वाची आहुति द्यावयास तयार असणारं प्रेम असल्या क्वचित् आढळणाऱ्या भावनांच्या पोटींच 'नांवांत काय आहे? खरोखरच कांहीं नाहीं' अशा अर्थाची पण आजच्या जगांत निरर्थक ठरलेलीं प्रश्नोत्तरं बसूं शकतात. आणि म्हणूनच वाटतं कीं ह्या भौतिकवादानें ग्रासलेल्या युगांत नांवांत काय आहे हा हास्यास्पद प्रश्न होऊन बसला आहे.

'नांवांतच सर्व कांहीं आहे' हेंच आजच्या जगाचं शंभर टक्के व्यावहारिक सुभाषित आहे. भैरवी भटीयार पेक्षांहि स्वतःच्या नांवाचा आवाज जास्त मधूर, जास्त गोड लागतो, हीच आजच्या कानांना

शिकवण आहे. डेल् कार्नेजी सारख्या चाणाक्ष लेखकाच्या The sweetest music in the world to another person is the sound of his own name, ह्या वाक्याचं रहस्य हेंच आहे. पुरुषोत्तम मानल्या गेलेल्या व्यक्तीहि नांवाच्या ह्या गलबल्यांतच आज तत्त्वाची, प्रतिज्ञांची, श्रद्धांची, शाश्वत मूल्यांची, कळत नकळत सोईस्कर गल्लत करीत आहेत. इतक्या थराला ह्या नामाचा महिमा गेलेला आहे.

आजच्या जगाचा कांहीं घाटच वेगळा आहे. नांव, कीर्ति, जाहिरात, प्रसिद्धी इत्यादि गोष्टींचें महत्व वर्णनापलिकडे आज गेलेलें आहे. आजच्या युगाचं बोधचिन्ह वैज्ञानिक प्रगति दाखविणारं प्रतीक नसून नगारा, ढोल, कर्णे, लाउडस्पीकर, माइक, हार, कॅमेरा, हीच खरी बोधचिन्हं म्हणून सांगावीं लागतील आणि ही सारीं लागतात ती व्यक्तीच्या नांवाभोंवतीं सारखा पिंगा घालायलाच. उद्देश एकच नांव मोठं व्हावं, दिसावं, सर्वांना ऐकू जावं, आणि असा विचार मनांत आला म्हणजे वाटतं उगाच हंसलों आपण सिटी स्टोअर्समधल्या अमक्याकडून असं नांव घाला असं बजावून सांगणाऱ्या बाईला, चीनापीकवर ताम्रपट कोरून ठेवणाऱ्या विद्यार्थ्याला, मनाच्या समाधानाकरतां खडूनं आग्रा किल्ल्याच्या दारावर स्वतःचं नांव नि तारीख लिहून ठेवणाऱ्या प्रवाशाला आणि मासिकांत लेखावर नांव छापायचं राहिलं म्हणून संपादकाला रागावून पत्र लिहिणाऱ्या लेखकाला. आपापल्या परीनं जो तो एकच सत्य सांगतो आहे जगाला ! ! "नांवांतच सारं कांहीं आहे—नांवांतच सारं आहे."

●●●

७

# आरसा

'आज मला बरं वाटत नाहीं. माझा मित्र गेला.' हें वाक्य वाचतांच मला कसंसंच वाटलं. लेखाची सुरवातच अशी होती. म्हणतात ना, मित्रांत पत्नीची प्रीति आणि मातेची ममत असते. मग असा मित्र गेल्याबद्दल कुणाला वाईट वाटणार नाहीं?

भावनांचे स्वर जुळले तरच मैत्रीचा लाभ होतो आणि म्हणूनच मित्रत्वाचे संबंध इतके दृढ असतात, कीं पुष्कळदां वाटतं, मैत्रीच्या मृत्यूपेक्षां मित्राचा मृत्यु बरा! ऐकायला जरा विचित्र वाटतं हें वाक्य पण कांहीं भावनाच इतक्या कोमल, इतक्या हळुवार असतात कीं त्यांचा नाश तर राहुंद्याच, पण त्यांना जरासा धक्का लागलेलासुद्धां चालत नाहीं. मित्रत्वाची भावना त्यांपैकींच आहे. खरं म्हणजे कुठल्याहि निःस्वार्थी प्रीतीची भावना तशीच असते. मला वाटतं, असली प्रीति चार चांदण्या जास्त उगवल्या तर पोळते, कोमल स्वर ऐकूं येण्याइतका वारा सुटला तरी सुकते आणि गोड स्वरहि जरी मध्यमावर गेला तरी तिची कानठळी बसते. ह्या नाजुक वेलीला पोषक ठरतो तो सहानभूतीचा ओलावा आणि फुलवतो निस्वार्थी कळकळीचा नि

मोकळ्या मनाचा हांसरा प्रकाश! 'ईश्वरानं दिलेली अमूल्य भेट म्हणजे मित्र' अशी इंग्रजींत म्हण आहे. साहजिकच हे सारे विचार 'आज बरं वाटत नाहीं. माझा मित्र गेला' हें वाक्य वाचतांच माझ्या मनांत आले. थोडी करमणूक व्हावी, थोडा मनाला विरंगुळा वाटावा म्हणून वाचायला घेतलं तें सुरवातीलाच असलं वाक्य! पुढंहि असंच दुःखी, निराशेचं किंवा तसल्याच जातीचं असणार! पहिल्या घासालाच खडा लागावा तसं वाटलं मला. कशाला उगाच वाचायचं पुढें, असंहि मनांत आलं. पण माणसाचं मन सहजासहजीं माघार घ्यायला कधींच तयार नसतं. स्वतः केलेली चुक तो स्वतःशींहि कबूल करायला तयार नसतो, तर मग इतरांचं काय? आणि मीं पुढचं वाक्य वाचलं. धक्काच बसला मला. 'मला बरं वाटत नाहीं, माझा मित्र गेला' ह्याच्या पुढचं वाक्य होतं–'माझा आरसा फुटला.'

हे लेखक मोठे विचित्र असतात, हें सत्य त्यांच्यासंबंधीच्या उगाळूनउगाळून शिळ्या झालेल्या गोष्टी वाचूनहि मला पटलं नव्हतं; तेवढं ह्या एका वाक्यानं पटलं. सुरवातीला केवढा दुःखाचा आव आणला होतान्. मित्रासारखी अमोल वस्तु हरवली म्हणून शोकाचा पाट वाहणारा अखेरीस कौतुक सांगतो तें एका फुटलेल्या आरशाचं! बिल्लोरी कांचेची ही जगावेगळी किंमत फक्त लेखकच करूं जाणोत पण त्यांच्याशीं वाद करण्यांतहि अर्थ नसतो. पुराणांचे नि इतिहासाचे दाखले पुढें ठेवून ते ताबडतोब गप्प करूं शकतील आक्षेपकांना. मला वाटतं, पुराणांचा नि इतिहासाचा जर सर्वांत मोठा उपयोग असला तर आपल्या विधानाला साजेसे, मानवतील असे दृष्टांत पुरविण्याचा! कुठल्याहि गोष्टीचं समर्थन करण्याकरिता दृष्टांतांचा हमखास दारूगोळा पुरवतात तीं पोथ्यापुराणांचीं नि इतिहासाचीं बाडं! आणि विजयाच्या पताका म्हणून उपयोग होतो ते तसल्या भूमिकेबरहुकूम तयार केलेल्या

महाभागांच्या सुभाषितांचा ! एवढंच कशाला ? बिल्लोरी कांचेची एवढी काय मातब्बरी असं म्हणालांत तर लगेच दशरथाच्या अयोध्येंतील ती पौर्णिमेची रात्र पंचांगांतून शोधून काढून दाखवितील.

प्रभु रामचंद्र चंद्राकरिता हट्ट धरून बसला आहे. त्याचं रडणं थांबत नाहीं, कौसल्या माता पुनःपुन्हा प्रयत्न करूनहि थकली आहे, सगळ्या दासीहि खालीं मान घालून कोपऱ्यांत उभ्या आहेत, दशरथ महाराज शोकाकुल झालेले आहेत, एवढंच काय पण साऱ्या अयोध्या-नगरीवर विषण्णतेची छाया पसरली आहे आणि मग ह्या साऱ्या आकांतावर राज्यसचीव सुमंतानं मात केली ती साध्या आरशांतल्या प्रतिबिंबाच्या साहाय्यानं ! त्या सर्वशक्तीमान् रामचंद्राच्या बाळपणींच आरशानं आपल्या सामर्थ्याची जाणीव करून दिलीच ना ? असा घरोघरीं गीतांतून गायिलेला दाखला ते देतील.

पुराणांकडून मग त्यांचा मोर्चा इतिहासाकडे वळेल. तो भयंकर गड चितोडगड, अल्लाउद्दिन खिलजीच्या निवडक अरब सैन्यानं दिलेला वेढा आणि लढतांलढतां नाइलाजानं त्याला शरण जावं लागलेला मेवाडचा राणा ! पद्मिनीचं रूप पाहिल्याशिवाय तो वेढा काढायला तयार नव्हता नि पद्मिनीचं रूप दाखावणं रजपुतांच्या इतिहासाला साजेस झालं नसतं. अशा आणीबाणीच्या वेळीं कुणीतरी राजकारणी पुरुषानं केवळ आरशाच्या मदतीनं जेत्याला जिंकलं नि शरणागताचं ब्रीद राखलं ! ' आरशांतल्या प्रतिबिंबानंच ना हें सारं साधलं ? असा धमकीवजा प्रश्न इतिहासाच्या सर्वमान्य पार्श्वभूमीवर चिकटवून विचा-रल्यावर, मोठ्या कष्टानं तयार झालेल्या मेवाडच्या राण्यासारखं आपल्याला शरण जाण्यापलीकडं दुसरं काय गत्यंतर ?

आरशाच्या उपयुक्ततेची ही कथा, पुराणं नि इतिहास इथेंच थांबलेली नाहीं. नायिकेनं खलनायकाला हिणवायचं असलं म्हणजे,

किंवा कऱ्हरवरच्या प्रसंगांत, हटकून कसंहि करून विनोद निर्माण करायचाच असा नाटककाराचा आग्रह असल्यावर 'आरशांत जरा तोंड पाहा' ह्या नुसत्या शद्बांच्या सहाय्यानं हवा तो तिरस्कार नि हवा तेव्हां विनोद निर्माण होतोच ना? आणि आरसा तेथेंच थांबलेला नाहीं. चित्रपटांत तर त्याचे उपयोग कितीतरी आहेत. कुठल्याहि चित्रपटांत–धार्मिक धरून–चित्रपटनायिका एकदां तरी ड्रेसिंग टेबलाजवळच्या मोठ्या, जमल्यास तीन तुकड्यांच्या, आरशांत सगळीकडून दाखविलीच पाहिजे हा जणू दंडकच! त्याशिवाय संवादांतील कांहीं वाक्यं 'ऐकवायचींच' असा हट्ट असला नि एकाच व्यक्तीच्या दोन मनांतलं द्वंद्व दाखवायचं असलं म्हणजे तर आरशासारखा 'मित्र' नाहीं दिग्दर्शकाला! ही झाली कैफियत आणि मग वाटतं, जो सबंध अयोध्येला मित्रासारखा वाटला, मेवाडच्या राण्याची मानसिक शांति व अब्रू राखायला समर्थ ठरला, पीटापासून ते सोफ्यापर्यंत केवळ एका वाक्याच्या आधारें हास्याचे फवारे नि टाळ्या मिळवूं शकला, कुठल्याहि चित्रपटांत हजार फूट चित्रपट लांबवायला दिग्दर्शकाला मदत करूं शकला नि कुठल्याहि वयाच्या स्त्रीला नेहमीं जवळ हवासा वाटला, तो अरसा फुटल्यामुळं आपला मित्र गेल्यासारखं वाटलेल्या या लेखकाला मीं तरी कां हसावं?

माधवराव जोश्यांच्या 'म्युनिसिपालिटी' नाटकांत तीन तास पोट धरून हंसलेल्या प्रेक्षकांना नाटकांतला पांडोबा प्रश्न विचारतो, "कुणाला हंसता आहांत तुम्ही? हा सारा गोंधळ तुमचा तुम्हीं केलेला आहांत आणि हें चित्र आहे तें तुमचं स्वतःचं!" असा तात्पर्याचा डोस पाजणारा 'पांडोबा' म्हणजेच तर त्या लेखकाचा बोलणारा आरसा नाहीं ना? आणि मग वाटू लागतं, कीं आरसा जर खरंच बोलूं लागला तर तो असंच सांगेल कीं बाबांनो, बघा माझ्याकडे! तमचं

प्रतिबिंब तुम्हांला दिसेल. राघोबादादाला आरशांतल्या प्रतिबिंबानं शिकवलेलं शहाणपण त्यानं खरं धरलं नाहीं म्हणून मराठी राज्याचा इतिहास वेगळा झाला.

बघा माझ्याकडे नि बोला माझ्याशीं. अगदीं खरंखरं तें सारं बोला आणि मग तुमचं तुम्हांलाच, अगदीं महान् व्यक्तीलासुद्धां, वाटूं लागेल कीं आपण सामान्य आहोंत—अगदीं इतर लोकांप्रमाणंच! आपण फक्त मुखवटे चढविले आहेत प्रतिष्ठेकरितां, मानाकरितां! सौंदर्य-साम्राज्ञीलाहि तिनं आपलं प्रतिबिंब नीट पाहिलं तर कैकयीला दिसलेला पांढरा केस दिसेल नि हाच आरसा एक दिवस जरत्काळचं, सुरकुत्यांचं नि पांढऱ्या केसांचं चित्र आपणांला दाखवील ह्याची जाणीव तिला होईल. मग दैवानं दिलेल्या नि काळ एक दिवस आठवणीनं घेऊन जाणाऱ्या दौलतीची कशाला एवढी मिजास? तरुण योध्याला शिरस्त्राणाचा भारहि सहनं न होणारं, झडलेल्या केशकलापांचं तुळ-तुळीत डोकं आज ना उद्यां दाखविण्याचं सामर्थ्य ह्याच आरशांत आहे. भविष्यकाळाचा विचार करायला लावायाचं सामर्थ्य त्या आरशांत आहे. कैकयीला पांढऱ्या केसानं दाखविलेली भीति सार्थ होण्याआधीं भरताला राज्य, रामाला चौदा वर्षं वनवास नि लक्ष्मणाला नि त्याच्या उर्मिलेला कायमचा वनवास नशिबीं आला, हा कांहीं आरशाचा दोष नाहीं. नुसत्या प्रतिबिंबावर समाधान मानण्याचं शहाणपण लहानपणींच प्रभु रामचंद्राला होतं. आजचं आपलं खरंखरं प्रतिबिंब आणि त्याच्याच मदतीनं भविष्याचं चित्र दाखविणारा नि उद्यांच्या जीवनाचं चिंतन करायला शिकविणारा आरसा साऱ्यांचाच मित्र नाहीं का?

कुरूप म्हणून हिणवल्या जाणाऱ्या चेहऱ्याला आरसा कुठलातरी भाग चांगला आहे असा दिलासा तरी देतो, नाहींतर 'आज ना उद्यां हीच गत सगळ्यांची' असं तत्त्वज्ञान तरी शिकवतो. स्वतःचं प्रति-

बिंब, आरशापेक्षां स्वतःच्या कृतींत पाहा, स्वतःच्या विचारसरणींत पाहा, असा आदेश संतांना देतो, बालकांना तारुण्याची तर कुमारिकेला सौभाग्याचीं स्वप्नं दाखवितो, ढोंगी लोकांना बोचेल असं हंसतो तर सौंदर्याचा दिमाख मिरविणाऱ्यांना घोड्याच्या टापांनी धांवत येणाऱ्या काळाची आठवण करून देतो. विचारवंतांना भविष्यकाळ उज्ज्वल आहे अशी अशा दाखवितो आणि लेखकांना त्यांचं प्रतिबिंब दाखवीत असतांनाच बहुधा म्हणत असावा, 'तुमचं प्रतिबिंब बघितलंत? तसंच अगदीं हुबेहूब जीवनाचं चित्र जगापुढं ठेवा. ढोंगी, रोगट पूर्वग्रहदूषित असं गढूळ चित्र नको. अगदीं आरशासारखं स्वच्छ चित्र जगापुढं ठेवा. मी तुमचा मित्र आहे. भविष्याबद्दल विचार करायला लावायचं सामर्थ्य माझ्यांत आहे. पुढं येणाऱ्या काळाचीं पावलं ओळखलीं नाहींत तर....? तर मी कशाला सांगू काय होतं तें! तुमच्या प्रतिबिंबालाच विचारा.'

असा बोलका अरसा लाभण्याचं भाग्य नि त्या आरशाबरोबर तासन्तास बोलण्याचं वैचारिक सामर्थ्य त्या लेखकांत असेल नि म्हणूनच तो लिहूं शकला, 'मला बरं वाटत नाहीं. माझा मित्र गेला; माझा आरसा फुटला.'

●●●

# ८

# स्मृति

एका बाबतींत सर्वांचं एकमत असतं. नोकरी म्हटली कीं वाईटच असा सर्वांचाच अनुभव! चांगली आणि वाईट नोकरी असा त्यांत भेद नाहीं. असलाच तर चांगली म्हणजे कमी वाईट नोकरी एवढाच असूं शकेल.

नोकरीपेक्षां दुसऱ्याची नोकरी नेहमीच चांगली असते हा ह्यांतलाच आणखी एक गैरसमज, हें जरी खरं असलं तरी रेल्वे खात्यांतल्या एका नोकरीसंबंधीं मला नेहमीच आपुलकी वाटते. 'हरवलें सांपडलें' ( Lost and Found Department) ह्या नांवापासूनच मला त्यांत काव्य दिसतं. आयुष्यांत माणसाच्या वांट्याला हें नेहमींच येत असतं. कांहींतरी हरवल्याची हुरहुर लागावी तोंच, 'हें पाहा इथं आहे' म्हणून कोणीतरी शोध लावतो नि क्षणांत जमलेले ढग जाऊन पुन्हा उन्हं पडावीं तसं होतं.

कुणाला लांबच्या ओळखीच्या माणसाला घ्यायला किंवा त्यापेक्षां जास्त सुखाच्या म्हणजे त्याला पोहोंचवायला स्टेशनवर जायचं असलं म्हणजे मला एकदां तरी त्या कोपऱ्यावरच्या लांबट खोलींत

डोकवावंसं वाटतं. जाड फळ्यांच्या, सबंध खोलीभर असलेल्या लांकडी फळ्यांवर होल्डॉल, छत्र्या, फिरकीचे तांबे, वॉटर बॉटल्स्—मांडून ठेवलेल्या अनंत वस्तू आपल्याला दिसतात. शहरांत वाट चुकलेल्या खेड्यांतल्या माणसाची मला आठवण होते ह्या वस्तूंना पाहून. उगाचच कींव वाटूं लागते त्या साऱ्या निर्जिव वस्तूंची. जत्रेंत हरवलेला मुलगा जसा गळा काढून मला आईकडे पोहोंचवा म्हणत रडतो तसा कांहींसा भास तेथें होतो नि मग वाटतं, त्या मुलाला कोणीतरी निश्चितच मदत करील. जत्रेच्या व्यवस्थेकरता नेमलेले स्वयंसेवक असतील, समाजसेवक धांवून येतील, सर्व व्यवस्था झाल्यानंतर पोलीससुद्धां येतील नि पुन्हा तो हरवलेला मुलगा आपल्या आई-बापाला, भावंडांना भेटेल. पण ह्या अपार्थिव वस्तूंचा वाली कोण?

खरं सांगायचं म्हणजे इतक्या निश्चिंतपणें कुठलीहि वस्तु कुठंहि विसरून जाणाऱ्या माणसांचा मला नेहमींच हेवा वाटत आला आहे. माणसाला विस्मृतीसारखा वर नाहीं अशा मताचाच आहे मी. होल्डाल, टिफिनकॅरीयर, छत्री, थर्मास, वॉटर बॉट्ल, सूटकेसेस् ह्या वस्तू विसरणाऱ्या व्यक्तीला, झालेल्या नुकसानीमुळं निश्चतच वाईट वाटणार पण आपण अमकी चीजवस्तू विसरलों हेंहि तो लवकरच विसरत असल्यामुळं त्याचं शल्य फार वेळ राहात नाहीं हा एक विशेष फायदा!

एका तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापकाची पत्नी त्याच्या खिशांत त्याचं स्वतःचं नांव आणि पत्ता आठवणीनं ठेवीत असे. कारण हे महाशय पुष्कळदां स्वतःचं नांव आणि पत्ता विसरत असत, अशी एक लोकप्रिय कथा आहे. युगानुयुगं तपश्चर्या करून हें साध्य करून घेणाऱ्या श्रेष्ठ साधुसंताइतकाच हा स्वतःलाच विसरून जाणारा प्राध्यापक श्रेष्ठ असूनहि तो बिचारा आपल्या पत्नीच्याहि थट्टेचा विषय होऊन बसतो.

खरं म्हणजे तसं न झालं तरच नवल! जिजाईला तिच्या नवऱ्याबद्दल शेवटपर्यंत हेंच वाटलं. 'आम्ही जातों आमुच्या गांवा, आमुचा रामराम घ्यावा' म्हणत जगाचा निरोप घेणाऱ्या तुकारामालाहि तिनं 'कुठंहि जा पण लवकर या, भाकऱ्या करून ठेवतें' असंच सांगितलं! 'असे पति देवचि ललनांना' ह्या चालीवर जगणाऱ्या स्त्रियांच्या त्या जमान्यांत जर हें घडू शकलं तर आजच्या, आम्हीं पुढं कीं तुम्ही पुढं, ह्या चढाओढीच्या काळांत प्राध्यापकाच्या पत्नीनं नांवाचं नि पत्त्याचं कार्ड खिशांत ठेवलं ह्यांत मोठंसं कांहींच नाहीं. बहुधा ही संभावनाहि विसरभोळा प्राध्यापक तावडतोब विसरत असल्यामुळं त्यास दुःख होत नसावं!

पुष्कळदा वाटतं, ही विस्मरणशक्ति प्रत्येक माणसांत असती तर आजचीं पुष्कळशीं दुःख टळलीं असतीं. एवढंच कशाला, सीता-स्वयंवराच्या वेळीं, शिवधनुष्यप्रसंगीं दशानन रावण जानकीचं तें अपमानकारक हास्य विसरूं शकला असता तर रामायणच झालं नसतं! सबंध ग्रहांवरहि ज्याची सत्ता, सारं ज्ञान ज्याला झालेलं, अति पराक्रमी अशा दशाननाला एक सौभाग्य-कांक्षिणी, त्या मानानं लहानशा राज्याची राजकन्या हंसते म्हणजे काय? हें रावण विसरूं शकला नाहीं आणि स्वयंवरांत जमलं नाहीं तें त्यानं कपटानं करून दाख-विलं. धर्मराज आणि अर्जुनहि पुष्कळसं विसरायला आणि कांहींसं सोडा-यला तयार असतांनासुद्धां भगवान् कृष्णानं आपल्या 'संभवामि युगेयुगे' च्या धर्माला जागून त्यांना युद्धाला प्रेरित केलं. 'द्रौपदीची विटंबना कौरवांनी केली, लाक्षाग्रहांत तुम्हांला जाळण्याचा प्रयत्न केला, अभिमन्यूला एकटा चक्रव्युहांत गांठून मारला, द्रौपदीला दुःशा-सनानं अंकावर बसायची आज्ञा केली'—एक ना दोन! आजच्या नाटकांतल्या एखाद्या दुय्यम पण महत्वाच्या पात्रासारखं तेव्हां

भगवान श्रीकृष्ण बोलले असतील नि म्हणूनच तें महाभारत झालं. तसं जर झालं नसतं तर सुईच्या अग्राइतकीहि जागा न देणाऱ्या दुर्योधनाला सुयोधन म्हणून पांडव कुठंतरी सहज राहूं शकले असते. धर्मराज द्यूत खेळत राहिला असता, अर्जुन सुभद्रेबरोबर कुठंतरी संसार थाटून राहिला असता आणि त्यामुळं सुभद्रेच्या एकट्याच झोपाळ्यावरचा केस सोडलेल्या फोटोऐवजीं जुन्या घरांतून दोघांचे झोपाळा सोडून त्याच झाडाखालीं बसलेले फोटो दिसले असते. भीमाची गदा नि अर्जुनाचं गांडीव, नकुल-सहदेवांच्या तरवारी शमीच्या झाडावर पडून राहिल्या असत्या, पण तसं व्हायचं नव्हतं आणि आजहि होत नाहीं.

माझा एक देशभक्त मित्र आहे. स्वातंत्र्योत्तर काळांत त्यानं भोगलेल्या कष्टाचं दामदुपटीनं सोनं झालं आहे, पण त्याचा देशभक्त कसा झाला ही कथा मोठी मनोरंजक आहे. अर्थात् त्याच्या एकावनाव्या किंवा एकसष्ठाव्या वर्षीं निघणाऱ्या स्मृतीग्रंथांत लहानपणापासूनच टिळकांचा शिष्य, राष्ट्रीय वृत्तीचा, स्वार्थत्यागी—असलीं विशेषणं लिहिलीं जातील पण वस्तुस्थिति मात्र तशी खास नाहीं. अर्थात् हें त्याच्याच स्मृतीग्रंथांत किंवा आत्मचरित्रांत होणार असंहि नाहीं. हल्लीं ही प्रथा इतकी सर्रास चालू आहे कीं माझे एक रसिक ग्रंथपाल मित्र, चरित्रांनासुद्धां 'कादंबरी' सदरांत घालून त्या विभागांतल्या कपाटांत मांडून ठेवतात.

एखादी अप्रिय आठवण कुणाला तत्वज्ञ करते, कुणाला कपट करायला लावते, कुणाला एखाद्या विशिष्ट करणीमुळं योगायोगाच्या सहाय्यानं देशभक्त करून ठेवते. ह्या एका बाबतींत आठवणीचा फायदा असला तरी माणसाला मला वाटतं, विस्मृति हा वरच ठरला असता. कारण, सुखद आठवणींपेक्षा माणसाला नेमकं आठवतं तें कांहींतरी

बोचणारं, खुपणारं असंच असतं आणि म्हणूनच मला वाटतं, कीं 'गरिबांची सत्ता असते ती फक्त स्वप्नांवर नि जुन्या आठवणींवर ' हें सुभाषित जरी वरवर ह्या स्मृतीमहात्म्याची तरफदारी करणारं असलं तरी तें सत्य नाहीं. गरिबांची सत्ता स्वप्नांवर रहावयास कांहींच हरकत नाहीं; कारण बोलूनचालून तीं स्वप्नंच! पण आठवणीवरची सत्ता त्यांच्याच सुखाच्या दृष्टीनं खालसा व्हायलाच हवी.

माझ्या एका मित्राची मला नेहमींच दया येते. हिरव्या नोटा किंवा चेकस्च्या पलिकडे त्याच्या हाताला नि पाकिटाला संवय नाहीं. बँकेतले आंकडे सहस्त्राकडून लक्षाकडे धांव घेत आहेत. घरांतल्या आल्हादकारक चैनीच्या वस्तू लावी पक्षीण आणि तिचीं पिलं अशा थाटांत वाढत आहेत. तरी तो दुःखी आहे. कारण त्याची स्मृति एकदम त्याला पूर्वीच्या काळांत ओढून नेते. विव्हल मनानं तो मला सांगतो, ह्या वर्षीच्या सत्तर हजार रुपयांच्या फायद्याचा मला कांहीं उपयोग नाहीं; माझी एकुलती एक बहीण आजारी असतांना एका देशी कंपनीचं साडेतीस रुपयांचं औषध मला तेव्हां आणतां आलं नाहीं; त्या आजारांतच ती गेली. किती पैसा मिळाला तरी ती मातीच आणि मग वाटतं, ही आठवणच नको होती.

गरिबांच्या जगांत तर असल्याच आठवणींचं राज्य! शाळेची फी नाहीं म्हणून कुणाचं शिक्षण बंद, हुंडा द्यायला नाहीं म्हणून फिसकटलेलं लग्न, आजारीपणांत कर्जाऊ घेतलेले पैसे वेळेवर परत न करता आल्यामुळं सहन करावीं लागलेलीं मुक्ताफळं, एक ना दोन! सगळीकडे नुसत्या उन्हाळ्याच्या झळाच! भाऊसाहेब खांडेकर म्हणतात, 'आठवण म्हणजे मनाला आलेलं पत्र' पण सर्वसामान्य माणसाला आलेल्या असल्या पत्रांना सुखाचं तिकीट कधी लागलेलंच नसतं. बेरंग असल्यामुळं दामदुपटीनं दुःखच पदरीं येतं नि वाटतं, नकोच तीं पत्रं; नकोच त्या

आठवणी नि नकोच त्या स्मृतीमहात्म्याचे पाठ !

त्या ओळीनं फळीवर मांडून ठेवलेल्या वस्तूंकडे पाहून त्यांना विसरून जाणाऱ्या व्यक्ती ह्या बाबतींत निश्चितच सुखी असतील अशी खात्री वाटूं लागते नि वाटतं, कीं सांगावं, ह्या अपार्थिव वस्तूंना कीं तुम्ही तुमची कामगिरी केलीत—प्रवासांत तुमच्या मालकाला अंथरूण पुरवलंत, ऊनवाऱ्यापासून रक्षण केलंत, अन्नपाणी पुरवलंत; त्यांनीहि तुमची सेवा पदरांत घेतली नि तो गेला त्याच्या पुढच्या प्रवासाला....मग वाटतं, कीं जत्रेंत हरवलेल्या मुलांच्या तोंडावळयाच्या ह्या वस्तू नाहींतच मुळीं ! आयुष्यांत सारं कर्तव्य संपवून पैलतिरीं नेत्र लागलेली, वरून येणाऱ्या चिठ्ठीची वाट पहात बसलेली ही वयोवृद्ध अनुभवी मंडळी आहेत.

•••

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५९८८ वि: निबंध
क्रमांक ........ नों: दि: ३०/११/६७

९

# रिकामी खुर्ची

एका अमेरिकन मजूर संघटनेचा गेल्या पन्नास वर्षांच्या कारकीर्दीचा अहवाल वाचतांना त्यांतल्या एका छायाचित्रानंच माझं मन संपूर्णपणें वेधून घेतलं. खरं म्हणजे त्या संघटनेनं केलेली प्रचंड प्रगति, आजचा तिचा व्याप, तिच्या शक्तीची राज्यकर्त्यांना असलेली जाणीव, कांहीं गरीब मजूरांनीं अर्धपोटी राहून सुरुवातीला जमविलेल्या लहानशा रकमेचें, आजच्या आठदहा आंकड्यांच्या रकमेंत व बऱ्याच स्थावर नि जंगम मालमत्तेंत झालेलें रूपान्तर, लोककल्याणार्थ केलेल्या व करीत असलेल्या कार्याचें विधायक स्वरूप, अशा कितीतरी आकर्षक हकिगती त्या अहवालांत होत्या. पण त्याच्यांत माझं मन रमेना.

जाहिरातीचं तंत्र व मंत्र उत्कृष्टपणें माहीत असलेल्या नि मुद्रणशास्त्रांत आघाडीवर असलेल्या अमेरिकन देशांतील एका संघटनेचा तो अहवाल होता. पहिल्या पानापासून ते शेवटपर्यंत आकर्षक स्वरूपांत छापलेल्या नि लोकसेवेची आंकडेवारी पानोपानीं दिलेल्या त्या अहवालांत माझं मन रमेना. त्या अहवालांत पुरवणीवजा छापलेल्या

३२२३

जुन्या छायाचित्रांतल्या पहिल्याच छायाचित्राकडे पुन्हां पुन्हां माझं लक्ष जाऊं लागलं. अगदीं साधा फोटो होता तो. फार पूर्वी घेतलेला. त्या मजूर संघटनेच्या संस्थापकांचा. पिळाच्या, लांकडाच्या जुन्या खुर्च्या, ॲब्राहम लिंकोलन् पद्धतीच्या विजारी, सात बटनांचे कोट, बॉयलर बूटस् घातलेल्या अमेरिकन मजूरांचा ग्रूप फोटो होता तो. मोजकीं दहा बारा मंडळीच होती. सहा खुर्च्या व मागें सहाजण उभे, असल्या नेहमींच्या थाटांतली. पण त्या सहा खुर्च्यांपैकीं मधली एक खुर्ची रिकामी होती. प्रथम त्याचं हंसू आलं मला. हास्याची जागा मग आश्चर्यानं घेतली नि त्यानंतर माझ्या अज्ञानाचं, प्रथमदर्शनीं झालेल्या मनानं करून घेतलेल्या समजुतीचं नि म्हणूनच टिंगलवजा उमटलेल्या माझ्या हास्याचं मला हसूं आलं.

ज्या दिवशीं तें छायचित्र घेण्यांत आलं होतं, त्या दिवशीं त्या संस्थापकांपैकीं एक दिवंगत झालेला होता. पण त्याची अखंड आठवण, त्यानं केलेली मदत, त्याचा त्याग यांना विसरणं शक्य नव्हतं नि म्हणूनच त्याचा नश्वर देह पंचमहाभूतांत विलीन झालेला असला तरी त्याच्याकरितां मनांतच नव्हे तर फोटोंतहि जागा होती. त्या रिकाम्या खुर्चीच्यामागें जिवंत मनाचा, कृतज्ञ मनाचा इतिहास होता. मला वाटलं माझं तें हंसणं आजच्या अतिबौद्धिक विचारसरणीचं प्रतीक असावं. इतक्या श्रद्धेनं, प्रेमानं जपून ठेवलेल्या भावनांना आज आपण सहज हंसतों. पुष्कळदां टिंगल करतों नि बुद्धिवादाच्या आवरणाखालीं ‘ आपलंच बरोबर ’ अशी स्वतःची स्वतःला शाबासकी देतों. लहानपणीं मला एका क्रमिक पुस्तकांत वाचलेल्या एका इंग्रजी कवितेची आठवण झाली. एका लहान मुलीला, तुम्ही किती भावंडं आहांत असं कवि विचारतो, नि ती उत्तर देते “ We are seven. (आम्हीं सातजण आहोंत.)” पांच भावंडंच फक्त कवीला दिसतात. पण त्या मुलीनं तिच्या

दोन पार्थिव देह सोडून गेलेल्या भावडांनाहि जमेंत धरलेलं असतं नि आम्हीं सातजणच आहोंत असा तिचा आग्रह असतो. हें सारं बुद्धिवादाच्या निकषावर व न पटणारं, गणितशास्त्राच्या दृष्टीनं चुकीचं नि व्याकरणांतील वर्तमान नि भूतकालविचाराच्या चौकटीला अमान्य असलं तरी त्या मुलीचं तत्वज्ञान श्रद्धेनं न्हालेलं होतं नि बंधुप्रेमानं नटलेलं होतं नि म्हणूणच 'आम्ही सातजणच आहोंत' असं ती म्हणू शकली होती.

मला वाटतं, आजच्या जगांतली पुष्कळशीं दुःख ह्या श्रद्धेच्या अभावींच आहेत, निदान पुष्कळशा सुखांना तरी आपण श्रद्धेच्या अभावींच अंतरलों असंच मला वाटतं. "बुद्धीचा शेवट झाला म्हणजेच श्रद्धेचा जन्म होतो" अशा विचारसरणींत पोसल्या गेलेल्या आजच्या जगांत, अपरिपक्व मनाचे लोक, श्रद्धा आणि अज्ञान ह्यांची चुकीची सांगड घालतात नि केवळ बुद्धिवादी आहोंत, आम्हीं अज्ञानी नाहीं ह्या जाहिरातीकरितां अत्यंत हळुवार भावनेनं, कृतज्ञतेनं, प्रेमानं केलेल्या कृतींना उगाचच हंसू लागतात. केवळ पैशाच्या जोरावर शक्य झालेल्या नि सात समुद्राच्या पर्यटनानंतर परत आलेल्या एका नटीकडे घडलेल्या एका प्रसंगाची मला नेहमीं आठवण येते. भारताचा एक प्रसिद्ध संगीत–दिग्दर्शक त्या मेळाव्यांत होता. तोहि तिच्या परदेशाच्या दौऱ्यांत तिच्याबरोबर होता नि जर्मनींत असतांना त्यानं एक किंमती कॅमेरा विकत घेतला होता. त्या नटीनं पुष्कळ आग्रह करूनहि त्यानें तिचा फोटो घेतला नव्हता. नव्या कॅमेऱ्यांत दुकानदारानं घालून दिलेली फिल्म न वापरतां तशीच हिंदुस्थानांत परत आली होती.

बर्लिनच्या इमारती, रोमचे मॉसोलियम् पॅरिसचे इफेल टॉवर, स्वित्झरलँडची रमणीय सृष्टिशोभा, व लंडनचे बिगबेन् टॉवर आणि

त्या नटीचा स्वतःचा फोटो घेण्याचा आग्रह ह्या कुठल्याहि स्वर्गीय, सृष्टिजन्य व मानवी वस्तूंचा फोटो घेण्याचा मोह त्याला झाला नाहीं व म्हणूनच ती चार चित्रपटांनीं श्रीमंत झालेली नटी त्या संगीत-दिग्दर्शकाला हंसत होती नि नटीला शोभणाऱ्या नखऱ्यानं नांवं ठेवीत होतीं. स्वतःच्या कलेंतच धुंद असलेल्या कलावंतानं त्या नटीच्या लाडिक, नखरेल बोलण्याकडं संपूर्णपणें दुर्लक्ष केलं होतं नि बनारसी ठुंमरीच्या हरकती गुणगुणतांना कुठलेहि फोटो न घेण्याचं रहस्य मला सांगितलं होतं. कोंकणांतल्या अजूनहि वीज नि पाण्याचा नळ नसलेल्या नि दोन दिवसाआड पोस्टमन जाणाऱ्या एका खेड्यांत त्याची म्हातारी आई राहात होती. राहातं घर नि वाडी सोडायला ती तयार नव्हती आणि तिचा हा कलावंत पुत्र पैशानं धनिक झाला असला तरी तिला विसरला नव्हता. त्याच प्रदेशांत काबाडकष्ट करून तिनं त्याला वाढवलं होतं नि मुंबईपर्यंत प्रवासाला पुरेल इतकं नाणं जमवलं होतं. परदेशांतून आणलेल्या त्या कॅमेऱ्यांत भरून दिलेला रोल म्हणूनच न वापरतां त्या खेड्यापर्यंत गेला होता. नि त्या संगीत दिग्दर्शकानं प्रथम आपल्या जन्मदात्या आईचा फोटो घेतला होता. तालसुरांच्या प्रांतांत नांव मिळविलेल्या त्या कलावंतानं काढलेला फोटो कसा काय काढला होता कोणास ठाऊक पण त्याच्या प्रेमभावनेची तीव्रता मला निश्चितच जाणवली. निर्जीव छायाचित्राच्या साम्राज्यांत नांव, पैसा नि कीर्ति मिळविलेल्या नटीला स्वतःचं छायाचित्र घेण्याचा आग्रह करूनहि नाकारणाऱ्या कलावंताचा राग येणं जितकं साहजिक आहे, तितकंच कोमल स्वरांच्या आवर्तनांत गुंगलेल्या संगीत दिग्दर्शकाला वृद्ध मातेचा फोटो घेतांना, सुरकुतलेल्या चेहऱ्यावरचा आनंद जगांतल्या साऱ्या दृश्यांपेक्षां श्रेष्ठ वाटणं साहजिक. पण नटीच्या घरी जमलेले लोक प्रसंगाला साजेशी हास्याची साथ करीत होते. श्रद्धा आणि अंधश्रद्धा

ह्याची गल्लत करणारे, श्रद्धा आणि अज्ञान ह्याची चुकीची सांगड घालणारे माझ्यासारखे सामान्य लोक ह्यापेक्षां दुसरं तरी काय करणार ?

याच संदर्भांत मला एक प्रसंग आठवतो. दुसऱ्या महायुद्धानंतरची सत्यकथा आहे ती. देशाच्या हांकेला साद घातलेल्या एका लेखकानं लेखणी मोडून बंदूक हातांत घेतली होती. **युद्धस्य कथा रम्याः** अशी ग्वाही मात्र युद्धाहून जिंकून परत येऊनहि तो देऊं शकला नव्हता. त्याच्या लेखकाच्या नि कवीच्या हृदयस्पंदनाकडं त्यानं तात्पुरतं बंदुकातोफांच्या आवाजामुळं दुर्लक्ष केलं असलं तरी अशाच एका प्रसंगीं त्याचं हृदय उसळून आलं होतं. विजयानं धुंद झालेला हा लेखक आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्यांच्या सकट खेड्यांतील एका घरांत जातो नि भयभीत झालेल्या दोन स्त्रिया—एक वृद्ध स्त्री आणि तिची मुलगी—जिवाच्या भीतीनं सारखी विनवणी करूं लागतात. तेवढ्यांत, 'त्यांच्या घरांत शस्त्रास्त्रं तर लपवलीं नाहींत ना ?' असं अधिकाऱ्यानं विचारतांच सैन्यानं घरांत हवा तसा धुडगुस घातलेला असतो. आणि मोडतोड करीत असतांना एक मोठी लांकडाची पेटी आणून ते समोर ठेवतात. ती तरुण स्त्री, आईला सोडून, जिवाचीहि आशा सोडून ती पेटी सैनिकांच्या हातून हिसकावून घेते नि 'कांहीं करा, पण त्या पेटीची मोडतोड करूं नका' असं परोपरीनं विनवते. यशांत मर्यादा राखणं लोकोत्तमानांहि कठीण जातं, नव्हे अशक्य होतं, मग ह्या साध्या सैनिकांना कोण दोष देणार ? त्या पेटीचीहि मोडतोड करण्यांत येते. चार—पांच लहान वस्तूंबरोबर एका लहानशा पारदर्शक पेटींत वाळलेलं गुलाबाचं फूल असतं. इतकं करून कांहींच घरांत मिळालं नाहीं म्हणून चिडलेले सैनिक त्या वस्तूंचा नि फुलांचा चोळामोळा करून टाकतात. आणि त्याच वेळीं मुळांतच लेखकाची संवेदना असलेल्या नि सैन्यांतले कपडे चढविलेल्या

अधिकाऱ्याला तिचा शोकाकुल हंबरडा ऐकूं येतो. गेलीं सहा वर्षं तिचा प्रियकर त्याच्या देशाच्या रक्षणार्थ आघाडीवर असतो. आणि त्यानं दिलेल्या फुलाकडं पाहून ही युवती दिवस काढीत असते. त्यांच्या प्रणयाचं आयुष्यांतल्या अति आनंदाच्या क्षणाचें तें प्रतीक विजयानं धुंद झालेले सैनिक कायमचं धुळीस मिळवितात नि हें त्या लेखकाला कळतांच, जाणवतांच "मोडतोडींतच आनंद मानणाऱ्या सैनिकांना ह्यांतलं काय कळणार? दुसऱ्यांच्या भावनाविवशतेंतहि बोचणारं विकट हंसण्यापलिकडं हे सैनिक काय करणार?" असं तो चिडून म्हणतो आणि नटीच्या भोंवतालीं जमलेल्या नि संगीत दिग्दर्शकाला हंसणाऱ्या गर्दीकडे पाहून मला लेखकाच्या ह्या वाक्याची आठवण न झाली तरच नवल! जुन्या श्रद्धा आजच्या जगानं मागासलेल्या म्हणून झुगारून दिल्या आहेत, धर्माला अफू, देवदेवतार्चनाला व्यसन, श्रद्धेला अज्ञान नि नितांत सुंदर भावनांना ढोंग असा शेरा मारून एक प्रकारचं नीरस, अश्रद्ध जीवन आज आपण जगूं लागलों आहोंत.

जुन्या श्रद्धा, जुनीं दैवतं आपण मूर्तिभंजकाचा हातोडा हातांत घेऊन मोडून टाकलीं आहेत. पण नव्या श्रद्धा मनांत रुळलेल्या नाहींत. आदर्श दैवतांचे आराखडेहि आपल्या हृदयांत नाहींत आणि म्हणूनच कुठल्या मार्गानं जायचं हें निश्चित नसलेल्या जहाजाप्रमाणें तेवढ्यापुरत्या प्रभावी वाटणाऱ्या वावटळीबरोबरच आपल्या विचारांचं तारूं भटकत राहात असावं असंच मला वाटतं.

मोतीलाल नेहरू, प्रथमच तुरुंगांत गेलेल्या जवाहराला निजायला बिछाना नसेल म्हणून स्वतःहि आपल्या अलिशान आनंदभवनांतही साध्या फरशीवर निजतात, अशी बातमी प्रसिद्ध होतांच, ढोंग म्हणून हंसणाऱ्या नि हळुवार भावनेची टवाळी करणाऱ्या माझ्या परिचयांतील एका माणसामुळें, संगीत दिग्दर्शकाला नांवं ठेवणाऱ्या नटीमुळें, फुलांच्या

रूपानं जपलेल्या जीवितसर्वस्वाचा नाश होतांच हंसणाऱ्या सैनिकांमुळें, पांच भावंडं हयात असतांना सात भावंडं आहोंत असं सांगणाऱ्या मुलीला ‘खुळी’ म्हणून हिणवणाऱ्या अरसिकामुळें नि त्या फोटोंतल्या रिकाम्या खुर्चीला हंसणाऱ्या माझ्यासारख्या माणसामुळेंच आजच्या जगातलं पुष्कळसं समाधान, पुष्कळसा आपलेपणा, नि कितीतरी मोठा आनंदाचा ठेवा आपण गमावून बसलों आहोंत. बुद्धिवादाच्या वरवरच्या आवरणामुळें आपण असं वागूं लागत असलों तर स्वतःकडे कधींच दोष घ्यायला तयार नसलेलं माणसाचं मन “यंत्रयुग आलं, यंत्रयुग आलं” असा टाहो फोडून ह्या साऱ्या दोषाचं खापर “आजच्या यंत्रयुगांत माणसंसुद्धां यंत्रासारखीच वागणार” असं शास्त्रीय मत देऊन मोकळं होतं, पण निदान मला तरी हें पटणं शक्य नाहीं.

खरं म्हणजे यंत्रयुगामुळेंच जन्मलेल्या मजूरसंघटनेच्या अहवालांतच तो नवा धडा शिकविणारा फोटो होता; त्याच फोटोंत ती रिकामी खुर्ची होती; ज्या खुर्चीकडं पाहून मी चुकीनें हंसलों होतो, अगदीं तीच रिकामी खुर्ची होती.

●●●

१०

# पाट्या आणि पाट्या !

एकटंच फिरायला जायला मला फार आवडतं. अर्थात् असं करतांना माझ्याबरोबर फिरायला यावयास कुणी तयारच नसतं किंवा मला कोणी आलेलं आवडत नाहीं असं नाहीं. ‘गर्दीचं खरं सुख एकटेपणांतच असतं’ असल्या विरोधाभासाच्या चौकटींत बसविलेल्या कोष्टकानं सुखाचं मोजमाप करायचं असतं म्हणून मला एकटं फिरायला जाणं आवडतं असंहि नव्हे. कोणी बरोबर असलं म्हणजे सारा वेळ गप्पांतच जातो नि त्यापेक्षां कितीतरी चांगल्या गोष्टींना आपण अंतरतों.

अगदी साधीच गोष्ट घ्या ना. बोलण्यांत रंगलेलं असलं कीं रस्त्यावर जागोजागीं लावलेल्या पाट्यांकडे आपलं लक्षसुद्धां जात नाहीं. खरं म्हणजे रस्त्यावरचे हे फलक मोठे बोलके असतात. त्यांच्या संगतींत रस्ता नि वेळ कसा संपतो हें मला कळतसुद्धा नाहीं. ‘पुढें मुख्य रस्ता आहे. वेग ताशीं ५ मैल’ ही पाटी मीं कितीतरी वेळां वाचली आहे; मुख्य रस्त्याकडे येतांना हीच पाटी मला प्रथम दिसते आणि ‘वत्सा सावकाश’ असा प्रेमळ इशारा देणारी ही पाटी वाचतांच

रुमाल बांधलेले, लांब कोट घातलेले, कानांच्या मागं येणाऱ्या गोल काड्यांचा चश्मा घालणारे आजोबा समोर उभे राहतात. आपल्या नातवाला पुढील आयुष्याच्या वाटचालींतले धोके समजावून सांगणारे, जीवनाच्या धकाधकींत वेग सांभाळायला लावणारे आजोबा ह्या पाटीच्या रूपानं मनांत येतात नि मग आपण एकटेच आहोंत हा विचारसुद्धां मनांत येत नाहीं! जुन्या आठवणी मनांत चाळवल्या जातात. उच्च शिक्षणाकरिता गांव सोडून जात असतांनाचा प्रसंग आठवतो; निरोप द्यायला आलेले आजोबा आठवतात. आणि त्या फलकावरच्या 'पुढे मुख्य रस्ता आहे; वेग ताशीं पांच मैल' ह्या प्रकाराऐवजीं धोतराच्या सोग्यानं आधीं चश्मा नि ओलसर झालेल्या पापण्या पुसणारे आजोबा दिसतात.

हा विचार मनांत असतांनाच बरंचसं अंतर चालून झालेलं असतं आणि 'हॉर्न वाजवू नका' असं लिहिलेली लाल 'अधिक' चिन्ह असलेली पाटी दिसते. ही पाटीसुद्धां मला फार आवडते. आमच्या राहत्या घरीं हॉर्नचा त्रास होतो. रहदारीची, वाहनांची कटकट होते म्हणून नव्हे, तर त्या पाटींतच प्रेमळपणा जाणवतो. 'हॉर्न वाजवूं नका' हें वाचतांच 'बाळ झोपलं आहे. उगाच आरडाओरड करूं नका.' असं सांगणाऱ्या प्रेमळ मातेची आठवण होते. एखादं कोमल स्वरांचं अंगाई गीत गाऊन आई लहानग्या बाळाला निजवीत असावी आणि त्या बाळापूर्वीं ह्या जगांत येऊन हिंडूं-फिरूं लागणाऱ्या त्याच्या दादा-अक्कांचा लपाछपीचा डाव रंगांत यावा, त्यांनी 'सुट्योऽऽ' ची आरोळी ठोकावी किंवा 'रेडी' ह्या आंग्ल शद्बांचा 'लेऽऽडी' असा त्या वयाच्या भाषेंत जोरानं उच्चार करावा नि आईनं नाकावर नि ओठावर बोट ठेवून 'ओरडूं नका. बाळ झोपलंय्' असं कौतुकानं, प्रेमानं सांगावं तसं वाटतं ही दवाखान्याची, 'हॉर्न

वाजवूं नका ' ची पाटी वाचून.

सर वाल्टर ग्रेपियस् नांवाच्या एका प्रसिद्ध वास्तु-शिल्पज्ञाच्या मतानं कुठल्याहि देशांतील वास्तुशिल्प म्हणजे त्या देशांतील सुबत्तेच्या, ऐश्वर्याच्या, सुधारणेच्या दर्जाचं एक महत्त्वाचं द्योतक असतं. मला वाटतं, हे रस्त्यावरचे निरनिराळे फलक नि आदेश देणाऱ्या, बजावून सांगणाऱ्या पाट्यांच्या बाबतींतच हें जास्त योग्य होईल. सुधारणेच्या दर्जाबरोबरच शिक्षणाचा, सरसकट बुद्धीचा दर्जा कळतो तो त्या गांवांतल्या, देशांतल्या पाट्यांवरूनच ! अमेरिकेसारख्या समृद्ध देशांत रस्त्यावरच्या पाट्याहि मोठ्या मनोरंजक आहेत. ' फक्त तुम्हांलाच डोकं असतं, मोटारीला नसतं, तेव्हां जरा जपून. ' ही पाटी किंवा ' हव्या तेवढ्या वेगानं मोटार हाका ! चुराडा झालेला माल विकत घेऊं शकूं. ' असल्या पाट्या जगत देशांतच असणार !

रेल्वे क्रॉसिंगशेजारीं लावलेली एक भलीमोठी पाटी अशीच मनोरंजक आहे. " आज सकाळीं रेल्वे लाइनवर झालेल्या अपघातांत एक मनुष्य इहलोक सोडून गेला; प्रयत्नांतीं त्याच्या भग्न, विदीर्ण देहाचे सर्व अवयव मिळाले. पण मेंदू मात्र सांपडला नाहीं. ओव्हर ब्रिज् डाव्या बाजूला आहे. " त्या देशांतील सुशिक्षित समाजाची जाणीव ह्या विनोदगर्भ सूचना देणाऱ्या पाटीमुळं सहज होऊं शकते.

स्फोटक द्रव्य तयार करणाऱ्या कारखान्यांच्या आवारांतहि अशीच पाटी आहे. ' सिगारेट ओढूं नका ! ' असं साधं बाळबोध तऱ्हेनं सांगण्याऐवजी " सिगारेटची राख टाकूं नका; राखेचा एखाद्या वेळेस फार मोठा ढीग व्हायचा आणि त्या ढिगांत कदाचित् तुमचीहि राख असावयाची. काय नेम ! " अर्थात् असल्या पाट्या लावणाऱ्या नि समजणाऱ्या प्रजेचा शैक्षणिक दर्जा कुठल्या प्रतीचा हें उघड आहे. विद्यार्थ्यांच्या वसतीगृहाच्या आवारांत, मुख्यतः जिथें

पालकांना भेटायची परवानगी असते अशा एका आवारांत अशीच खोडसाळ पाटी लावलेली आहे. "केर वाटेल तिथें टाकूं नका. कदाचित् तुमच्या मुलालाच उद्या साफ करावा लागेल!" ह्या नि अशाच खोडसाळ, विनोद-गर्भ पाट्या बघितल्या म्हणजे दांत कोरीत मिस्किलपणें हंसणाऱ्या माणसाची आठवण होते. जगांतील अत्यंत गंभीर आणि करुणरसप्रधान प्रसंगाकडेहि हंसऱ्या डोळ्यानं पाहणाऱ्या माणसाची मला आठवण होते.

'रस्ता येथें ओलांडावा' ह्या पाटीचं आकर्षणहि कांही वेगळंच आहे! एखाद्या शाळेची ट्रिप असावी नि नेहमीच्या पाटीपुस्तकांच्या दप्तराऐवजी दोन गांठी मारलेल्या कापडांत खाण्याचे डबे बांधून जाणारीं मुलं दिसतात नि दोघादोघांच्या रांगेंत चला; फक्त दोन-दोन असं म्हणत गळ्यांत वॉटरबॉट्ल अडकवलेली, चापून चोपून पातळ नेसलेली, स्वच्छ शिक्षिका डोळ्यासमोर येते, खाकी रंगाचा कोट नि मळकं धोतर नेसलेले करड्या चेहऱ्याचे पण प्रेमळ स्वभावाचे शिक्षक समोर दिसतात नि वाटतं, शाळेंतील स्मृति नाहींशा झाल्या असल्या तरी हा फलक आजहि तितक्याच प्रेमानं वळण लावीत आहे; नियमांचं पालन करायला शिकवीत आहे.

रस्त्यावरचं नागमोडी वळण आकृतींच्या सहाय्यानं दाखविणाऱ्या कांहीं पाट्या असतात. रस्त्यावरच्या शालेय शिक्षणाची ही बहुधा 'मॉंटेसरी मेथड' असावी. असल्या पाट्यांमुळं मला आठवण होते ती आयुष्यांतल्या आडवळणांत ठेंच लागलेल्या एखाद्या नातेवाइकाची, मित्राची. "माझ्या हातून हें झालं, चुकून झालं. पण तुमच्या हातून होऊं देऊं नका!" असं मोठ्या आर्जवानं, हातवारे करून सांगणाऱ्या पश्चात्तापानं पोळलेल्या गृहस्थाची.

ह्या सर्वांपेक्षा मला मनापासून आवडतो तो स्टेशनवरचा

फलक! "मदत हवी का?" ह्या अवघ्या तीन शब्दांचा फलक पाहून मला फार आनंद होतो. असं लिहिलेला फलक दिसला म्हणजे 'जगांत माणुसकी नाहीं' असं सुतकी चेहरा करून म्हणणाऱ्यांची मला कींव करावीशी वाटते. ह्या मोठ्या फलकाखालीं टेबलाच्या आमोरासमोर खुर्ची मांडून बसलेला कर्मचारी बघितला म्हणजे केव्हां दीपस्तंभाची आठवण होते, तर केव्हां 'सदैव तत्पर रहा' असं सांगणाऱ्या दोन खिशांचा खाकी शर्ट नि खाकी चड्डी, बूट, मोजे नि गळ्यांत निळा स्कार्फ बांधणाऱ्या, सदैव मदत करावयास तत्पर असलेल्या बालवीराची आठवण होते.

ह्या झाल्या माझ्या आवडीच्या पाट्या. सगळ्याच पाट्या एवढ्या प्रेमळ नसतात. माणसांतच फक्त वेगवेगळ्या 'जाति' आहेत असं नाहीं; तर पाट्यांतहि आहेत. "याद राखा! बघून घेईन" असला दरडावणीचा अडाणा घुमणाऱ्या पाट्याहि कांही कमी नाहीत. 'थुंकूं नका', 'प्रवेश बंद', 'धुम्रपानास बंदी' असल्या उद्धट पाट्या बघितल्या म्हणजे 'डावा–उजवा', 'डावा–उजवा' करीत चालणाऱ्या पोलिसांची तुकडीच डोळ्यांसमोर येते! एका हातांत दंडुका नि दुसऱ्या हातानं मिशीला पीळ भरीत दरडावणाऱ्या नि चावडीवर नेण्याची भाषा शिव्यांच्या सुरांत ऐकविणाऱ्या खाकी कपड्यांतल्या शिपायांचीच आठवण होते.

कांहीं पाट्या तर चक्क वकिलाच्या रजिस्टर्ड नोटिशीसारखा दम भरतात. "हा रहदारीचा रस्ता नव्हे; उल्लंघन करणाऱ्यावर कायदेशीर इलाज करण्यांत येईल!" अशी धमकीवजा पाटी असते, तर कुठं एकाद्या कडक शिक्षा करणाऱ्या प्रिन्सिपॉलनं पहिलाच गुन्हा झालेल्या विद्यार्थ्याला तंबी द्यावी अशा थाटाची, 'यू हॅव बीन् वार्न्ड' 'याद राखा' अशा चालीची पाटी दिसते. असल्या ह्या वकिली, रखवालदारी

नि फौजदारी पाट्या वाचल्या म्हणजे प्रेमळ नातेवाईकांची, अपकारकारक मित्रांची नि भूतकालांतील हलक्या प्रसंगांची आठवण करून देणाऱ्या पाट्यांबद्दल जास्त आपलेपणा वाटूं लागतो.

दुकानांच्या पाट्यांत कांहीं वेगळीच गंमत असते. ह्या पाट्या चवीनं वाचल्या तर विनोदी लेख वाचण्यापेक्षांहि जास्त करमणूक होते. अर्थात् ह्या पाट्या नजरेंत भरतात त्या अगदी सकाळीं; दुकानं बंद असतात तेव्हांच! मालकासमोर न बोलणाऱ्या, उत्तर हिंदुस्थानांतील नोकरांसारखी असते ह्यांची जात. केशकर्तनालयाला शिवाजीपासून सुभाषपर्यंत आणि पॅलेसपासून सलूनपर्यंत सर्व तऱ्हेनं गौरविलेलं असतं. चांगल्या इंग्रजी शद्बांची आणि त्यांच्या उच्चारांची अगदी तैलरंगांत मिरविणारी लांडगेतोड बघितली म्हणजे भारतीयांचा इंग्रजाविरुद्धच नव्हे, तर त्यांच्या भाषेविरुद्धहि किती राग होता ह्याची स्पष्ट कल्पना येते.

त्याबरोबरच माडीवाले कॉलनी महिला मंडळ, डेक्कन जिमखाना वनिता समाज, श्री न्यू जनता को-ऑपरेटिव्ह क्लब, कऱ्हाड स्टूडंटस् हितकारी संस्था असल्या धर्म नि भाषेचं सख्य दाखविणाऱ्या पाट्या वाचल्या म्हणजे धोतरावर बुशशर्ट नि हॅट घालणाऱ्या माणसाची आठवण होते, तर ‘वक्तृत्वोत्तेजक मंडळ’ ‘कोकणस्थ हितवर्धक ग्राम निधि स्वाध्याय मंडळ’ असल्या वजनदार पाट्यांनीं खांद्यावर ओला पंचा टाकलेला, जुना मुकटा नेसलेला, आडवं गंध लावलेला, जानव्यानं पाठ खाजविणारा सनातनी समोर दिसतो.

अगदी नेमकी ह्याच्या विरुद्धहि पाट्यांची एक जात आहे. प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक ॲसोसिएशन्, ईस्ट ॲन्ड् वेस्ट फॅटर्निटी ग्रुप, इन्स्टिट्यूशन् ऑफ वेलफेअर वर्क्स’ असल्या थेट पाश्चिमात्य नांवांनी विभूषित असलेल्या पाट्या पाहिल्या म्हणजे कडक इस्तरींतल्या

सुटांतले, नेकटाय् बूटवाले, चिरूटाच्या उग्र वासाचे धूर सोडणारे, ओठांतल्या सिगारेटींतून निघणाऱ्या धुरामुळें एक डोळा बारीक करून लाडकं बोबडं इंग्रजी बोलणारे लोक समोर उभे राहतात.

सगळ्यांत मौज वाटते ती एकाच मोठ्या इमारतीवर असलेल्या वेगवेगळ्या पाट्यांची. अपटुडेट स्वीट होम नि ओगलेज् टायपिंग क्लासच्या बरोबरीनं हाडें चोळण्याचें नि बसविण्याचें ठिकाण, तीन वर्षांत मॅट्रिक, कुंडली नि हाताचा आराखडा काढलेली, तुमचं भविष्य वर्तमानांत सांगणारी होरारत्नांच्या नांवाची पाटी, 'स्कूल ऑफ इंडियन् म्युझिक' असं मराठींत लिहिलेली पाटी नि ह्या सर्वांच्या शारीरिक सुखव्यवस्थेची काळजी वाहणाऱ्या स्पेशॅलिस्टांच्या पाट्या नि भांडण झाल्यास कायदा कोणाच्या बाजूचा आहे हें फीच्या मानानं बदलून मत सांगणाऱ्या वकील-सॉलिसिटर्सच्या पाट्या ही गल्लत बघितली म्हणजे लग्नमुंजींत काढलेल्या ग्रुपफोटोची आठवण होते. त्या फोटोंतहि 'आमच्या वेळीं असं नव्हतं' सांगणारी आजी जरी भरलेला शालीचा कोपरा पुढ्यांत घेऊन बसलेली असते, साखर, तेल नि आंबेमोहोराचा भाव चौपटीवर गेला सांगणारे मोठे काका, ताईचं पातळ प्रथमच नेसणारी बबी, पॅन्ट-कोट घालून कॉलेजच्या व्हरायटीला जाणारा अण्णा, फोटोंत दिसेल अशा बेतानं सरी आणि मोहनमाळ घालणारी काकू, गंधर्व फॅशन टोपी घातलेला भैय्या, खर्चाचा नि कर्जाचा बोजा तोंडावर स्पष्ट दिसत असलेले वडील, श्रमानं नि काळजीनं त्रस्त झालेली आई, डोक्यावर टोपीचीहि जबाबदारी पेलूं न शकणारी भांग पाडणारी तरुण मंडळी अशा परिवाराचीच एखाद्या मोठ्या इमारतीवरील चित्र-विचित्र पाट्यांनी मला आठवण होते.

ह्या साऱ्या पाट्या, हे सारे फलक लवकर सकाळीं फिरायला

गेलों म्हणजे मला एकांतांत भेटतात. हे माझे नित्याचे सोबती आहेत. प्रेमळ आजोबा, मायाळु आई, शाळा मास्तर, मदत करणारा स्काऊट, दरडावणारा पोलिस, भिवविणारा वकील, पळीपंचपात्री घेतलेला सनातनी नि सुटाबुटांतली मंडळी ह्या वेगवेगळ्या स्वरूपांत भेटतात, बोलतात नि म्हणूनच एकटं फिरायला जायला मला फार फार आवडतं.

●●●

११

# भरलेलं बाळ

प्रत्येक पिढीचं एक ठरून गेलेलं वैशिष्ठ्य असतं नि तें म्हणजे मागच्या पिढीला मागासलेलं म्हणणं नि पुढच्या पिढीला शेफारलेलं. तबल्याच्या शाईसारखा घेरा नि शेंडीला हंसणारे आधुनिक मध्यम वर्गीय, तितक्याच तिटकाऱ्यानें पुढच्या पिढींतल्या केसाच्या संजाबाला तमाशांतल्या बाल्यासारखे केस म्हणून हिणवत असतात.

जाकीट नि सांखळीच्या घड्याळांची टिंगल करणारे सूटधारी आधुनिक बुशशर्टस्‌ना, नव्या पिढीनं पोलकीं घातलीं म्हणून हंसत असतात. आणि ह्याच्या मागें असतं तें एकच. प्रत्येक पिढीला वाटतं, आपल्या पूर्वीचे मूर्ख व पुढच्या पिढींतले फाजील.

परवांचंच पहा ना! मुलगी पहाण्याच्या एका समारंभाला मला हजर राहावं लागलं होतं. मुलगा परिचित होता व मुलगी एका वयस्क मित्राची सौ. कां. कन्या असल्यानें मुलाला बरोबर नेण्याची कामगिरी माझ्याकडेच होती. मुलगी बघायची ही पद्धत राक्षसी, बाजारी, दानवी, मानवी कीं दैवी, कुठलीहि का असेना, पण पिढ्यान् पिढ्या चालू आहे एवढं मात्र खास. बदल झाला आहे तो फक्त हुंडा

मागण्याच्या पद्धतींत. इतक्या हजारांचे दागिने नि इतकी रोख रक्कम, ह्यांच्याऐवजीं, दोन्हींकडचा खर्च, मेडिकल कॉलेजचं शिक्षण होईपर्यंतचा खर्च, इंग्लंडची फेरी इत्यादि सोज्वल वाटणाऱ्या पण त्रासदायकच ठरणारी पद्धती आली आहे एवढंच. ज्या माझ्या मित्राच्या घरीं हा समारंभ होता तो जुन्या पिढींतला, गंधर्वांच्या, स्वयंवरांतल्या गाण्यावरच अजून लुब्ध असणाऱ्यांपैकीं होता. त्याच्या घरांत—दोन खोल्यांच्या—पहिल्या खोलींत भावी जामात येऊन मुलगी पहाणार होते. खोलीचा थाट अगदीं ठरलेल्या सांच्याचा होता. खिडकीजवळ अमदाबाद मिल्सच्या चादरीनं जमिनीपर्यंत झांकलेला पलंग होता. पट्ट्यापट्ट्याच्या कॅनव्हासची आरामखुर्ची होती. अलिकडेच घेतलेली म्हणून नव्या पॉलिशाची वाटणारी साधी खुर्ची, नि रंगसंगती नसलेलं गोल टेबल वेणीच्या जमवलेल्या दोऱ्यानं विणलेल्या रुमालानं झांकलेलं होतं. भिंतीवर, कृष्णीवर स्वार झालेल्या शिवाजीचं नि उजव्या बाजूला चला असं तलवारीनं दाखविणाऱ्या त्याच्या जीवलग म्होरक्यांचं चित्र होतं. 'मेलिन्स फुड' चं टिकल्यांनीं नि रेशमी कापडानं भरलेलं बाळ होतं. मोठ्या मुलीच्या लग्नांतला फोटो होता. वडलांचा–घरांतल्या एका फोटोवरून मोठा केलेला पुसट फोटो होता. कोपऱ्यांतल्या फळीवर पुस्तकं होतीं. जागा मिळेल तेथें व्यवस्थितपणें ठेवलेल्या गृहोपयोगी वस्तू होत्या.

असल्या घरांत माझ्या ऑफिसांतला गोविंद जोगळेकर माझ्या-बरोबर येतांच त्यानं कपाळावर आठ्या घातल्यान्, कसली तरी एकदम भयंकर घाण यावी अशी नाकाची हालचाल करूं लागला. नि 'वा!' असं म्हणून लांबलचक सुस्कारा टाकलान्. ह्या भारताच्या भावी आधारस्तंभाला कुठल्या दृश्यानं एवढं निराशावादी केलंन् हें मला कळेना. कांहींतरी खुपतं आहे, चुकतं आहे, अशा भावनेनंच तो वागत

होता, वावरत होता. माझ्या मित्राच्या चेहऱ्यावरील कारुण्याचा भास स्पष्ट होता. मुलीनें लाजत लाजत आणून दिलेले शिरा पोहे न लाजतां त्यानें खाल्ले नि ' सांगतों ' एवढंच सांगून माझा परिचित उठला. मीहि त्याच्याबरोबर जाणं शिष्टसांप्रदायाला धरून होतं. निदान त्यानं ' नापसंत ' असा शेरा मारीपर्यंत, स्वार्थाच्या दृष्टीनं महत्वाचं होतं. त्याच्या मानानं मुलगी फारच सुंदर होती, पण लग्न त्याला करायचं होतं नि त्याच्या होकाराचा प्रश्न होता.

बाहेर येतांच, " किती मागासलेले लोक हे हो ?" असा त्यानें तुच्छतापूर्वक हंसून मला प्रश्न केलान्. धक्काच बसला मला. युरोपांतच सारी हयात गेलेल्या एखाद्या व्यक्तीनं फुंकणीनं चूल पेटविणाऱ्या बाईकडे बघून जसा प्रश्न करावा तसंच वाटलं मला. ऐन कुठलीशी म्हणतात ना त्या पंचविशींतला होता तो. सारा जन्म ह्याच प्रांतांत, ह्याच देशांत गेलेला. नि ह्याला मागासलेलं, हिणकस असं काय दिसलं एवढ्या पंधरा मिनिटांत ! ! त्याचा आरोप होता तो त्या भरलेल्या बाळावर, रविवर्म्याच्या व्हिक्टोरियासारख्या दिसणाऱ्या सीतेच्या नि रामपंचायतनाच्या फोटोवर, शिवाजीच्या भरलेल्या तसबिरीवर, कु. गोदावरी हे नांव रेशमानं लिहिलेल्या तसबिरीवर. लग्नांतल्या ठराविक सांच्याच्या फोटोवर, निऱ्या करून ठेवलेल्या मुकट्यावर, लाल कपड्यांत व्यवस्थितपणें गुंडाळून ठेवलेल्या पोथ्यांवर. संस्कृति, संस्कृति म्हणून ज्यांचा अहोरात्र आजची पिढी नि त्यांचे आजचे पुढारी टाहो फोडत आहेत, त्याच खऱ्याखुऱ्या अर्थानं संस्कृतीला जपणाऱ्या, जोपासणाऱ्या सर्वसामान्य माणसाच्या घरांतल्या प्रत्येक चीजवस्तूवर. त्याच्या रागाची भूमिका होती ती हीच कीं पूर्वीचं सारं ओंगळ, आजचं तेवढं सोज्वळ. नि पुढचं सारं उथळ. " केसरी वाचायला ती आरामखुर्ची उपयोगी पडेल मला, लग्न केलं

तर. नि इतिहास संशोधनाच्या दृष्टीनंहि पुष्कळशा वस्तू आहेत त्या घरांत." एवढं म्हणून तो वात झाल्यासारखा हंसला नि 'अच्छा' म्हणून निघून गेला.

मुलीसंबंधीं मत विचारायचा प्रश्नच उरला नव्हता. त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहून मला वाटलं, प्रत्येक पिढीचंच हें एक प्रतीक असावं. मागच्या पिढीकडे अशीच पाठ फिरवून ती निघून जाते. टोपी घालायला सुरवात करणाऱ्या पिढीनं फेटे पगड्यांकडे अशीच पाठ फिरविली होती एके काळीं. नि केसांचं जाळं डोक्यावर घेऊन हिंडणाऱ्या आजच्या युवकानं त्याच दिमाखानं ती टोपी उडवून दिली होती. तोच दिमाख, भरलेल्या बाळाला हंसण्यांत, शिवाजीच्या फोटोकडे तुच्छतेनें बघण्यांत नि त्याच्या दृष्टीनें इतिहास संशोधनाला पोषक असलेल्या माझ्या मित्राच्या खोलींतल्या 'सेटिंग'ला हिणविण्यांत होता. असं करत असतांना प्रत्येक पिढी एक महत्वाची गोष्ट विसरत असते कीं उद्यांची पिढी आपणाला असंच मूर्ख, मागासलेले म्हणून हिणवणार आहे. मनुष्यस्वभाव म्हणून ह्याकडे दुर्लक्ष करावयाला पाहिजे. आणि तसंच होतंहि. पण असल्या कुचेष्टेच्या मर्यादा जेव्हां वरवरची फॅशन सोडून श्रद्धेकडे, जुन्या पिढींतल्या सात्विकतेकडे वळतात तेव्हां मात्र निश्चित हानि होण्याचा संभव असतो. 'काल हा एक महान शिक्षक आहे' हें खरं, पण पुष्कळदां त्या शिक्षणाचा मोबदला म्हणून सबंध पिढी खर्ची पडण्याचाहि संभव असतो, हें विसरून चालण्यासारखं नाहीं.

टीका आणि कुचेष्टा ह्यांचा अतिरेक झाला म्हणजे काळ सूड घेतो असं म्हणतात. आजच्या जगांत असंच झालं आहे. केवळ जुनं म्हणून विचार न करतां कांहींतरी सोडल्यानं उगाच कांहींतरी नवीन म्हणून आपण जवळ केलं आहे. मनुष्य कितीही बुद्धिमान् झाला तरी

त्याला कसला तरी आधार हवाच असतो. त्याच्या मनांतील अहंमन्यता जुनं तसंच्या तसं त्याला स्वीकारूं देत नाहीं. पण कांहींतरी नवीन म्हणून का होईना त्याला आधार म्हणून घ्यावं लागतंच. नि तो तसं करतोहि. फरक एवढाच कीं मांडणी बदलते, थोडी विचारांची दिशा बदलते. आकार बदलतात. पण मूळ भूमिका असते ती भरलेल्या बाळाच्या विचारसरणीचीच.

प्रत्येक काळांत ज्याच्या त्याच्या सुधारणेच्या दृष्टीचं, टप्प्यांचं मोजमाप ठरविणाऱ्या चीजा असतात. 'भरलेलं बाळ' ही एका पिढींतल्या विशिष्ट दर्जाच्या कुटुंबांतील अशीच लोकप्रिय चीज होती. त्यांत हंसण्यासारखं नि वेडावून दाखविण्यासारखं, किंवा केवळ त्याच्या-मुळें भावी वधूच्या मानसिक विचारांचा दर्जा ठरविण्याइतकं त्याला महत्त्व देण्याची जरुरी नव्हती. पण प्रत्येक पिढीला नव्या फॅशन्स्, नवे विचार असल्या साऱ्यांची धुंदी असते. त्यांतच भरलेल्या बाळाच्या उपहासव्वजा वागणुकीचा उगम असतो. नाविन्याच्या हौसेंतून जुन्याला तिटकारण्यांत आनंद वाटतो. बुद्धीला पटेल, तर्काला रुचेल असं त्यांत कांहींच नसतं.

मला वाटतं माझ्या मित्राच्या घराला हंसणाऱ्या जोगळेकराच्या खोलींतहि अशाच वस्तू असतील. भरलेल्या बाळाची जागा नटराजानं घेतलेली असेल. शिवाजीच्या फोटोऐवजीं चायनीज् गॉड ऑफ हॅपिनेस्ची बैठी चिनी मातीची प्रतिमा असेल. लाल बासनांत गुंडाळलेल्या पोथ्यांऐवजीं अिब्सेन् शॉचीं अर्धवट समजलेलीं न समजलेलीं नाटकं असतील. रविवर्म्याच्या व्हिक्टोरियासारख्या दिस-णाऱ्या सीतेची जागा, ठराविक चेहऱ्याच्या पुष्ट उरोजाच्या उत्तान अवस्थेंतल्या पार्वतीच्या कॅलेंडरनें घेतली असेल. निऱ्या करून ठेवलेल्या मुकट्याची जागा लॉन्ड्रींत टाकायच्या विजारीनें व्यापली

असेल. टेबलाची जागा ग्लास टॉपच्या कॉफी टेबलनें घेतलेली असेल. शिवाजीच्या तसबिरीच्या ऐवजीं प्लॅस्टर ऑफ परीसचा टागोर किंवा बुद्ध असेल. आणि हें सारं आजच्या पिढीच्या दृष्टीनं लोकमान्य ठरलेलं, चोखंदळ वृत्ति दर्शविणारं भासत असलं किंवा बुद्धिवाद्यांना शोभेल असं असलं तरी उद्यांचा जोगळेकर ह्या सर्वांना तितक्याच तुच्छतेनं हंसणार आहे. वस्तू बदलल्या, आकार बदलले, रूप बदललं, पण मानव तोच आहे. विचारांची भूमिका तीच आहे. मनांतला अहंभाव तसाच आहे आणि म्हणूनच भरलेल्या बाळाला हंसणारी आजची पिढी पुढच्या पिढीलाहि हंसता यावं म्हणून घराघराच्या कोपऱ्यांत दिसणारा नटराज ठेवून जाणार आहे आणि मानवी मनाची ठेवणच आमूलाग्र जोपर्यंत बदलत नाहीं तोपर्यंत भरलेलं बाळ काय किंवा ब्रॉंझचा नटराज काय, वैचारिक गुलामगिरीच्या दृष्टीनं दोन्हीं सारखींच ठरणार आहेत.

●●●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम ३५६८२ वि: निबंध
क्रमांक .......... नों. दि. ३०/११/६८

१२

# न सुटलेले प्रश्न

फार वर्षांपूर्वींची गोष्ट. मी कॉलेजांत असतांनाची. कॉलेजांतील आठवणी म्हटल्या-बरोबर टपोऱ्या डोळ्यांची कुणीतरी मुलगी माझ्या डोळ्यांत भरलेली असावी, किंवा वेषभूषेंत रंगसंगती साधणाऱ्या एखाद्या यामिनीनें 'नाहीं मी बोलत' म्हणून माझ्या आयुष्याचा रंग कायमचा फिका करून टाकला असावा किंवा गॅदरिंगच्या नाटकांतलं नातं नाटक संपल्यावरहि न विसरतां पुढं चालू ठेवणाऱ्या नाट्यगान निपुण कलावतीची असावी, किंवा बॅडमिंटनच्या खेळांत शटल देतांना होणारा ओझरता स्पर्श 'कर हा करीं' कायमचा धरून शुभमंगल सावधानच्या ललकारीनं धार्मिक ठरवून टाकलेल्या प्रसंगाची असावी, असा अंदाज केला तर निदान ह्या गोष्टीपुरता तरी तो चुकीचा ठरेल. माझी ही आठवण काव्यापेक्ष गद्याकडे, सौंदर्यापेक्षां व्यवहाराकडे, नि मनोरंजनापेक्षां उपयुक्ततेकडे झुकणाऱ्या मध्यमवयाच्या साच्यांत बसणारी आहे.

वयाच्या मानानं आवडी निवडी बदलतात तशा आठवणीहि बदलतात कीं काय कोण जाणे पण शाकुंतल पाठ असलेल्या

कॉलेज विद्यार्थ्याला प्रथम कांहीं वर्षं जरी शकुंतला नि वाढत्या यौवनाबरोबर घट्ट होणाऱ्या चोळीसंबंधीच्या शकुंतला प्रियंवदेच्या संवादाच्या ओळींची आठवण झाली तरी वाढत्या वयाबरोबर नि काळ्या केसांची जागा पांढरे केस अडवूं लागल्याबरोबर, 'अर्थेहि कन्या परकीय एव' म्हणणारा नि 'सेवि गे वडिलाजना, सवतिना तूं हो प्रिया मैत्रिण,' असा उपदेश करणारा पांढऱ्या शुभ्र दाढीचा कण्वच आठवत असावा. घनश्याम लतिकेच्या पहिल्या अंकांत रंगणाऱ्या तरुण प्रेक्षकांचेहि त्यांच्या स्वतःच्या जगाच्या रंगभूमीवरील लांबलेल्या अंकांत पुढें धुंडीराजाचं पात्रच रुमालाची घडी डोळ्याला लावायला भाग पाडतं हा संकेतच आहे नि बहुधा म्हणूनच मलाहि आज कॉलेजांतील यौवनांचीं कारंजीं उडविणाऱ्या प्रसगांऐवजीं साध्या विषयांतील एका प्रश्नाची आठवण झाली. तत्त्वज्ञानाचा वर्ग चालू असतांना 'आधीं वृक्ष कीं आधीं बी' हा तो प्रश्न होता. अर्थात् हा अगदीं सर्वोदयी थाट सोडला तर 'आधीं कोंबडी कीं आधीं अंडें' असा आजच्या हवामानाला साजेसा प्रश्न धरूं या. ह्याबद्दल वर्गांत ऊहापोह चालला होता. मला वाटतं आज विश्वविद्यालयांत शिकविल्या जाणाऱ्या विषयांत तत्त्वज्ञान हा असा एकच विषय असावा कीं जो जास्तींत जास्त रुक्षपणे शिकवितां येऊं शकेल नि म्हणूनच बहुधा हा विषय घेणाऱ्या मुलामुलींचा तोंडावळा त्या विषयाला साजेसा असतो. तत्त्वज्ञान म्हटलं कीं लगेच जाड चष्म्याचे, किलकिल्या डोळ्याचे विद्यार्थी, कानाच्यामागें काड्या आलेल्या चष्म्याच्या, किडकिडीत मुली नि काचा मारलेली, लांड्या धोतराची नि सरळ काळी टोपी घातलेली मोजकीं मुलं, रुमाल बांधलेल्या प्राध्यापकाचं आध्यात्मिक विषयावरचं रुक्ष व्याख्यान कांट, डेकार्टस् त्याकाळीं काय म्हणाला हें ऐकत, तास झाल्याचे सगळे ठोके संपल्याशिवाय जागेवरून

हलत सुद्धां नाहींत, असं एक चित्र समोर येतं पण सुदैवानं आमच्याबाबतींत तसं नव्हतं. तत्त्वज्ञान न घेतलेलीं मुलंहि वर्गांत दाटीवाटीनं येऊन बसायची इतकं उत्कृष्ट आमचे तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक कवीश्वर शिकवीत असत. नांवाप्रमाणेंच शिकवीत असत. योग्य शद्बांच्या सरी पडायच्या, विषय धाडकन समोर यावयाचा नि त्याचं अंग नि अंग डोक्यांत ठसायचं, त्यावेळची ही आठवण आहे. तेव्हांच आधीं वृक्ष कीं आधीं बी हा न सुटणारा प्रश्न पुढें आला. नचिकेताला न सुटलेले प्रश्न तेव्हांच सांगण्यांत आले नि वाटलं आयुष्यांत नाहीं तरी न सुटणारे प्रश्नच जास्त असतात.

पूर्वींच्या काळीं सुजलाम् सुफलाम् असल्यामुळें प्रश्न होते ते सारे साकार, निराकर, सगुण, निर्गुण ह्या थाटाचे नि त्या मानानें फार थोडेहि; पण आजच्या जगांत प्रश्नच फार आहेत. बिचाऱ्या धर्मराजाची यक्षप्रश्नांच्या तावडींत सांपडल्यामुळें कींव येण्याचे दिवस केव्हांच संपले. मोजके प्रश्न ते. पण आज....? आयुष्य हेंच एक प्रश्नचिन्ह होऊन बसलेलं आहे. आजच्या जगाचं प्रतीक कोणतं असं विचारलं तर सामान्य मनुष्य ‘ प्रश्नचिन्ह ’ हेंच सांगेल. आयुष्यांतील ह्या प्रश्नांत विश्वविद्यालयीन परीक्षेंत सोयीसाठीं असलेल्या ऐच्छिक प्रश्नांचीहि तरतूद नाहीं. सगळं केलंच पाहिजे, झालंच पाहिजे ह्या धाटणीचं नि म्हणूनच सामान्य मनुष्य नचिकेतासारखा अडखळतो नि अखेरीस न सुटलेल्या प्रश्नांचा पिच्छा पुरविण्यासाठीं ऋषीमुनींच्या ठायीं जरूर असलेलें सामर्थ्य नसल्यामुळें न सुटलेले प्रश्न तसेच सोडून देतो नि केव्हांतरी स्यादवादी दृष्टिकोनाचा कळत नकळत आश्रय घेतो. ‘ मी कोण ? ह्या प्रश्नाचें उत्तर स्वतःचे वडलांच्या सकट नांव, धंद्यासकट उल्लेख नि पोस्टाच्या पत्त्यासकट गांव, मनाला सांगून तेंच खरं धरून मोकळा होतो. तो स्वतःच इतक्या जिकीरीला आलेला असतो कीं आधीं वृक्ष

कीं आधीं बी ? ह्या प्रश्नापेक्षां त्या वृक्षाला फळं आलीं कां नि आलीं असल्यास शेरावर स्वस्त कीं डझनानं स्वस्त एवढाच प्रश्न काय तो लक्षांत घेतो.

नचिकेताला भेडसावलेले प्रश्न त्याला अजिबात त्रास देत नाहींत, पुढील जन्मीं कोणती योनी ह्याचा विचार करायला त्याला ह्या जन्मीं वेळहि नसतो. ब्रह्म आणि माया ह्यापेक्षां त्याला प्रश्न असतो तो चार भिंतींच्या घराचा नि घरखर्चाला लागणाऱ्या मायेचा, द्वैतअद्वैताची चिकित्सा करायला त्याला वेळ नसतो, भविष्यापेक्षां वर्तमानाकडेच त्याला लक्ष द्यावें लागतें नि त्याची सारी धडपड असते ती आदीअंत नसलेल्या अनंत काळाकडे नसून त्यानें आपल्या कुवतीप्रमाणें करून घेतलेल्या त्या कंटाळवाण्या काळाच्या लहानश्या तीस दिवसांच्या तुकड्याकडे आणि म्हणूनच तो इतर भलत्या प्रश्नांकडे वळत नाहीं.

मला वाटतं म्हणूनच तो आपल्या मनाची अशी समजूत करून घेतो कीं सगळेच प्रश्न सुटण्यासारखे नसतात. कांहीं प्रश्न सोडून दिले म्हणजे सुटतात आणि बाकीचे प्रश्न न सुटलेले असले तरी त्यामुळें त्याला त्याचं कांहीं सुखदुःख नसतं, आणि असंच माझंहि असलं तरी न सुटलेले प्रश्न पुष्कळदां विचारांची जागा अडवून बसतात. गिरगांवांतल्या गर्दीच्या फूटपाथवर एक मनुष्य स्टोव्हचे चार काकडे नि पिना घेऊन बसलेला मला नेहमी दिसायचा. नि वाटायचं येवढ्यावर सकाळ संध्याकाळ ह्याच्या ताटांत कशा का प्रकारचं म्हणा जेवण कसं पडतं. कितीसे लोक काकडे घेणार, कितींच्या स्टोव्हना पिना लागणार नि त्यांतून ह्याला काय मिळणार. ह्या हिशोबांत माझी विश्वविद्यालयाची अर्थशास्त्राची मोठी पदवी खर्ची पडूनहि तो प्रश्न अजून न सुटलेलाच आहे. अजूनहि केव्हां रस्त्याच्या कडेला त्याला पाहिला म्हणजे हा साधा प्रश्न मला 'मी न सुटलेला' सांगून मोकळा होतों. इतक्या

धकाधकीच्या जीवनांत सकाळपासून संध्याकाळपर्यंत हळू हळू रांगेत सरकणाऱ्या मुंबईकरांच्या चेहऱ्यावर हास्य कसं दिसू शकतं हा मला नेहमीच प्रश्न पडतो. मला न सुटलेले प्रश्न असेच साधे आहेत.

पुष्कळदां बरंच फिरून आल्यानंतर हिरवळ बघून बसायचं ठरवलं म्हणजे कांहींजण खिशांतून रुमालाची घडी काढतात नि एकदा झाडून खालीं बसण्यापूर्वीं हंथरतात. हें बहुधा त्यांच्या स्वच्छतेचं निदर्शक म्हणून असावं नि त्यामुळेंच ते असं करीत असावेत. पण नंतर खालीं मळलेला रुमाल घडी करून पुन्हां खिशांत ठेवायचा नि त्याच रुमालानें तोंड पुसायचें हें स्वच्छतेच्या शास्त्रांत कसं बसतं हा अगदीं साधा न सुटलेला प्रश्न. अगदीं तितकाच साधा न सुटलेला प्रश्न म्हणजे प्लॅटफॉर्मवर असलेल्या माणसाला खिडकींतून पाहून आंत जाईपावेतों हवी तेवढी जागा दिसते नि तो आंत जाऊन बसतांच भलतीच गर्दी कशी भासते हा!

दुसऱ्याच्या औषधाचा चमचा लहान नि औषध गोड निदान कमी कडू वाटणें, दुसऱ्याच्या परीक्षा सोप्या नि पेपर त्याहून सोपे वाटणें, विरोधी पक्षाच्या पुढाऱ्यांच्या यशांत गुणापेक्षां नशिबाचाच हात जास्त आहे असें वाटणें, आपल्या विश्वविद्यालयाच्या मानानं इतर विश्वविद्यालयें निदान आपण घेतलेल्या विषयांत तरी भिकार आहेत ही खात्री असणं, स्वतःचीं दुःखं नि दुसऱ्याचीं सुखं हटकून मोठीं वाटणं, आपल्या लायकीचं योग्यतेचं स्थान आपल्याला कधींच मिळालेलं नाहीं, ही समजूत असणं, नियतीनं भरलं माप आपल्या पदरांत कधींच ातलं नाहीं, ही रुखरुख असणं, राजकारणावर चर्चा करायला फक्त वर्तमानपत्र पुरे असा आग्रह असणं, कुठल्याहि भाषेचा अभ्यास नसतांना आपली मातृभाषाच श्रेष्ठ समजणं नि त्याबरहूकूम वेळीं अवेळीं बोलणं कसं जमतं हें आमच्या युगांतले

न सुटणारे प्रश्न आहेत नि मग वाटतं आधीं वृक्ष कीं, आधी बी ह्या प्रश्नाचं उत्तर कांहीं असलं किंवा तो कायमचा न सुटणारा असला तरी त्याची कांहीं हरकत नाहीं पण आजचे हे साधे प्रश्न भयंकर आहेत, ठिणगी वाटली तरी विश्वव्यापी आग होण्याचें सामर्थ्य त्यांत आहे, नि म्हणूनच वाटतं कीं, ह्या साऱ्या प्रश्नांचीं उतरं देणारा धर्मराजहि हवा नि वर देणारा यक्षहि हवा.

●●●

१३

# अतिरेक

"डेनिस् कॉम्प्टनला द्वाररक्षकानें अडवलें !" हा वर्तमानपत्रांतला मथळा वाचतांच मला हसूं आलं. ज्याचा खेळ बघायला मिळावा म्हणून हजारो ऑस्ट्रेलियन आठ आठ तास तिकिटांकरिता रांगेंत उभे राहतात, त्या डेनिस् कॉम्प्टन्जवळ त्याची प्रवेशपत्रिका नसल्यामुळें मेलबोर्न येथील एम्. सी. सी. विरुद्ध ऑस्ट्रेलियन संघाच्या सामन्याच्या वेळीं द्वाररक्षकानें त्याला स्टेडियमवर जाऊं दिलें नाहीं-आणि कारण काय, तर त्याच्याजवळ तिकिट नव्हतं ! द्वाररक्षकाला तो डेनिसच आहे हेंहि माहीत होतं. तरीसुद्धां नियमाविरुद्ध कुणालाहि आंत जाऊं देणार नाहीं, अशा मताचा तो असल्यामुळें डेनिस् कॉम्प्टनला त्यानें अडविलें. त्यानंतर डेनिस् आंत गेला, उत्कृष्टपणें खेळून त्याच्याकरितांच मुद्दाम जमलेल्या लोकांची त्यानें निराशा केली नाहीं, हें सगळं खरं. तरी प्रश्न राहतो तो द्वाररक्षकाच्या अडवण्याचा. कोणी म्हणेल, केवढी ही कर्तव्यतत्परता ! पण खरंच का ह्याला निष्ठा म्हणायची ? तिकिट किंवा पास असल्याशिवाय कोणालाहि आंत प्रवेश करूं द्यायचा नाहीं, ह्या आज्ञेचें हें किती अतिरेकी पालन.

'कांट' ह्या जर्मन तत्त्वज्ञाच्या मताला अनुसरून 'हाच खरा द्वाररक्षक' असें त्यास प्रशस्तिपत्र मिळालें, तरी व्यवहाराच्या दृष्टीनें ह्याला 'बरोबर' म्हणतां येईल का? डेनिसनें पास विसरायला नको होता याबद्दल वाद नाहीं; पण एम्. सी. सी. टीमच्या ह्या खंद्या आधारस्तंभाला अडविण्यांत कर्तव्यपूर्तीच्या समाधानाबरोबरच स्वतःच्या जाहिरातीचा लाभ करून घेणाऱ्या द्वाररक्षकाबद्दल निदान मला तरी फारसा आदर वाटला नाहीं. कुठल्याहि गोष्टीला मर्यादा असावी असं मला वाटतं. कर्तव्यपालन करतांनाहि व्यवहाराला धरून मुरड घालणं हेंच जास्त महत्त्वाचं मानलं पाहिजे. आणि जोंपर्यंत वैयक्तिक लाभाचा अंशहि असें करतांना आपण साधीत नाहीं तोंपर्यंत आपण चुकत आहोंत असं वाटून घेण्याचंहि कारण नाहीं. कुठल्याहि बाबतींत अपवाद मान्य न करणाऱ्या कांटच्या तत्त्वज्ञानाबद्दल मला तसा आदर असला, तरी त्याचं शंभर टक्के प्रात्यक्षिक करून दाखविणाऱ्या व्यक्तीबद्दल मात्र माझं मत तितकंसं चांगलं होत नाहीं.

माझे एक अति उत्साही स्नेही आहेत. अगदी प्रामाणिक आहेत. आपला हक्क नसलेल्या कुठल्याहि गोष्टीचा तें स्वीकार करीत नाहीत. ह्या साऱ्या गुणांची किंमत मला कळतें. हें सारं आचरणांत आणणं आजच्या जगांत किती कठीण आहे ह्याची जाणीवहि आहे. पण केव्हां केव्हां ह्या त्यांच्या नित्याच्या वागणुकीवर झालेले परिणाम मात्र माझा आदर कमी करण्यासच कारणीभूत होतात, असं मला वाटतं. अगदीं परवाचाच एक प्रसंग पाहा. आमच्या संस्थेच्या वार्षिक स्नेह-संमेलनाच्या समारंभांत सभासदांचा 'जेवण' हा अतिलोकप्रिय कार्यक्रम ठेवण्यांत आला होता. संस्थेच्या निवासस्थानाच्या शेजारींच माझ्या उपरोक्त मित्राचं घर असल्याने पानसुपारी, विडे

लावणें इत्यादि व्यवस्था त्यांच्या घरीं ठेवण्यांत आली. आम्ही चौघेजण त्यांच्या घरीं ठरल्याप्रमाणें सकाळीं विडे लावीत बसलों होतों. आमच्यापैकीं मधूनच कोणी तरी वेलदोडा तोंडांत टाकी, तर कोणी रांगोळी-गुलालाची व्यवस्था झाली कीं नाहीं हें बघायला जातांना, लावलेली एक पट्टी तोंडांत चघळत जाई. पण माझा मित्र! छे! सुपारीचं खांड नाहीं टाकलन् त्यानीं तोंडांत. इथपर्यंत सारं छान! पण त्यानंतर जेव्हां त्याच्या आठ वर्षांच्या मुलानं तबकं भरून ठेवलेल्या विड्यांपैकीं एक आपल्या तोंडांत टाकला, तेव्हां ह्यानें त्याच्या श्रीमुखांत ठेऊन दिली. नि ती कां–तर विद्यार्थ्यांनीं विडे खाऊं नयेत म्हणून नव्हे, तर हें सारं संस्थेचं आहे नि त्यावर आपला अधिकार नाहीं म्हणून! कुठलं हें अघोरी तत्वज्ञान आणि कुठला हा अतिरेकीपणा? आणि म्हणूनच मला नेहमी वाटतं कीं, कुठलीहि कां बाब असेना, माणसानं कुठल्या मर्यादेपर्यंत जायचं हें त्याला कळलं पाहिजे.

इंग्रजींत 'यू मस्ट् नो व्हेअर टु स्टॉप्' असं एक सूत्र आहे नि खरोखरच ह्या वाक्याचा रोखहि अशाच प्रकारचा आहे. आमच्या नात्यांतील एका कुटुंबांत लग्नांतली पंगत ही अगदीं सकाळी ९॥ लाच सुरू होणं त्यांना इतकं महत्वाचं वाटतं, कीं इतर सारं कांहीं ठीक झालं नि जरी एवढंच चुकलं– अर्थात १०–१५ मिनिटांनीच– तरी जणूं कुटुंबाच्या कीर्तींतच कमीपणा आला असंच त्यांना वाटूं लागतं. वक्तशीरपणाचा, घड्याळाचा, वेळेचा इत्यादि साऱ्यांचा उपयोग व योग्य ती किंमत मला कळते; पण दर पांचदहा मिनिटांच्या चुकून झालेल्या उशिराचे प्रसंगीं, 'नेपोलियनला तीन मिनिटं उशीर झाला म्हणून त्याच्या साऱ्या सैन्याचा नि अखेरीस त्याचा अंत झाला!' ही त्याच्या शेवटल्या लढाईची कथा घोळवून सांगण्यांत निदान मला तरी कांहीं विशेष आहे असं वाटत नाहीं. अर्थात् आत्यंतिक दिरंगाई वाईट,

हें कोणीच नाकबूल करणार नाहीं, हें उघड आहे.

पुष्कळदां काम संपल्याशिवाय घरीं न जाणारे पतिराज आपल्या एकमार्गी वागणुकीमुळें किती वेळां आपल्या पत्नीची नि मुलांची गैरसोय करीत आहेत, त्यांच्या आनंदांत कसं विरजण घालीत आहेत, ह्याची जाणीव झाली म्हणजे वाटतं, ह्या अतिरेकी संवयीच्या गुलामांपेक्षां, संकल्पांना, निष्ठेला, संवयींना योग्य ती मुरड घालणारेच बरे ! स्वतःच्या देशप्रेमाची व अभिमानाची वेळोवेळीं जाहिरात करणारे एक देशभक्त मला माहीत आहेत. आई अत्यवस्थ असतांना ज्या सरकारशीं असहकाराचं युद्ध पुकारलं, त्या सरकारपुढें आईच्या शेवटच्या भेटीची इच्छा पुरी करण्याकरिताहि विनंतीवजा अर्ज करण्यास ते तयार झाले नाहींत. मातृभूमीचा उद्धार करणाऱ्या ह्या व्यक्तीला असें करतांना स्वतःच्या आईच्या हांकेकडे दुर्लक्ष करून स्वतःच्या अभिमानाचा डंका पिटण्यांत काय मिळालें कोणास ठाऊक? स्वप्नांत दिलेलं वचन पाळणारा हरिश्चंद्र, कधींहि खोटं न बोलणारा हरिश्चंद्र, हे आदर्श म्हणून उत्तम, असं गृहीत धरलं तरी, सत्यपालन करतांना अपवाद म्हणून केवळ लोकहितास्तव सत्याकडे थोडी डोळेझांक केली तर तें भयंकर अनितीचें आहे असं समजूं नये, एवढंच. अर्थात् कान्टसारख्या तत्त्वज्ञाला कुठल्याहि बाबतींत अपवाद मान्यच नाहीं व माणसाच्या कृतीचं परिणामाकडे पाहून केलेलं समर्थन मंजूर नाहीं.

ह्या खरं बोलण्यासंबंधींच मोठी गंमतीची घटना त्याच्या हयातींत घडली.

एका प्रसिद्ध नाटकाच्या वेळीं नाट्यमंदिरांतील सभागृह अगदीं गच्च भरून गेलें होतें नि प्रेक्षक पडदा केव्हां वर जातो ह्याची मोठ्या आतुरतेने वाट बघत होतें. थोड्याच वेळांत पडदा वर गेला नि नाट्य-संस्थेच्या चालकांनीं मोठ्या आर्जवाने क्षमा मागून

मुख्य नटाचीच प्रकृति एकाएकी बिघडली आहे आणि त्यामुळें आज प्रयोग होणार नाहीं, असें जाहीर केलें नि पुन्हां एकदा त्यानं माफी मागतांच पडदा परत खालीं आला.

सारे बाहेर पडण्याचे दरवाजे उघडण्यांत आले. प्रेक्षक जरा नाखुष होऊनच पण बाहेर आले नि पहातात तों त्या नाट्य-मंदिराच्या मागच्या आवारांत आग लागलेली त्यांना दिसली. वास्तविक नाटक न होण्याचं हेंच मुख्य कारण होतं; पण चालकांनी हें खरं कारण सांगितलं असतं तर साराच गोंधळ होऊन अगदीं मोजक्या दरवाजांतून इतके सारे प्रेक्षक बाहेर येऊन शकले नसते नि मनुष्यस्वभावाला अनुसरून प्रत्येकानें जीव वाचविण्याच्या प्रयत्नांत घाईंत बाहेर जाण्याकरितां केलेल्या गोंधळांत मनुष्यहानि होण्याचा संभवच जास्त होता.

तरीहि कांटच्या मतानं तो चालक चुकलाच! पापपुण्याच्या अगदीं केसाचं वजन करणाऱ्या तराजूनं हें मोजलं तर चालकानं खोटं बोलण्याचं पाप केलं हें उघड असलें, तरी ह्या एकांगी तत्त्वापेक्षां 'अश्वत्थामा मारला गेला' हें म्हणणारा 'सत्यवादी' धर्मराज जास्त जवळचा वाटणं कांहीं चूक नाहीं. नाट्यगृहाचा चालक खोटं बोलला हें खरं असलं, तरी खऱ्यापेक्षां ह्या खोट्याचीच किंमत निदान मला जास्त वाटते. कुठलाहि वैयक्तिक स्वार्थ मनांत न बाळगतां व एकंदर परिणामाच्या दृष्टीने पाहतां, जर एखादवेळीं सत्याला, नीतितत्त्वाला, आवडीनिवडींना थोडी मुरुड घातली, तर त्यांत बिचकण्यासारखं कांहीं नाहीं, असंच मला वाटतं. उलट मर्यादेपलिकडे असलेल्या गोष्टी नेणं हीच चूक आहे, असंहि म्हणायला हरकत नाहीं. कुठल्या तरी पक्षाचीं पत्रकें वाटण्याची किंवा चिकटविण्याची जबाबदारी पत्करलेले स्वयंसेवक रात्रीच्या गाडीने येणाऱ्या बहिणीला स्टेशनवर घ्यायला न जातां कंकण बांधलेलं काम नि

अमक्या ठिकाणीं अमक्या वेळेला हजर रहाणं हें जास्त महत्त्वाचं समजतात, तेव्हां मात्र वाटतं कीं, माणसाला कुठलीहि कां गोष्ट असेना, कुठं थांबायचं हें कळलंच पाहिजे.

रसिकतेचा किंवा खेळाडूवृत्तीचा स्वतःबद्दल गोडवा गातां यावा म्हणून घरांतील भांडीं विकून नाटकाचं किंवा क्रिकेटचं सीझन तिकिट काढणारेहि याच वर्गांत मोडतात. 'त्या माणसाला मर्यादा अशी नाहीच' असं आपण जेव्हां म्हणतों, तेव्हां अगदीं आपल्याला हेंच म्हणायचं असतं कीं, त्या माणसाला कुठं थांबावं हेंच कळत नाहीं. श्रोत्यांच्या अभिप्रायाकडे लक्ष न देतां चऱ्हाट लांबवणारा वक्ता, टाळ्यांचा गैरसमज करून मोजक्या भांडवलाच्या गायन-विद्येवर विसंबून त्याच ताना आळविणारा नट, ठरलेल्या वेळेपेक्षां दोन मिनिटें उशीर झाला म्हणून कपाळावर चार आठ्या घालून वॉटरलूची आठवण करून देणारा घड्याळजी, स्वजनांच्या भावनांची यत्किंचितहि पर्वा न करतां स्वपक्षाच्या शिस्तीच्या इस्तरीकडे लक्ष देणारे स्वयंसेवक, स्वतःच्या विवाहाच्या वेळीं व नवा संसार थाटायच्या प्रसंगीं पत्नीच्या सल्ल्यानें घेतलेलीं भांडीं मोडींत विकून गंधर्वांचं 'स्वयंवर' बघायला जाणारे रसिक, सत्याच्या नि अभिमानाच्या आग्रहामुळें प्रेमाचा नि भावनेचा बळी देणारे देशभक्त नि तत्त्वज्ञ, हे सारे क्रिकेट क्षेत्रांत मानाचें स्थान असणाऱ्या डेनिस् कॉम्प्टनला केवळ प्रवेशपत्रिका नाहीं म्हणून अडविणाऱ्या द्वाररक्षकाइतकेच अतिरेकाकडे झुकणारे अपराधी आहेत असंच मला वाटतं.

●●●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ३५६८२ विः निबंध
क्रमांक ........ नोंः दिः ३०/११/६७

१४

# शोकांतिका

शिक्षा करण्याचे भिन्न भिन्न मार्ग आहेत. पण मला वाटतं कायमची लक्षांत राहील अशी शिक्षा करावयाची असल्यास एखादा हिंदी चित्रपट बघावयास सांगावा त्यांतल्या त्यांत दुःखांत चित्रपट असला तर मग बोलायलाच नको.

एकदां असाच एक चित्रपट पहावयाचा प्रसंग माझ्यावर आला. चित्रपटांतल्या नायिकेवर एका मागून एक संकटें येत होतीं. तिच्या घरांतल्या माणसांचा मृत्यू, तिला अपघात, गुंडांच्या कडून विनयभंग, आणि शेवटी तीहि एक किरट्या आवाजातलं गाणं म्हणून छानशी पोझ घेऊन खाली पडते नि आधीं घाईघाईनं स्वर्गवासी झालेल्या नातेवाइकांना जाऊन भेटते. तिच्या शवाशेजारी नायक आधीं भाषण देतो नंतर एक रडकं गाणं म्हणतांच तो चिपत्रट संपतो.

इतका मालमसाला भरून सुद्धां कोणालाहि दुःख झालं नाहीं कीं कोणी डोळ्याला रुमाल लावला नाहीं. तो चित्रपट नि त्याचा दर्जा जरी सोडला तरी मला वाटतं असल्या भडक आणि सरसकट ठोकळ मानाने "दुःख" ह्या सदरांत मोडणाऱ्या घटनांमुळें तितकसं वाईट वाटत नसावं.

एकुलत्या एका मुलाचा मृत्यू, लग्न होतं न होतं तोंच घरीं परत आलेली मुलगी, लहानपणींच पोरकी झालेलीं मुलं कुटुंबांतील मिळवत्या एकमेव व्यक्तीचा मृत्यू, ही दुःखाची शोकाची आत्यंतिक उदाहरणं असलीं तरी, नशिब, दैवदुर्विलास, प्राक्तन असं कांहीसं म्हणून आपण त्या गोष्टींना कालांतराने विसरतो पण कांहीं घटना अशा असतात कीं त्या हृदयाचा ठाव घेतात, त्यांच्या आठवणीनंहि पीळ पडतो नि जो जो विसरायचा प्रयत्न करावा तों त्यांची जास्तच आठवण होते. मदिरा सोडणाऱ्या किंवा खरं म्हणजे सोडूं इच्छिणाऱ्या माणसाला जसं मदिरेशिवाय दुसरं कांहींच दिसत नाहीं तसंच होतं, असल्या एखाद्या त्या मानानं साध्या पण मनाचा वेध घेणाऱ्या, व्यापून टाकणाऱ्या कांहीं घटनांमुळें.

परवांच मिनोसटा येथील स्टिलवाटर्सच्या तुरुंगांतल्या ऐंशी वर्षे वयाच्या फ्रँक नोव्हॅक ह्या माणसाची कहाणी वाचून असंच वाईट वाटलं. १९१० सालीं खुनाच्या खटल्यांत पन्नास वर्षांची शिक्षा झालेल्या फ्रँकला १९६० सालीं तुरुंगांतून सोडण्यांत आले. थोड्याच दिवसांत ह्या ऐंशी वर्षांच्या वृद्धानं अर्ज केला कीं मला माझ्या घरांत पुन्हां जाऊं द्या. तुरुंगाच्या बाहेरच्या जगांत त्याला करमेनासं झालं, जगणं अशक्य झालं. ह्या साध्या घटनेनं मन कसं अस्वस्थ झालं, वाटलं केवढी शोकांतिका त्या माणसाच्या आयुष्यांतली. शिक्षेची सारीं वर्षे भोगून तसं म्हटलं तर एका दृष्टीनं केलेल्या पापाचं पुरेसं प्रायश्चित्त घेऊनच हा जगाच्या उघड्या मोकळ्या हवेंत येतो नि तिथं त्याला करमत नाहीं, जमत नाहीं, त्याला चुकल्यासारखं होतं, त्याचा स्वातंत्र्यामुळें जीव गुदमरतो नि बिचारा सरकारकडे पुन्हां एकदां त्या पिंजऱ्यांत अडकवा म्हणून विनंती करतो. त्या चित्रपटांतल्या नायिकेच्या संकटाच्या मानानं ह्याला तसं म्हटलं तर कांहींच झालेलं

नाहीं पण त्याच्या शोकांतिकेमुळें एक प्रकारची बोंचणी मनाला लागते.

ड्यूक ऑफ विंडसरनें दुसऱ्या युद्धाचे वेळीं आपल्या मायभूला जाऊन तिची सेवा करायची इच्छा प्रदर्शित केली. ब्रिटिशांच्या शिस्तीच्या कडक चौकटींत, राज्य सोडाव्या लागलेल्या, नृपतीला ही संधी देणं, बसण्यासारखं नव्हतं नि बिचाऱ्याला हवी तेवढी पात्रता अंगांत असतांना कुठलं तरी बेताचं काम करण्यांत समाधान मानून घ्यावं लागलं. पुष्कळदां वाटतं, फ्रान्समधील आपल्या चाळीस खोल्यांच्या बंगल्याबाहेरच्या प्रशस्त हिरवळीवर आपल्या मायभूच्या दिशेनं डोळे लावून ड्यूक ऑफ विंडसर बसला असेल, जिच्या प्रेमाकरतां सार्वभौम सत्ता सोडली ती सिम्सन् त्याच्या शेजारीं बसून कदाचित मनांत म्हणत असेल, आज माझ्यामुळें हा असा दुःखी, त्या मानानं एकाकी आणि हवी तेवढी कर्तबगारी अंगांत असूनहि असं जिणं जगत आहे. त्याला राहून राहून वाईट वाटत असेल कीं, नांवापुरता कां होईना पण एकेकाळीं मी त्या बलाढ्य साम्राज्याचा स्वामी होतो, त्या माझ्याच देशाच्या आपत्कालीं मला त्याची सेवा करायची संधी नसावी, जिथं माझं बाळपण गेलं, ज्या हवेवर मी पाळला पोसला गेलो तेथें आज मला अगदींच मज्जाव नसला तरी, न गेलों तरच जास्त सुसह्य होण्यासारखी अशी परिस्थिती असावी! पण हें सर्व कां? जें एका साध्या ब्रिटनच्या नागरिकांलाहि साध्य आहे, शक्य आहे तेंहि माझ्यापासून कां हिरावून घेतलं जावं? आणि मग त्या हिरवळीवरच्या विसाव्या शतकांतल्या प्रेमिकांच्या भोंवतीं मन रिंगण घालतं नि त्याच्या हृदयांतली रुखरुख आपल्यालाच अस्वस्थ करते. खरं म्हटलं तर ऐहिक सुखं सगळीं नि हवी तेवढीं उपलब्ध आहेत त्याला. ज्याला सरसकट दुःख म्हणता येईल तें त्याच्या देशाइतकंच त्याच्यापासून

दूर आहे तरी वाटतं ती एक त्याच्या जीवनांतली फार मोठी शोकांतिका आहे.

सर्व सत्ताधिश नेपोलियन मला वाटतं असाच त्या बेटावरल्या तुरुंगांत रडला असेल. आपल्या राणीला अगदीं शेवटचं भेटण्याकरतां त्यानं आर्जवानं पत्र धाडलं नि समुद्राकडे डोळे लावून वाट पहात बसला, पण शेवटपर्यंत ती आली नाहीं. आली नसली तरी चाललं असतं. कांहींतरी अपरिहार्य कारणामुळेंच ती येऊं शकली नसेल असं त्यानं मनाचं खोटं समाधान तरी करून घेतलं असतं पण तसं व्हायचं नव्हतं. तिचं पत्र आलं होतं. "सम्राट चक्रवर्ती नेपोलियन बोनापार्टची मी बायको आहे. एका बेटावरल्या एका कैद्याची निश्चितच नव्हे.... तेव्हां...." मला वाटतं युद्धांतल्या पराजयापेक्षां हा पराजय त्याला जन्मभर सलत राहिला असेल. समरांगणांत दिगंत कीर्ति मिळवणारा नेपोलियन एका स्त्रीच्या हृदयाला जिंकू शकला नाहीं. उलट त्याची प्रियतमा आपला संबंध सम्राटाच्या सुवर्ण, रत्नजडित कवच कुंडलाशीं, मुकुटाशीं आहे, ते धारण करणाऱ्या जित्या प्रेमळ जीवाशीं नाहीं हें सांगण्याकरतां पत्र धाडण्याइतकी दक्षता घेणारी निघाली. त्या दुःखद आठवणींतले त्याचे शेवटचे क्षण त्याला रशियाच्या बर्फांतल्या पराजया-पेक्षां जास्त असह्य झाले असतील.

पुष्कळदां वाटतं असल्या विदारक घटनांना जे हृदयाला पीळ पाडण्याचं सामर्थ्य आहे तें आत्यंतिक दुःखांत नाहीच. कर्म धर्म संयोग, पूर्वसंचित, दैव अशा कांहींशा बोजड अवजड ठराविक शद्बानं त्याला विसरण्यांत किंवा प्रयत्नानं विसरविण्यांत येतं, पण असले साधे साधे प्रसंग मात्र रिकाम्या मनाच्या प्रांगणांत सदैव रेंगाळत, बोंचत राहातात.

ह्यामुळेंच मला रामवनवासाच्या किंवा दशरथाच्या मृत्युच्या प्रसंगापेक्षाहि रजकाच्या शंकेमुळें टाकलेल्या, रामाचा अंश पोटांत

असलेल्या जानकीच्या खऱ्या अर्थानं त्या वनवासाचं दुःख जास्त जाणवतं, शाकुन्तलांतल्या शकुंतला आश्रम सोडतांना, कण्वाचा निरोप घेतांना होणाऱ्या, जाणवणाऱ्या दुःखाची धार तिच्या पुढं भोगाव्या लागणाऱ्या संकटापेक्षांहि जास्त बोंचते, एवढेंच कशाला पण दुसऱ्या महायुद्धाच्या महाभयंकर कथा वाचतानांहि इतर नाशाच्या मानानें कांहींच नसावं अशा एखाद्या साध्या घरगुती कथेंतहि मी बेचैन होतो.

युद्धस्य कथा रम्या हे निदान मला रोमेलची हकिकत वाचतांना तरी खरं वाटत नाहीं. त्याचं जीवन म्हणजे एक फार मोठी शोकांतिका आहे. जर्मनीपासून शेंकडों योजनें दूर असलेल्या परक्या खंडांत मोजक्या सैन्यानं इंग्रजांच्या नि त्यांच्या सहकाऱ्यांच्या सैन्याला दे माय धरणी ठाय करून सोडणाऱ्या पराक्रमी रोमेलचा शेवट एका सत्तेची अभिलाषा असलेल्या हिटलरच्या लहरी-प्रमाणें, मर्जीप्रमाणें व्हावा नी ज्यानं तनमनधनानें आपल्या देशाची सेवा केली त्याला त्याच्या मुलाबाळांपासून दूर नेण्यांत आलं नि स्वतःचा शेवट करून घेण्याकरतां एक भरलेलं पिस्तूल देण्यांत आलं. हें मान्य करण्यास तयार नसल्यास राष्ट्रद्रोहाच्या आरोपाचे सर्व पुरावे तयार आहेत नि त्याबद्दल देहांत प्रायश्चिताची शिक्षा देणारा फ्युअररचा हुकूमहि त्याचप्रसंगीं दाखविण्यांत आला. अर्थातच बिचाऱ्यानं स्वतःलाच सक्तीचा प्राणदंड करून घेण्याचं कबूल केलं. जर्मन राज्यातर्फे, त्यानंतर दवाखान्यांत प्राणांतिक जखमांमुळें रोमेल मेला असें जाहीर करण्यांत आलें. शत्रु पक्षाचे बलाढ्य सेनानी ज्याच्या नुसत्या नांवामुळें घाबरत असत, तो रोमेल स्वतःच्या अगतिकतेमुळें ढळढळा रडला असेल, पत्नीच्या नि कर्तबगार मुलाच्या विरहामुळें शद्बशः थिजला असेल नि त्याच्या त्या आत्यंतिक दुःखामुळेंच पिस्तुलाच्या गोळीचा मार कदाचित् त्याला जाणवलाहि नसेल.

आणि असाच विचार करूं लागलो म्हणजे बहिरा झालेला नि जोरजोरांत पियानोचे सूर आपटून वाजविणाऱ्या बिथोवनची मला आठवण येते, जगाला खूप हंसविणाऱ्या पण मित्राच्या विरहामुळें, हार्डीच्या निधनामुळें एकट्या जगणाऱ्या लॉरेलची आठवण होते नि वाटतं त्या चित्रपटांतल्या नायिकेचीं दुःखं तर खोटींच होती पण आपल्याला प्रत्येकाला आयुष्यांत भोगावी लागणारीं दुःखं महान असली, भयंकर असली तरी काळ तीं विसरायला लावतो. पण असलीं कांहीं दुःखें माणसाच्या आयुष्याची खऱ्या अर्थानं शोकांतिका करतात, नि तो स्टिलवाटर्सचा पुन्हां कैद करा हो, म्हणणारा कैदी, मला तुमच्यांत घ्या, मी जन्मानं रक्तानं तुमचा आहे म्हणणारा ड्यूक ऑफ विंडसर, त्याची संवेदना जाणणारी सिम्सन्, समुद्राकडे डोळे लावून वाट बघणारा नेपोलियन, सासरीं जाणारी शकुन्तला, वनवासांतली निरोप सांगणारी सीता, तुरुंगांत हातांत पिस्तुल घेऊन येरझारा घालणारा रोमेल, बहिरा बिथोवन्, नि एकाकी झालेला लॉरेल पुन्हां पुन्हां ह्या सत्याचीच आठवण करून देतात असं वाटतं नि मनाला एक आगळीच हुरहुर, रुखरुख बोंचत राहाते.

●●●

१५

# पुष्कळदां असं वाटतं--

अगदीं स्वातंत्र्य मिळाल्यानंतरची गोष्ट. एका मोठ्या करमणुकीच्या कार्यक्रमाला हजारांच्यावर लोक जमले होते. बहुसंख्य लोक सुविद्य होते; राजमान्य कपड्यांत होते; दिसायला बुद्धीमान होते आणि पुष्कळसे तर देशभक्तीचा छाप असलेल्या कपड्यांतहि होते. दोन अडीच तासांच्या भरगच्च कार्यक्रमांत अगदीं तन्मयतनें भाग घेत होते. स्वातंत्र्य मिळाल्याचा आनंद अगदीं शिगोशिग असतानांचे कार्यक्रम जसे असतात तसाच हाहि कार्यक्रम होता. भारतमातेला वंदन कांहीं मुलींनीं संगीतांत केलें. स्वार्थत्यागाच्या भूमिकेवर आधारलेली नाटिका तरुणांनीं केली. लोकमान्य टिळक, गोखले, महात्मा गांधी, नेहरू, ह्यांच्यावर रचलेलीं गाणीं म्हणण्यांत आलीं. क्रांतीचे पोवाडे गाण्यांत आले. हुतात्म्यांना मानवंदना देण्यांत आली; नि नंतर कार्यक्रमाच्या चालकांनीं राष्ट्रगीत होऊन कार्यक्रम संपेल असें जाहीर केलें. पडदा वर जाऊन राष्ट्रगीताला सुरुवात झाली नि लोकांनीं थिएटरच्या प्रवेशद्वाराकडे जायचीहि घाई केली. थोड्या वेळापूर्वीं टाळ्या वाजवून राष्ट्रनेत्यांना मानवंदना

करणारे प्रेक्षक राष्ट्रगीताच्या वेळीं उभे राहून योग्य तो सन्मान देण्याची राष्ट्रीयताहि दाखवूं शकले नाहींत. आणि म्हणूनच पुष्कळदां वाटतं कीं, असं नसावं, असं असूं नये....पण ?

आणखी एखादा नृत्याचा कार्यक्रम, नाजुक गळ्याला मानवेल असं भावगीत किंवा चालू असलेल्या चित्रपटांतलं द्वंद्वगीत कार्यक्रमांत असतं तर ही सारी स्वातंत्र्यप्रेमी जनता कार्यक्रम संपेपावेतों बसून राहिली असती पण राष्ट्रगीताकरतां योग्य तो सन्मान हवा तेवढा वेळ असतांना, हे देऊं शकत नाहींत नि म्हणूनच पुष्कळदां वाटतं कीं हें असं नसावं, हें असं होऊं नये पण....?

लग्नसमारंभाला जावं तों मोठ्या प्रमाणांत स्वागत होतं. दारांतच मोठा थोरला बँड, हवी तशी पौर्वात्य व पाश्चिमात्य संगीताची भेसळ करून करमणुकीपेक्षां कानठळ्या बसवत असतो. पुष्कळदां दारांतच ओळीनं उभं असलेलं पथक, अत्तरपानाचा समारंभ उरकून टाकतं नि नव्या कपड्यानं नटलेल्या दोहों पक्षांच्या नातेवाईकांची धांवपळ चाललेली असते. शब्दशः ही सारी लग्नघाई असल्यानं ह्याचाहि विषाद वाटत नाहीं, उलट एक प्रकारचा आनंदच होतो. स्वतःच्या आयुष्यांतल्या ह्या मंगल प्रसंगाची आठवण होते, तसा प्रसंग नसल्यास त्या सुदिनाचं स्वप्न, मन त्या गोंगाटांतून स्वतःला एकीकडे नेऊन रंगवत असत. वधू आणि वर गृहस्थाश्रमाच्या पदार्पणानंतर हॉलमधील प्रशस्त कोचावर दाटीवाटीनें बसलेले असतात. त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद सारा थकवा, मुंडावळी, हार, नवे बोंगा झालेले कपडे ह्यांना फोडून बाहेर पडलेला दिसत असतो. त्या गोंगाटांत, त्या घोळक्यांतहि, त्या भाऊगर्दींतहि वधूवरांची ‘सलज्ज कुजबुज’ कांहीं व्यक्तींच्या तीक्ष्ण नजरेंतून सुटत नाहीं. पण ह्या साऱ्या प्रसंगाला दृष्ट लागूं नये म्हणून कीं काय गालबोट लावल्यासारखाच एक प्रकार असतो. वधुवरांच्या

दोहोंबाजूला आणखी दोन व्यक्ती, आलेल्या भेटींची नोंद करण्याकरितां बसलेल्या असतात. जीवनांतल्या एवढ्या नितांत महत्त्वाच्या, प्रेमाच्या, अगत्याच्या प्रसंगीं ही रुक्ष व्यवहारी नोंद करून घ्यावयाची पद्धत साऱ्या सौंदर्याला नि आनंदाच्या भावनेला जणू चिडवत असते असंच मला वाटतं. वधूला आलेल्या भेटी घेण्याकरतां नि त्या अगदीं नांव विचारून लिहून घेण्याकरतां एक चित्रगुप्त बसलेला असतो तसाच वराच्या बाजूलाहि तशीच नोंद करण्याकरतां साधारणतः धाकटा भाऊ किंवा तत्सम दुसरा नातेवाईक बसलेला असतो आणि हें दृश्य पाहिलं म्हणजे खरोखरच मनाला विषाद वाटतो. व्यवहार प्रत्येक माणसाला कळतो नि मनाला पटतोहि पण असल्या मंगल प्रसंगीं इतकं उघड उघड त्याचं प्रदर्शन कशाला? मंगल कार्यं व्हावींत मोठ्या गर्दींत, थाटामाटानं, लाजण्या रुसण्यानं व्हावींत पण ह्या साऱ्या मखमली प्रकाराला हें व्यवहारी तरटाचं ठिगळ नसावं आणि म्हणूनच पुष्कळदां वाटतं कीं ह्या नोंदवह्या नि ते नोंदणी करणारे नसावेत. पुष्कळदां वाटतं कीं असं नसावं असं असूं नये. पण....?

व्याख्यानाला जावं तो आधींच गर्दी बेताची असते, खरं म्हणजे नसतेच! वाढत्या शिक्षणाच्या लोकसंख्येच्या प्रमाणाच्या मानानें श्रोत्यांची संख्या मात्र, व्यस्त प्रमाणांत कमी होऊं लागली आहे. वक्त्याची ओळख करून दिल्यानंतर वक्ता आपल्या मगदुराप्रमाणें प्रतिपाद्य विषय श्रोत्यांपुढें मांडतो. कुठल्याहि प्रकारची पूर्वतयारी करून न आलेले वक्ते सोडले तर कांहीं प्रमाणांत तरी वक्ते आपल्या अभ्यासानें वाक्चातुर्यानें श्रोत्यांपुढं नवीन कल्पना, नवीन दृष्टिकोन ठेवतात; आपल्या ज्ञानाचा लाभ इतरांना करून देतात आणि असली ज्ञानसत्रें जितकीं जास्त तितकीं केव्हांहि शैक्षणिक दृष्ट्या उपयुक्तच. श्रोत्यांकडून मात्र अधिक कमी संख्येनें येऊन झालेल्या उपेक्षेंत

आणखी थोडी भर टाकण्यांत येतें याचं वाईट वाटतं. योग्य अशाच आजवर चालत आलेल्या वहिवाटीप्रमाणें भाषणानंतर संस्थेचे चिटणीस वक्त्यांचें आभार मानायला उभे राहतात आणि जमलेल्या श्रोतृवृंदापैकीं कांहीं व्यक्ती हटकून उठून जातात. ज्या व्यक्तीनें आपल्या ज्ञानाचा, अभ्यासाचा, अनुभवाचा लाभ विनामूल्य आपणांस करून दिला त्याचे नुसते शाब्दिक आभार मानले जात असतांना पांच मिनिटें थांबण्याचें औदार्य ह्यांच्यांत नसावें ह्याचा विषाद वाटतो. संस्थेतर्फे, श्रोत्यांतर्फे, वक्त्यांचे आभार मानणं ह्यांत मोठं औचित्य आहे. त्याच्याबद्दल जाहीरपणें कृतज्ञता दाखविण्याचा तो प्रसंग असतो पण त्याच वेळीं, बराचसा फुकट वेळ असलेले श्रोते, नेमके त्याच ‘ पांच मिनिटां ’ करतां कसे एकदम ‘ हिशोबी नि उद्योगी ’ ठरतात ह्याचं आश्चर्य वाटतं आणि म्हणूनच पुष्कळदां वाटतं कीं चांगलीं व्याख्यानें असावीत, समंजस श्रोतृवृंद असावा पण जमलेल्या ज्ञानलालसा असलेल्यांनीं थोडी जास्त कृतज्ञताबुद्धि बाळगावी आणि थोडक्यांकरतां सगळीकडे हटकून दृष्टीस पडणारा औचित्यभंग टाळावा. पुष्कळदां वाटतं कीं हें असं नसावं, असं होऊं नये. पण.... ?

अगदीं साध्या गोष्टी आहेत पण मला वाटतं ह्यांतच खऱ्या आशयाचा आढळ होणें आवश्यक आहे. आणि ह्या रोजच्या व्यवहारांतच दिसून येणाऱ्या साध्या साध्या वागणुकींतच आपल्या माणुसकीचा वृत्तीचा, सभ्यतेचा, राष्ट्रीयत्वाचा दर्जा ठरविण्याचें सामर्थ्य आहे. मुद्दाम ओढून ताणून भरविलेल्या प्रसंगीं तर नसलेल्या गुणांचंहि प्रदर्शन करणं शक्य असतं पण खरं स्वरूप दिसतं तें असल्या नित्याच्या वागणुकींतूनच आणि म्हणूनच पुष्कळदां वाटतं कीं भरलेल्या मैफलीं-तून पुढें बसणाऱ्यानं जांभया देऊं नये, गायकाची नि साथीची ‘ लढत ’ रंगांत आली असतांना त्या एकतानतेचा निःसंकोचपणें भंग

करून उगाच, आलेल्या श्रोत्यांनीं मधुनच उठून जाऊं नये. पुष्कळदां वाटतं पुढाऱ्यांनीं टाळ्यांच्या आहारीं जाऊं नये. सत्तेनें, ज्यांनीं त्यांना ती सत्ता मिळवून दिली त्यांना तुडवूं नये. विद्वान् विनयानें शोभावे, नटीला रूपापेक्षां कर्तृत्वाचा अभिमान असावा. शिक्षकाला मानापेक्षां ज्ञानदानांत सुख वाटावं, प्रजेवर उपकार करीत आहोंत असं वाटायच्या ऐवजीं कर्मचाऱ्यांनीं कर्तव्याकडे लक्ष द्यावें. पैशाच्या अभावीं मुलीचा पिता उपेक्षिला जाऊं नये किंवा हुशार विद्यार्थी विद्याभ्यासाला पारखा होऊं नये. पुष्कळदां वाटतं कीं, काम करायची इच्छा असणाऱ्याला काम मिळावं, धर्माचा उपयोग स्वकीयांवर प्रेम करण्याकडे व्हावा, योग्यतेला, विद्येला, त्या मानानं मानधन प्राप्त व्हावं, जात आणि गोत्र, असल्या केवळ अपघाताच्या गोष्टींना खोटं महत्व असूं नये, राष्ट्र आणि जनतेची सेवा ह्यांनाच महत्व असावं, 'प्रत्येकाला मत' अशा खऱ्या लोकसत्तेचा विजय व्हावा, पक्षोपपक्षांतील चढाओढ खऱ्या खोट्या मतांच्या गलबल्यावर अवलंबून न राहतां खऱ्या देशसेवेच्या कसोटीवर व्हावी नि पुष्कळदां वाटतं कीं कुठलीहि गोष्ट मग अगदीं वैयक्तिक स्वार्थाइतकी जवळची कां असेना, राष्ट्रीयत्वाच्या आड येऊं नये. पुष्कळदां वाटतं असं असावं. असं नसावं, असं होऊं नये–पण....?

●●●

१६

# ‘ मागील रांगेंत उभे– ’

सकाळीं उठतांच वर्तमानपत्र वाचणें हें आजच्या नव्या युगाचें प्रतीक आहे.

कोठें काय घडलें ह्याचा आपापल्या पक्षाच्या चष्म्यांतून घेतलला आढावा ह्या वर्तमानपत्रांतून वाचावयास मिळतो आणि म्हणूनच एकाच सभेचा वृत्तान्त ‘ शांततेनें सभा पार पडली ’ ह्या जोडीलाच ‘ जमावानें सभा पार उधळून लावली ’ असाहि निरनिराळ्या वर्तमानपत्रांतून वाचावयास मिळतो. शून्याला कांहीच किंमत नसते ह्या अंकगणितांतील सिद्धान्ताची खात्री होते ती दोन प्रतिस्पर्धी वर्तमान-पत्रांतील एकाच सभेच्या उपस्थितीबद्दलचा आकडा वाचूनच. नव्या युगांतलाच मी,– नि म्हणून मलाहि चहाबरोबर वर्तमानपत्र वाचायची संवय. पण पेपर टाकणाऱ्या मुलाची आज मी मुद्दाम वाट पहात होतों तें मात्र ह्या संवयीच्या आहारीं गेलों म्हणून नव्हे. काल संध्याकाळीं झालेल्या एका समारंभाचा वृत्तान्त त्यांत येणार होता आणि जमल्यास वड्या अधिकाऱ्याच्या निरोपप्रसंगीं घेतलेला फोटो– ग्रुप फोटो– छापून येण्याची शक्यता होती. आणि म्हणूनच

वर्तमानपत्र बघण्यास मी उत्सुक होतों. ऑफीसांतल्या एकाचा वशिला लागू पडला होता नि अर्धा कॉलम समारंभाच्या वर्णनाबरोबरच आमचाहि फोटो छापण्यांत आला होता. वर्तमानपत्रांत जितका जास्तींत जास्त चांगला फोटो छापून येणें शक्य असतें तितकाच हाहि ग्रुप फोटो होता. फोटोंतील व्यक्तींचीं त्याखालीच नांवें लिहिलीं असल्याने फोटो बघणाऱ्यांची सोय झाली होती. पुसट आकृतींच्या मदतीला, कानामात्रा वगळलेलीं का होईना, पण नांवें असल्याने कुठला चेहरा कुणाचा हें शोधून काढणें अशक्य नव्हतें. मी दुय्यम अधिकारी असल्यामुळें अगदीं कडेच्या खुर्चीचा माझा फोटो मला ताबडतोब ओळखतां आला आणि पेपर टाकणाऱ्या पोऱ्याची वाट पाहण्याचें सार्थक झालें होतें.

'खुर्चीवर बसलेले' ह्या शद्बांपुढें माझें नांव शेवटचें होतें नि त्यानंतर लगेच 'मागील रांगेंत उभें' असे शद्ब होते. हे शद्ब वाचून मला कसेसेंच वाटलें. उभे असलेल्या कर्मचाऱ्यांचीं नांवें त्यानंतर होतीं. निळसर एअर् कंडिशन्ड डब्यांच्या गाडीला शेवटीं गच्च भरलेला थर्ड क्लासचा जुना डब्बा लावलेला असावा, तसें वाटलें मला. 'मागील रांगेंत उभें–!' माझें मलाच मग हसूं आलें. खरें म्हणजे मागील रांगेंत उभें असलेले लोक होते म्हणूनच तो फोटो छापून आला होता. म्हणूनच त्या अधिकाऱ्याच्या सामान्य कामाचा अतिशयोक्त बडेजाव होत होता. एवढेंच नव्हें, तर ह्या ऑफिसांत वरचा अधिकारी झाला होता तोहि त्यांच्याच श्रमामुळें. त्यानें काल वाचून दाखविलेलें व्याख्यानहि अशाच एका मागील रांगेंत उभा असलेल्याने लिहिलें होतें नि फोटोंतहि नसणाऱ्याने तें सुवाच्य अक्षरांत लिहून काढलें होतें.

'खुर्चीवर बसलेले' हे शद्ब मला बोचूं लागले नि 'मागील रांगेंत उभे' हे शद्ब चिडवूं लागले. माझ्या विचारांचें चक्र सुरू

झालें. मागील रांगेंतले लोक फोटोंतच नव्हे तर सदैव पाठीशीं असतात, म्हणूनच कांहीं लोकांना गळ्यांत हार, हातांत गुच्छ नि पायाला अढी घालून, उंच पाठीच्या मधल्या खुर्चीवर बसता येते. ह्याच नव्हे, तर सगळ्याच समारंभांचें असेंच असतें. कुठल्याहि समारंभाला जावें तो मुख्य पाहुण्याच्या आगमनाची, भाषणांची, गायनाची व अन्य कला-कुसरीची मौज घेण्यास श्रोत्यांची उत्कंठा इतकी कद्रीभूत झालेली असते कीं ह्या सर्वांच्या 'मागे' असलेला कार्यकर्ता कायमचा मागेच राहतो. हारतुरे आणणारा स्वयंसेवक हार घातला जात असतांना हजर नसतो. देणगीचा आकडा जाहीर होत असतांना ज्यानें दारोदार हिंडून ती जमविली तो बाहेरच्या दारांतच असतो. तंबोरा, पेटी, तबला घेऊन येणारा स्वयंसेवक, उत्कृष्ट गायनाचा कार्यक्रम चालला असतांना त्या दिवशींच परगांवाहून आलेल्या अध्यक्षाच्या मेव्हणीच्या सुराला जुळेल असा तंबोरा आणायला पुन्हा बाहेर गेलेला असतो. बैठकीची व्यवस्था करणाऱ्याला स्वतः बसायलाहि वेळ नसतो. तो अल्पोपहाराचीं केळीं कच्चीं निघालीं म्हणून दुसरीं आणायला नेमका अहवाल वाचनाच्या वेळेस बाहेर गेलेला असतो नि कार्यक्रम संपायच्या वेळीं 'वंदे मातरम्' म्हणत असतात तेव्हां सारे 'उभे' असतात तेवढ्यापुरताच हा 'संपलें!' चा सुस्कारा टाकून कुठेंतरी बसलेला असतो. थोड्याच वेळांत गर्दी पांगलेली असते नि पुन्हां बैठक झाडण्यापासून ते आणलेल्या वस्तू पोहोंचविण्याकरितां धावपळ सुरू झालेली असते..... मला वाटलें, दुसऱ्या दिवशींच्या वर्तमान-पत्रांत असाच फोटो छापून येत असेल, ठेवणींतले कपडे घालून आलेले माझ्यासारखे लोक खुर्चीवर बसत असतील नि बाकीचे खरे कार्यकर्ते मात्र 'मागील रांगेंत उभे' च्या यादींत.

मला वाटतें, हीच आजच्या युगाची मोठी शोकांतिका आहे.

कष्ट करणारा एक, फळें चाखणारा दुसरा. नि इतिहास दखल घेतो ती ह्या दुसऱ्याची. बाकीचे सर्व जणू त्या दुसऱ्यास प्रकाशांत आणण्याकरितांच जन्मलेले, जमलेले नि खपलेले. हिंदी भाषेंत एक मोठी मार्मिक म्हण आहे– 'लढे सिपाही नाम सरदारका' आणि आजहि असेंच घडत आहे. नांवें दुसऱ्यांचींच नमूद होतात आणि जगानें कृतघ्नतेचा छाप मारूं नये म्हणूनच कीं काय, ह्या अनामिकां-करितां कुठेंतरी एखादी कमान, स्तंभ उभा करण्यांत येतो. मला अशा स्थळीं जाण्याचा योग आला तर 'मागील रांगेंत उभे' हे शब्द पुनःपुन्हां बजावून सांगतात– कीं "आम्हांला विसरूं नका. आम्ही प्रथम शत्रूच्या माऱ्याला तोंड दिलें, बळी पडलों आणि म्हणूनच विजयी पताका दिसल्या, विजयाच्या कमानी नि स्तंभ उभारले नि स्वातंत्र्यदिनाच्या मिरवणुका वाजतगाजत निघूं शकल्या."

अर्थात् मलाहि असें एखादवेळेसच वाटतें. नेहमी प्रत्ययाला येतें तें असल्या समारंभांत रंगून जाणें, स्वतःला विसरणें, एवढेंच नव्हे, तर ज्यांनीं तो आनंद निर्माण केला त्यांनाहि विसरणें.

व्यक्तीची आठवण अशा बाबतींत थोडीतरी चांगली असते. पण संस्थेची, समाजाची, समुदायाची स्मरणशक्ति नेहमींच अल्पजीवि असते आणि त्यामुळेंच मधल्या उंच पाठीच्या खुर्चीवर हातांत हारतुरे घेऊन बसलेल्या व्यक्तीचें नांव दप्तरीं दाखल होतें नि राहतें तें 'मागील रांगेंत उभे' असलेल्यांचें.

इंग्रजी संगीत चित्रपटांतून हमखास दिसणाऱ्या वाद्यवृंदाचें संगीत मला आवडतें तें ह्याच कारणाकरितां. केवळ व्हायोलिन पियानोवरच कॅमेरा केंद्रित न करतां ट्रँगल गाँगपासून ते कलाकाराच्या आकारापेक्षांहि मोठ्या असलेल्या डबल् बेस्वर लय धरणाऱ्या वादका-वरसुद्धां तो खिळविलेला असतो. आणि मग मला वाटतें, ह्यांत

सगळेच 'खुर्चीवर बसलेले' आहेत आणि म्हणूनच इंग्रजी संगीताची लांबची ओळख नसतांनाहि त्यांच्या वाद्यवृंदांचा कार्यक्रम सुसह्य होतो. भारताच्या निरनिराळ्या नभोवाणी केंद्रावरूनहि मुख्य गायकाच्या किंवा वादकाच्या नांवाबरोबरच 'तबलेपर इनकी संगत–' असल्या तालबद्ध वाक्यांत जेव्हां साथीदारांचीं नांवें सांगतात तेव्हांहि मला असाच अननुभूत आनंद होतो नि वाटतें की मागल्या रांगेंत का होईना पण ह्यांना 'खुर्ची' आहे. साधी नाटकाच्या प्रयोगाची जाहिरात घ्या. नायकनायिका नि खलनायकाच्या मोठ्या अक्षरांतील नांवाच्या पाठो-पाठ लहान अक्षरांत तीन-चार नांवें असतात नि बाकीच्यांची बोळवण 'वगैरे' किंवा 'इत्यादि' अशा शद्बांनी केलेली असते. उलट, मध्यंतरीं एका नाट्य संस्थेनें पाठ्य-वाचकापासून ते पडदे ओढणाऱ्यां-पर्यंत सर्वांचीं नांवें दिलेलीं होतीं !

आणि हवें तें असेंच. निदान माझ्या बाबतींत तरी उत्कृष्ट अभिनयाच्या वेळीं दिग्दर्शकाच्या श्रमांची, चित्रपट नटींच्या गाण्यांच्या वेळीं पार्श्वगायिकेची, गायनाच्या वेळीं साथीची, विजयदिनाच्या वेळीं सैन्याची, स्वातंत्र्यदिनाच्या वेळीं असंख्य अनामिक हुतात्म्यांची, कानाला गोड लागणाऱ्या शद्बांच्या वेळीं कवींची, चांगल्या चालीच्या पदाच्या वेळीं संगीतदिग्दर्शकाची आणि समारंभाच्या वेळीं स्वयंसेव-कांची मला आठवण झाल्याशिवाय राहत नाहीं नि वाटतें नाटकाचा गायनाचा, नृत्याचा, भाषणाचा, विजयाचा, समारंभाचा– सारा सारा आनंद त्याच्यामागें असलेल्या पण उपेक्षिलेल्या 'मागील रांगेंत उभें असलेल्यांमुळेंच असतो, हेंच खरें !

• • •

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...३५५६८२... विः ...निबंध...
क्रमांक ........ नोंः दिः ...३०/११/६७

१७

# वत्सा ! वर माग

एका विशिष्ट वातावरणांत वाढलेलों असल्यामुळें म्हणा किंवा त्या पिढींतल्या शिकवणुकीमुळें म्हणा मला कथापुराणांची आवड आहे. श्रीगणेशायनमः अशी बुद्धिश्वराच्या नमनानें सुरवात नि त्या कथेंतील पूजनीय देवताचं नांव गोवून त्याला अर्पणमस्तु असा शेवट असलेलीं हीं पुराणें एखाद्या बांधलेल्या चीजेसारखीं वाटतात मला. पुरेसे नोमतोम नि तेहि विलंबीत थाटांत ह्यांतहि पुष्कळ असतं नि मग बांधलेल्या चीजेला सुरवात व्हावी तशी पुराणांतल्या कथेला सुरवात होते. कथापुराणांचा तोंडावळा जरी एक छापाचा असला तरी प्रत्येकाला स्वतःचें एक वैशिष्ट्य आहे. ह्या साऱ्या कथांतून त्यांचा उत्कट बिंदुहि ठरलेला असतो. अनन्यभावानं, निःसीम भक्तीनं नि एकाग्र चित्तानं पूजीलेलं दैवत भक्ताची शंभर टक्के कसोटी पाहून प्रसन्न होतं नि केव्हां स्वप्नांत तर केव्हां जागृतींत आपल्या भक्ताला दर्शन देऊन निराकाराचा साकार झालेला परमेश्वर म्हणतो, 'वत्सा तुझ्या भक्तीनं मी प्रसन्न झालों आहे वर माग !' आणि मला वाटतं हाच ह्या साऱ्या पुराणांचा उत्कटबिंदु असतो.

एखादा हट्टी भक्त वर न मागतां किंवा कुंतीसारखा 'मला दुःख दे' असा भलताच वर मागून पुराणांतल्या कथेला भलतीच कलाटणी देतो, हें जरी खरं असलं तरी पुराणांतल्या कथांचा षड्ज् लागतो तो 'वत्सा वर माग' ह्या जागेवरच.

अशाच प्रसंगीं भगवान विष्णु लक्ष्मीकडून पाय चेपून घेण्याचं थांबवून भक्ताकडे धांव घेतात. शंकर उमेचा सहवास सोडून भक्तांच्या निवासस्थानीं धांव घेतात. कुणी वेगळीं रूपं घेऊन येतो तर कुणी वायु-वेगानं प्रगट होतो आणि हवी तशी नि हवी तितकी कठीण परीक्षा पाहिल्यानन्तर दामदुपटीनं फेडावं तसं येऊन विचारतो 'वत्सा, वर माग.' मग मागणाऱ्याचा, घेणाऱ्याचा हात थकतो पण देणाऱ्याचा हात थांबत नाहीं. धनधान्य, पुत्रपौत्र, ऐश्वर्य म्हणाल तें म्हणाल तितकं त्या प्रकारांत भक्ताच्या घरीं चालून येतं नि कथा संपूर्ण सत्याचा, निश्चयाचा, भक्तीचा विजय झाल्याचं सांगून श्रीकृष्णार्पणमस्तू अशा शेवटच्या पानावर येते.

दीपकासारख्या एखाद्या भक्तानें साक्षात गळ्याभोंवतीं सर्प, शिरावर गंगा, हातांत डमरू त्रिशूल घेऊन प्रसन्न झालेल्या उमापति महादेवाला, 'मला वर नको, मी माझ्या गुरुच्या सेवेकरितां क्षेत्र वाराणसीला आलेलों आहे, तेव्हां मला काय उपयोग तुझ्या वराचा' असं सांगितलं म्हणजे त्या परमेश्वराला सुद्धां काय वाटलं असेल तें त्याचं त्यालाच ठाऊक. अर्थात अशावेळीं भक्ताची चिकाटी पाहिलेला परमेश्वर इतक्या सहजा-सहजीं आपली वर देण्याची इच्छा भक्ताला डावलूं देत नाहीं नि त्याच्या गुरूच्या जागींच प्रवेश करून किंवा त्याच्या करवीं त्याला वर देतोच. गेलेला पति, मृत पुत्र, शत्रूनं हिरावून नेलेलं राज्य हे वर सर्वसामान्य मागणींतले ठरले तरी कुंतीसारखा एखादा भक्त, 'ईश्वरा मला दुःख दे' असा विचित्र वर मागून बसतोच. मी दुःखांत असल्याशिवाय तुझी आठवण मला येणार नाहीं हें

संग्रहालय ठाणे 39253

त्याचं स्पष्टीकरण सांगून देवाला आळवते कीं मला दुःखच दे.

एका शेतकऱ्याला ईश्वर प्रसन्न झाला असतां त्यानें भर्जी मागितली अशी एक लोककथा सांगतात. भर्जी निदान कांद्याचीं तरी मागण्याची रसिकता त्यानें दाखविली कीं नाहीं ह्याबद्दल त्या कथेंत उल्लेख नाहीं पण ईश्वरालाच कींव येऊन त्यानें प्रत्येक भजांत एक रत्न ठेवलें असा दाखला आहे. अर्थात् शेतकऱ्याचा मूर्खपणाच शाबित करण्याकरतां लिहिलेल्या या कथेंत तो तीं रत्नेंहि फेंकून देतो हें लिहीणें आवश्यक होतेंच. ह्या हरदासी कथेला आजपर्यंत अनेक लोक अनेक तऱ्हेनें हंसले पण मला वाटतं सर्वांच्या हंसण्याचं कारण एकच होतं. धनधान्य समृद्धि, चिरतारुण्य, ऐश्वर्य असें कांहीं भरघोस मागण्याऐवजीं हा शेतकरी मागतो काय तर एक साधा खाद्यपदार्थ ! ते भक्तहि श्रेष्ठ नि देव त्याहूनहि श्रेष्ठ.

आजच्या युगांत मला वाटतं ते भक्त दिसणंहि अशक्य नि म्हणूनच कीं काय उमापति कैलास सोडायला तयार नाहींत कीं भगवान् महाविष्णु आपल्या शेषशाई शय्येवरून गरुडावर बसायला तयार नाहींत. ज्या श्रद्धेच्या पोटीं भक्तीचा जन्म होतो ती श्रद्धाच अभावानं तळपत असल्यामुळें महान अरण्यें नाहींत, श्वापदें नाहींत, परिस्थितीनं घडलेला सोडला तर मुद्दाम म्हणून उपवास नाहीं, अग्नीकाष्ट भक्षण नाहीं, घोर तपश्चर्या नाहीं नि म्हणून ईश्वरानंहि दोन्हीं हातानं दिलेला आशीर्वाद नाहीं कीं उजवा हात वर करून दिलेला, "वत्सा ! वर माग" हें बक्षीस नाहीं.

आजच्या सर्वसाधारण श्रद्धाहीन जगांतसुद्धां श्रद्धा अजिबात नाहीं असं थोडंच आहे. पण मला वाटतं आजच्या सामान्य माणसाला खरं म्हणजे तशा अर्थानं भक्ती करायला वेळ नाहीं. पण केव्हां तरी उपास घडला, त्या दिवशीं नेमकी शिवरात्र होती म्हणून प्रसन्न

झालेल्या भोळ्या शंकराच्या कथा कांहीं कमी नाहींत. आणि तसं खरोखरच घडलं तर मला वाटतं आजचा सामान्य मनुष्य वर मागेल तो त्या शेतकऱ्यासारखाच !

कांहीं वर्षांपूर्वी एक इंग्रजी चित्रपट पाहिला. त्यांतहि त्या शेतकऱ्याचे बंधुच होते. कुठलीहि एक वस्तु त्यांत मागून मिळण्या-सारखी असते, नि मग एक म्हातारी छत्री मागते, दुसऱ्या एका अत्यंत गरीब माणसाला कातड्याची बॅग हवी असते; नि कांहीं जणांना काय मागावं हेंच कळत नाहीं. कारुण्याचा पार्श्वभूमीवर आधारलेल्या त्या अद्‌भूतरम्य चित्रपटांतल्या सामान्य माणसासारखीच आजच्या माणसाची परिस्थिती होईल.

न दिसणारा देव, न पूजिला जाणारा परमेश्वर, न उपासलं जाणारं दैवत, न मानलेला अवतार, न ओळखलेला आत्मा—निधान, न भक्तिलेला देवाधिदेव, न कळलेला साकार निराकार, न अनुभवलेला सगुणनिर्गुण न चर्चिलेला सर्वसाक्षी, न जपलेला जगन्नायक जर आज खरोखरच कुणाला प्रसन्न झाला नि म्हणाला, ‘वत्सा वर माग’ तर तो त्या इंग्रजी चित्रपटांतल्या गरिबांसारखाच भांबावून जाईल. मला वाटतं फार तर घाईनं एवढंच म्हणेल कीं, देवाधिदेवा घाईनं ‘अष्टपुत्रा’ वगैरे असं कांहीं भलतंच म्हणून टाकूं नकोस रे. फ्रान्समध्यें कीं कुठल्याशा देशांत निदान संतती वाढीबरोबर पगारवाढ नि करांत सूट तरी होते, इथें तसं कांहींच नाहीं नि एका लहानशा खुराड्यांत तुझ्या वरानं आणखीन गर्दी कशाला ! आजच्या सामान्य माणसाला वर मिळत असूनहि पटकन मागण्यासारखं कांहीं नाहीं ह्यांतच त्याची करुण कहाणी आहे. राजपुत्राजवळ सर्व कांहीं होतं पण फक्त रत्नाचा चेंडू नव्हता म्हणून त्यानं प्रसन्न झालेल्या वन-राणीकडून रत्नकंदुक मागितला नि तिनंहि तो दिला, पण शेतकऱ्याच्या

मुलाला ती प्रसन्न झाली असती तर त्यानं तरी बिचाऱ्यानं काय मागावं? राजपुत्राचा पांढऱ्या घोड्याचा रथहि त्याला हवा, जरी-मखमखलीचें कपडे हवे, राजवाडा हवा, त्याचा चमचम चमकणार मुकुट हवा, त्याच्या हातांतला चाबूकसुद्धां हवा, खरं म्हणजे सगळंच हवं आहे. आहे काय बिचाऱ्याजवळ! तो तर बोलून चालून लहान मुलगाच. पण त्याच्या जन्मदात्याला जरी त्या जगन्नाथानं विचारलं तरी तो म्हणेल काय मागूं? पाऊस भरपूर पडूं दे म्हणूं कीं टोळधाड नको येऊं दे म्हणूं कीं सारा माफी मागूं, कां विहिरीला बारा महिने पाण्याची याचना करूं नि शेवटीं मला वाटतं तो मागेल एखादी बैलजोडी. आजच्या सामान्य माणसाचंहि असंच होईल.

त्या इंग्रजी चित्रपटांतल्या व्यक्तीप्रमाणंच तोहि अशीच कांहीं साधी याचना करील. एखादा उपनगरांतील तिसऱ्या वर्गानं प्रवास करणारा मुंबईकर मला वाटतं म्हणेल, देवा एक दिवस तरी ह्या लोकलमधून मोकळेपणानं बसून प्रवास करूं दे, दुपारीं एक ते दोन-मध्यें दुसऱ्या गिऱ्हाइकाचं खाणं होईपर्यंत वाट न बघावी लागतां एखाद्या हॉटेलांत नीट विसळलेल्या कपांत चहा मिळूं दे, संध्याकाळीं पहिल्या बसमध्यें जागा मिळूं दे; नि बायकामुलांना शेवटच्या आठव-ड्यांत चित्रपट बघायची इच्छा न होऊं दे.

दुसरा एखादा गांजलेला देशभक्त 'खोटीं नाणीं ओळखतां येतात तसे खोटे पुढारी ओळखण्याची शक्ती दे' असा वर मागेल. कोणी कंटाळलेला वाचक 'लघुकथेंत कथा असूं दे नि नवकाव्यांत अर्थ असूं दे' असं म्हणेल. हवामानतज्ञ 'कोष्टकाप्रमाणें एकदां तरी पाऊस पडूं दे' म्हणेल. प्रजाजन 'राज्यकर्त्यांच्या पोकळ आश्वासनांपेक्षां हातींतोंडीं कांहींतरी पडूं दे' म्हणून वर मागेल. संगीत शिक्षक 'एखादा तरी कष्ट करणारा नि सुरांत गाणारा शिष्य' मागेल. 'संगीताशिवाय चांगला बोलपट

नि चांगल्या संगीतासकट नाटक' एखादा प्रेक्षक मागेल. 'वाचनालयांतील अभ्यासक्रमाच्या पुस्तकांत महत्त्वाचीं पानें न फाडलेलीं असूं देत असं एकादा गरीब विद्यार्थी म्हणेल. तर 'देवा आजारी पाडायंचच असलं तर सरकारी इस्पितळांत वर लागणाऱ्या खर्चाइतकी तरी मिळकत दे' असं एकादा त्रस्त मध्यमवर्गीय म्हणेल.

पूर्वीसारखे मोजके वर आज कोणी मागणार नाहीं. भिन्नमतीच्या ह्या भिन्न भिन्न सेवकांचे विचित्र मनोरथ पूर्ण करायला मग देवालाहि तेहतीस कोटी अवतारांच्या संख्येनें आपल्या वरपूर्ती मोहिमेवर निघावं लागेल नि तरीसुद्धां हे देवगण आपल्या मध्यवर्ती कचेरींत त्या देवाधिदेवाला कळवतील कीं देवा हा मनुष्य अजून अतृप्त आहे, दुःखी आहे, असंतोषी आहे. अस्वस्थ आहे, असमाधानी आहे, मागितलेलं त्याला दिलं आहे तरी तो तसाच आहे. 'वत्सा वर माग' हाच त्याला वर वाटेनासा झाला आहे. देवांच्या ह्या साम्राज्यांतल्या आवडत्या मानवांचे हे हाल पाहणं अशक्य झालं म्हणजे देवांच्या सभेंत स्वतः जातीनं देवाधिदेव ह्या गोष्टींत लक्ष घालतील. त्यांच्या ज्ञानचक्षूंना पुन्हां तो वर न मागणारा, गुरूच्या सेवेंतच मग्न असणारा दीपक दिसेल नि मग संभवामि युगे युगे चें व्रत चालविणारा परमात्मा नव्या मानवांत एखादा 'दीपक' निर्माण करील आणि 'वत्सा वर माग' ह्या वराला तो दीपक साऱ्या जगाकरतां एकच वर मागेल. 'देवाधिदेवा, सुख असो कीं दुःख असो, मी आणि माझं असं कोणालाच कांहीं ठेवूं नकोस, सगळं असूं दे तें आमचं, आपलं, आपल्या साऱ्यांचं.' आणि 'तथास्तू' असा वर देतांच वसुधातलावरील सर्व देव सुटलों म्हणून निश्वास टाकून परत स्वर्गस्थ होतील आणि ह्या एका वरांतच कदाचित उद्यांचा नवा मानव त्या सृष्टीनियंत्याचा खरोखर लाडका अंश ठरेल.

●●●

१८

# छंद

"कां हो! तुमच्या आवडीचा छंद कोणता?" हा प्रश्न एका प्रतिष्ठित व्यक्तीनें मला विचारतांच हंसूं आलें मुलाखत घेणाऱ्यानंच फक्त हा प्रश्न विचारायचा असतो अशी माझी समजूत होती नि मुलाखत देण्याइतका मी मोठा नाहीं ही खात्री असल्यानें मला हसूं आलें होतें. खरं म्हणजे मी त्यांच्या प्रश्नाला हंसण्यापेक्षां तेच माझ्या उत्तराला जास्त हंसले. "इसापनीति, पंचतंत्र, अरबी भाषेंतील सुरस गोष्टी, पोथ्या, पुराणें इत्यादि वाचण्याचा मला छंद आहे" असें म्हणतांच त्यांना धक्का बसला. "किती मागासलेले हो तुम्ही?" असा कांहींसा चेहरा करून ते माझ्याकडे पाहूं लागले. बहुधा त्यांची अपेक्षा अशी कीं, मी बर्नार्ड शॉ, हॅवलॉक एलिस, चेकॉव्ह, किंवा निदान गीता रहस्य, चटर्जी, टागोर अशी कांहीं नांवें घेईन नि त्याऐवजीं मी मात्र इसापनीतींतल्या सिंहाबरोबर, सशाबरोबर त्यांना गोष्टी करायला लावलं नि अरबी सुरस गोष्टींतील पक्षांचे स्वर ऐकायला लावल्याबरोबर माझ्या प्रतिष्ठित मित्राला धक्का बसला. माझ्या बौद्धिक पातळीविषयीं साशंक झालेल्या माझ्या

मित्रांनीं विषय बदलला नि आम्ही हवापाण्याबद्दल बोलूं लागलों. माझं मन मात्र अरबी भाषेंतील सुरस गोष्टींभोंवतींच घोटाळत होतं.

अरबी भाषेंतील कांहीं सुरस गोष्टी हा एकेकाळचा मोठा लोकप्रिय कथासंग्रह असे. त्यांतल्या हुस्न पऱ्या, ते जादुचे दिवे, जनावरांचे संवाद, आकाशवाणी इत्यादि सारा मसाला बघितला म्हणजे इसापनीतीपासून पोथ्यापुराणापर्यंत सर्व चमत्कारांची लयलूट असलेल्या कथांपेक्षांहि सुरस व 'मनोरंजक' ह्या गोष्टी वाटत. अर्थात् आज त्यांना किंमत नाहीं. मानवी मनाचं पृथःक्करण त्यांत नाहीं म्हणून कदाचित् त्यांची 'सद्दी' संपली असेल किंवा "गोष्ट आणि तात्पर्य" ह्या अनावश्यक चीजा त्यांत असतील म्हणून असेल, किंवा अशक्य भासल्या तरी सहज समजतील, मनोरंजन करतील आणि एवढंच नव्हे तर न कळत एखादा धडाहि शिकवून जातील, हा ह्या गोष्टींतला 'अवगुण' असल्यामुळें म्हणा, कदाचित् ह्यांना आज वाचक नाहीं. बौद्धिक पातळी इतरांच्या मानानीं उंचावलेली आहे, असं तुम्हांला स्वतःला आणि दुसऱ्याला पटवून द्यायचं असेल तर असल्या सुरस गोष्टी चारचौघांत तुम्हांला वाचतां येणार नाहींत किंवा तुम्हीं वाचतां असा उल्लेख करणं सुद्धां तुमचा बौद्धिक दर्जा थोडा कमी प्रतीचा आहे असें भासण्याचा संभव असल्यानं, तसला उल्लेख कटाक्षानं टाळणं हाच आजचा 'शिष्टसंप्रदाय' मानला गेला आहे.

ह्या सर्वांची जाणीव असूनहि व थोड्या फार अंशीं नव्या पिढीचं बुद्धिवादाचं ढोंग आणण्यांत यशस्वी झालेल्या माझ्यासारख्या सामान्य माणसाला अगदीं परवांच घडलेल्या एका गोष्टीवरून अरबी भाषेंतील सुरस गोष्टीची आठवण झाली. गोष्ट अगदीं साधी आहे. त्यांत प्रेमाचा त्रिकोण नाहीं, संघर्षाचा काटकोन नाहीं, कथातंत्राचा

षटकोन नाहीं, कीं समरप्रसंगाचे चढउतार नाहींत; पण एवढं सर्व नसलं तरी त्यांत मानसशास्त्रांतला आजहि सर्वांना मान्य असलेला सिद्धांत आहे. ह्याच सिद्धांताचं महत्व इंग्रजी लेखकांचीं नांवें व उतारे घालून विद्वत्ताप्रचुर म्हणून प्रसिद्ध झालेल्या लेखाचं सार आहे आणि आजहि नित्य अनुभवास येणाऱ्या वृत्तीचं हुबेहूब चित्रण आहे. रात्र झाली म्हणून एका धर्मशाळेंत कांहीं लोक विश्रांतीकरतां थांबतात. त्यांत एक कथेकरीबुवा असतात, एक भाजीवाला असतो व चार फड जिंकून आलेला एक पहिलवानहि असतो. इथपर्यंत सगळं अगदीं 'जानपदांतलं' असल्यामुळें सगळ्यांना पटण्यासारखंच आहे. प्रवासासंबधीं बोलत असतांना त्यांना एक पक्षी ओरडतांना ऐकूं येतो. त्याबरोबर सर्वांचं लक्ष तिकडे जातं नि पक्ष्याच्या मंजुळ शद्बांत ते रंगून जातात. ते ऐकतांच कथेकरीबुवांना इश्वराची करणी केवढी थोर आहे ह्याची जाणीव होते नि ईश्वरानें त्या पक्ष्याच्या तोंडांतहि "राम रहीम हजरत्" असे शब्द घातले असे आकाशाकडे बघत सांगूं लागतो. पण येथें त्याच्या बरोबरच्या प्रवाशांत मतभेद होतो.

ह्यावरून एक गोष्ट स्पष्ट होते कीं, 'मतभेद' हा केवळ महाराष्ट्राचाच एकमेव मक्ता आहे असं नाहीं. अरबस्थानांतल्या सुरस गोष्टींत तरी आहेच. भाजीवाल्याचं म्हणणं कीं तो पक्षी 'लसण मिरची अद्रक' असं म्हणतो आहे. पहिलवानाला मात्र दोघांचंहि म्हणणं खरं वाटत नाहीं आणि तो गाणारा पक्षी तालमीचं महत्व पटवून देत आहे नि म्हणूनच 'दंड, कुस्ती, कसरत' असें आर्जवून गात आहे असं त्या पहिलवानाचं प्रामाणिक मत असतं. नुसतं प्रामाणिक मत असून लोकांना पटत नाहीं तर त्याच्यामागें दोधांना स्वतःच्या शक्तीच्या जोरावर तें मत कबूल करायला लावणं त्याला शक्य असल्यामुळें तो पक्षी "दंड कुस्ती कसरत" असंच म्हणत आहे हें सर्वांनीं

कबूल केलं.

तात्पर्य कांहीं वेगळं सांगायला नकोच. अगदीं प्रत्यही अनुभवाला येणारं तात्पर्य आहे, पण जुन्या गोष्टींत शाळेंतील विद्यार्थी अंकगणिताच्या परीक्षेंत उदाहरण सोडवून झाल्यानंतर उत्तर अगदीं वेगळं पुन्हां लिहितात, अगदीं त्याच चालीवर ह्या गोष्टींतून "तात्पर्य" असा वेगळा मथळा देऊन लिहिलेलं असे. असल्या गोष्टींतून 'सूचकतेचा अभाव' हा दोष असला तरी तात्पर्य नाहीं असं म्हणता येणार नाहीं नि मानसशास्त्राचा सरळ नि सोपा सिद्धांत उगाच शद्बाचं भारूड न रचतां रुचेल अशा तऱ्हेनें सांगितला आहे, हेंहि नाकबूल करतां येणार नाहीं. प्रत्येक मनुष्याच्या मनाच्या ठेवणीवर अवलंबूनच तो आसपासच्या घटनांचा अन्वयार्थ लावत असतो हेंच आपल्याला नित्य अनुभवाला येत असतं.

गेल्या वर्षाचीच गोष्ट. मुंबईच्या एका डॉक्टर मित्राच्या दवाखान्यांत संध्याकाळचा आमचा अड्डा असे. आम्ही तिघं जण तीन वेगवेगळ्या व्यवसायांतले पण आमचं जमत असे. बहुधा वेगवेगळ्या व्यवसायांतले म्हणूनच कदाचित् जमत असेल, कारण आमच्यांत एक कवि, मी 'दहा ते पांच' नोकरींतला, नि तिसरा डॉक्टर; असा थाट होता. अगदीं त्या धर्मशाळेंतल्या तीन उतारूंसारखाच. दवाखान्याच्या समोरच हरकामी धंद्याचं एका कमिशन एजंटाचं दुकान होतं. तेथें कधी शाईचे खोके पडलेले दिसत तर कधीं तेलाचीं पिंपं दिसत, कधीं शहाबादी लाद्यांचे नमुने येऊन पडत, तर कधीं मंघारामच्या बिस्किटांचे खोके येऊन पडत. बोलून चालून कमिशन एजंटाचं दुकान तें. त्यांत 'अमुकच' असं सांगणं म्हणजे एखाद्या नवकाव्याचा अमकाच एक अर्थ आहे असा आग्रह धरण्यासारखं आहे, असं आमच्यांतल्या कविचं मत होतं. लागतील तेव्हां हव्या

त्या आकाराच्या रिकाम्या बाटल्या त्यांचेकडे मिळतात म्हणून डॉक्टर "कांहीं तरी प्रामाणिक उद्योग करून पोट भरतो आहे" असं म्हणत आणि शाई, तेल किंवा बिस्किटं रुपया बारा आण्यांचीच कां होईना विकत घेतांना आपणच त्याचा धंदा चालविण्यास मदत करीत आहोंत, असा अंधुकसा अहंकार माझ्या मनांत डोकावून जात असे.

बाबुलाल नांवाचा त्या 'फर्म'चा मालक मोठा खटपटी नि गोडबोल्या माणूस होता. पैसा दोन पैसे लोक बघतील अशा अंदाजानं तो नेहमी अंधळ्या पांगळ्यांना देत असे. एवढंच नव्हे तर अलिकडेच नव्यानं दिसणाऱ्या एका वेड्याला तर त्याच्याकडून 'एक पैशाचा' रतीबच होता म्हटलं तरी चालेल. फाटके कपडे, वाढलेली दाढी, तेल–कंगव्याशीं जणूं कधींच संबंध न आलेलें पिंजारलेले केस असा अगदीं ठराविक मेअकप्‌चा नाटकांतला वेडा होता तो. आम्हांला तो अगदीं जवळून बघायला मिळायचा नि किती वेळ तरी, कारण दवाखान्याच्या बाहेरच्या बाजूलाच एक पोस्टाची पेटी होती नि हा वेडा कांहीं तरी लिहून आणायचा. कोऱ्याच लिफाफ्यांत तें भरायचा नि तिकिट न लावतांच अर्थात् त्या पेटींत टाकायचा. तासन् तास समोरच्या किंवा आमच्याकडच्या फूटपाथवर गुडघ्यांत मान घालून बसून राहायचा.

प्रथम प्रथम तर हा नवीन वेडा बोलण्याचा मुख्य विषय होता, पण नंतर कारुण्याच्या भावनेनं आम्हीं सगळे गहिंवरून आल्यासारखे झालों होतों. आमच्या डॉक्टर मित्रानं जाड पुस्तकांतले जाड जाड ग्रीक लॅटीन शब्द घालून वेडाची मीमांसा आम्हांला उताऱ्यासकट म्हणून दाखवली होती. डहाणूरोडच्या पुढेंहि गेलेले नसतांना अमेरिकेंत असल्या रोग्यांची कशी परीक्षा करतात नि त्यांना कसे बरे

करतात ह्याचं थोडं त्यांच्या अभ्यासामुळें, जास्त स्वतःच्या कल्पनेवर व मुख्यतः आमच्या अज्ञानाच्या जोरावर मोठ्या अधिकारवाणीनें सांगत असत. ह्या वेडाचं कारण काय असावं, असा प्रश्न निघतांच 'बिचाऱ्याचं दैव खोटं' म्हणून मीं कपाळाला हात लावून म्हणत असे, तर असल्या मानवी हालचालींचा, तरल भावनांचा, सूक्ष्म अविष्कारांचा साक्षात्कार त्याला एकट्यालाच झालेला आहे असा आग्रह धरणारा नवकवि त्याचं कारण शोधूं लागून तें सांपडल्याचा दावा सांगूं लागे. माझ्या कविमित्राचं म्हणणं असे कीं, हा प्रेमांत पडला असावा. त्याच्या प्रेयसीनें दुसऱ्या कोणाशीं लग्न केलें असावें नि बिचारा निराश होऊन वेडा झाला असावा. त्याच्या अंतःकरणाला पीळ पाडणाऱ्या सांगण्याच्या पद्धतीवरून एक मात्र निश्चित कळलं कीं काव्याचा, प्रेमाचा नि वेडाचा फार जवळचा संबंध असावा, नाहींतर त्या वेड्याच्या चाळ्यांत त्याचं वेड लागण्याचं कारण शोधून काढण्याचं वेड प्रेम आणि निराशा एवढ्याशा धाग्यावरच विसंबून आमच्या कविमहाशयाला लागलं नसतं. पोस्टाच्या पेटींत टाकलेलीं पत्रें म्हणजे त्यानें आपल्या मनांतील भाव गुंफून आपल्या प्रेयसीला मारलेली आर्त हांक आहे, त्याचे फाटलेले कपडे हे त्याच्या तशाच विदीर्ण झालेल्या हृदयाचं द्योतक आहे, त्याची वाढलेली दाढी आणि न विंचरलेले केस हे त्याच्या विरहाचं मूर्तिमंत दुःखद प्रतीक आहे, असं तो अगदीं अलिकडच्या "काव्य गायनाच्या" चालीवर मला आणि माझ्या डॉक्टर मित्राला सांगत असे.

डॉक्टर वेडाचं कारण त्याच्या शरिरांतर्गत निरनिराळ्या रोगाकडे, अनुवंशिकतेकडे लावीत असे, तर माझा कविमित्र प्रेम आणि प्रेमाची निराशा ह्या दोन पायऱ्यांवर उभा राहून पोस्टाच्या पेटीच्या मदतीनें प्रेमभंग नि प्रेयसीचा विरह एवढंच काय तें कारण असं अगदीं ओरडून

ओरडून सांगत असे. माझ्या दृष्टीनें हा सारा दैवाचा खेळ होता. कोणास ठाऊक कदाचित् बिचाऱ्याची नोकरी सुटली असेल, नोकरीच्या शोधांत असूनहि नोकरी न मिळाल्यामुळें आजारी आईला औषधाकरतां मदतहि धाडूं शकला नसेल. कोणास ठाऊक कदाचित् अतिशय प्रिय व्यक्तीच्या मृत्यूनेंहि असा भयंकर परिणाम झाला असेल.

थोडक्यांत म्हणजे आम्ही तिघंहि धर्मशाळेंतल्या तीन प्रवाश्यांसारखेच स्वतःच्या मनाच्या ठेवणीप्रमाणें पक्षाच्या आवाजाचा अर्थ लावणारे. समस्या वेगळ्या असल्या तरी मनाची बैठक तीच. जो तो खरं म्हणजे आपल्याला पटेल असाच कुठल्याही घटनेचा आपण अन्वय आणि अर्थ लावत असतो नि तसं करत असतांना प्रामाणिकपणें निदान आपल्या पुरतं तरी आपल्याला असंच वाटतं असतं कीं आपण म्हणतों तेंच खरं, तेवढंच खरं आणि असं जेव्हां जेव्हां अनुभवास येतं तेव्हां त्या धर्मशाळेंतल्या उतारूंची नि त्या पक्षाची आठवण होते नि वाटतं पक्षी बिचारा आपल्याला रुचेल तें गात होता आणि ते तीन प्रवासी नेत्याच्या अभिनिवेशानं "आमचंच खरं", "आमचंच खरं" असं सांगत होते.

अरबी भाषेंतील सुरस गोष्टींतून किंवा पोथ्या पुराणांतून अशा कठीण प्रसंगीं आकाशवाणी होत असे नि त्यामुळें उपस्थित झालेल्या कूट प्रश्नांचं खरं उत्तर लोकांना सांपडत असे, पण दुर्दैवानं आज तशीं उत्तरं मिळत नाहींत नि प्रश्न मात्र दिवसें दिवस वाढत आहेत. मला वाटतं मला ही पूर्वींची, आज फारशी लोकप्रिय नसलेली, एवढेंच नव्हें तर त्याचं वाचन, श्रवण किंवा चिंतन बुद्धिमत्तेच्या हलक्या थरांचं लक्षण समजली जाणारी इसापनीति, पंचतंत्र, सुरस गोष्टी, पुराणं वाचायला फार आवडतं. प्रत्यक्ष आयुष्यांत अनुभवतां न आलेली आकाशवाणी त्यांत आहे, गर्वाचा नाश त्यांत आहे,

सत्याचा विजय त्यांत आहे, श्रद्धेचं अढळ स्थान त्यांत आहे, पराक्रमाचा पुरुषार्थ त्यांत आहे. मानवी जीवनाचे पैलू नि पैलू त्यांत आहेत आणि हें सारं अगदीं कुठल्याही प्रकारचें शब्दांचें अवडंबर न माजवितां त्यांत आहे नि म्हणूनच कुणीही कितीही हंसलें तरी आजही इसापनीति, पोथ्या, पंचतंत्र पुराणें नि सुरस गोष्टी इत्यादि मला वाचायला आवडतात नि तोच माझा छंद आहे.

●●●

१९

# कंटाळा

गेल्या नाताळांतलीच गोष्ट. लांबचा प्रवास म्हणून मुंबईच्या प्रशस्त बुकस्टॉलवरून कांहीं पुस्तकें खरेदी करूनच मी गाडींत बसलों. त्यांत एक हेन्री थरो नांवाच्या एका अमेरिकन तत्त्वज्ञाचेही पुस्तक होतें. संपन्न अमेरिका खंड सुखवादी तत्त्वज्ञानाचा भोक्ता आणि म्हणून तसंच कांहींसं त्यांत असणार असं मला वाटलं नि सहज त्यांतलं एक पान उघडलं. त्यापानावरच निबंधाचा शेवट होता. "हें जग सोडतांना मला कांहींच पश्चात्ताप होत नाहीं, वाईट वाटत नाहीं." अशा अर्थाचं तें वाक्य होतं.

इतका कसला कंटाळा आला होता ह्याला जीवनाचा? उगाच हें पुस्तक आपण विकत घेतलं असं एकदम मनाला वाटलं. आवडीनं एखादी गोष्ट वाचायला घ्यावी आणि सुरवातच कुणाच्या "कायमच्या शेवटापासून" झालेली असावी तसं झालं मला. पुस्तक परत करायचाहि विचार माझ्या मनांत आला, पण एकदां विकलेली वस्तू पुन्हां परत घेतली जाणार नाहीं, असा सर्वत्र अलिखित नियम असल्यानें परत स्टॉलवर जाण्यांत अर्थ नव्हता आणि त्याशिवाय हें पुस्तक विकत

घेण्यांत आपली चूक झाली हें जाहीरपणें कबूल करण्यास मन तयार नव्हतं.

पुष्कळदां माणसाचा अहंकारच मला वाटतं त्याला चांगलं वागायला शिकवतो आणि त्याच शिक्षकानं मलाहि परत त्या पुस्तकविक्रेत्याकडे जाण्यापासून परावृत्त केलं होतं. माझ्या डब्याकडे जात असतांची दृश्यें अगदीं नेहमींचीच दिसणारीं होतीं. स्टेशनवर पोचवायला आलेल्या लोकांत कितीतरी प्रकार होते. इलाज नाहीं म्हणून आलेलीं, ऑफिसरला पोंचवायला आलेली, चेहऱ्यावर उसनं हास्य आणलेलीं पण मनांत बहुधा शिव्या देणारी, प्लॅटफॉर्मवरचं वड्याळ नेमकं हळू चालतं असं वाटणारी मंडळी होती तशीच गाडी लेट झाली तर बरं तितकाच जास्त आपल्या आवडत्या व्यक्तीबरोबर वेळ घालवायाला मिळेल, अशा विचाराच्या लोकांचीही गर्दी होती.

सूर्योदय आणि सूर्यास्त बघण्याचा जसा कोणाला कधींच कंटळा येत नाहीं तसंच मला वाटतं रेल्वे स्टेशनचं असावं. केव्हांही प्लॅटफॉर्मवर जा, वेळ कसा निघून जातो हें कळत नाहीं. हजार तऱ्हेचे, हजार प्रवृत्तीचे नि हजार प्रकारचे लोक तुम्हांला दिसतील. मागें एका चित्रपटांत ह्या जगाची तुलना रेल्वे ट्रेन् बरोबर केलेली असें एक गाणें होतें. मला वाटत त्या पद्य रचणाऱ्याला खरोखरच आयुष्याचा अर्थ कळलेला होता. आपल्या आयुष्यांतील प्रवासाची तुलना गाडीच्या प्रवासाबरोबर केलेली मला आठवते. अर्थात् प्रवासांतली त्रेधा, होणारा त्रास, खर्च, खाण्यापिण्याचे हाल, हें सर्व जीवनांत प्रत्यहीं अनुभवास येणाऱ्यांपैकीं असल्यानें नव्या अर्थानेंही एक प्रकारचें साम्य जाणवते. पण तरीही हें जग सोडतांना मला दुःख होणार नाहीं असं म्हणणाऱ्या माणसाची मला कींव येते.

मला वाटतं, ह्या माणसाला जीवन कसं जगावं हें कळतच

नाहीं. हा बहुधा, त्या जन्मभर कपाळावर आंठ्या घालून जगणाऱ्या माणसापैकीं असावा. असल्या व्यक्तींची चिकाटी मात्र जबरदस्त असते. जन्माला येतांना ते जे रडत येतात, ते जन्मभर तेवढीच क्रिया करतात आणि असंच एखादं जीवनाविषयीं कंटाळवाणं, रडकं, निराशेचं, काळोखाचं, कण्हणारं वाक्य लिहून ठेवतात. मला वाटतं त्यांच्या चष्म्यांतून सूर्योदयाऐवजीं सूर्यास्तच त्यांना दिसत असावा, बांधलेल्या मनोऱ्यांऐवजीं जुनाट खिंडारं दिसत असावी, विजयस्तंभाऐवजीं नामशेष झालेल्या वस्तू भेडसावित असाव्या, रेशमी मखमली स्पर्शाहूनहि मृदू असलेल्या गोजिरवाण्या बालकाच्या स्पर्शाऐवजी थिजलेल्या हातांचा, वाढलेल्या नखांचा नि सुरकतलेल्या कातडीचा स्पर्श ‘ गार ’ करीत असवा. हिरवा चुडा नि हिरवी साडी नेसलेल्या तेल-हळदीनं न्हालेल्या सलज्ज नववधुऐवजीं पांढऱ्या कपाळाच्या, काळजीनं गोंदलेल्या नि जीवनाला विटलेल्या गतधवा दिसत असाव्या, गोकुळासारखं भरलेल्या नि मुला-मुलींनी नटलेल्या कुटुंबाऐवजी काळोखांतली, अंधाऱ्या खोलींतली, काडी ओढून धूर ओकणारी चिमणी लावणारी, एकाकी जीवन कंठणारी म्हातारीच दिसत असावी. हिरवीगार पालवी फुटलेली वनराजी दिसायच्या ऐवजीं पर्णहीन शुष्क वृक्षच दिसत असावेत, मंगलवाद्यांचे सुरेल स्वर कानावर पडायच्या ऐवजीं ह्यांच्या कानावर तुटलेल्या तारांचे, बद्द भोपाळ्यांतले बदसूर स्वर कानांत घुमत असावेत, अनंत रत्नांनी भरलेली वसुंधरा त्यांना काळ्या खडकाच्या रूपानं दिसत असावी, शांत, उपकर्त्याच्या अक्षय ओघाच्या नदीच्या पात्राऐवजीं, कांठावरच्या शेवाळ्याचीच भीति जाणवत असावी, कोकिळांच्या मंजूळ गानाऐवजी कावळ्याची काव काव ताप देत आसावी, आणि म्हणूनच आयुष्याची भैरवी आळवायची सोडून उदासीनतेच्या कालिंगड्याचे नि विरहाच्या

जोगियाचे आर्त सूर भरलेल्या कंठांतून असले महाभाग काढतात आणि त्याच चालीवर बहुधा लिहून टाकत असावेत ते 'हे जग सोडतांना मला कांहींच होत नाहीं, कांहींच दुःख होत नाहीं.' त्यांच्या दृष्टीनें हें जग म्हणजे मिथ्या आहे, नश्वर आहे, थोड्या वेळापुरती वस्तीची धर्मशाळा आहे, माया आहे, आणि म्हणून कशाला अभिलाषा करायची, कसली महत्त्वाकांक्षा मनांत बाळगायची नि कशाला उगाच "आपलं आपलं", "माझं" म्हणून कवटाळून बसायचं? असल्या निराशेच्या तत्त्वज्ञानांतूनच मी विकत घेतलेल्या पुस्तकांतल्या निराशाजनक वाक्याचा उगम असतो.

वास्तविक अगदीं थोडक्या काळाकरतां कां होईना; ह्या जगांत नव्हे धर्मशाळेंत रहावयाचं असलं तरी दुःखी कष्टी होऊनच राहिलं पाहिजे, उसासे टाकूनच जगलं पाहिजे असं कां आहे? खरं म्हणजे जीवन सुखी नाहीं नि दुःखीहि नाहीं, तुम्हीं कसं तें मानतां त्यावर आहे. मला वाटतं जीवन हें अमृतानं अर्ध्या भरलेल्या पेल्यासारखं आहे. "माझा ग्लास अर्धा रिकामा" म्हणून कांहीं लोक आंबट चेहरा करून, डाव्या हातांतल्या ग्लासवर उजव्या हाताचा तळवा झांकून रडत बसतात. अमृताची गोडी तर त्यांना कधीं लाभत नाहींच पण समाधानाचं सुखहि त्यांना कधीं लाभत नाहीं. माणसाच्या जीवनाच्या तत्त्ववेत्त्यांनी, साहित्यिकांनी, विचारवंतांनी, साऱ्यांनी निरनिराळ्या व्याख्या केल्या. जीवन ही एक लढाई म्हणून कोणी चिलखत, जिरेटोप घालून ह्या लढाईंत उतरला तर जीवन हा एक महासागर आहे म्हणून न बुडणारी बोट शोधण्याच्या काळजींत पडला. जीवन म्हणजे माया आहे, अंधार आहे, काळोख आहे म्हणून कोण स्वतःला पेटवून घेतो तर जीवन म्हणजे सुखदुःखाच्या पाठशिवणीचा खेळ समजून, ऊर फुटेतों धांवत सुटतो. जीवन म्हणजे उसाश्याचं,

अश्रूंचं उगमस्थान म्हणून कोणी टॉवेल डोळ्याला लावून बसतो तर, जीवन म्हणजे नश्वर जगांतला बाहुला-बाहुलींचा खेळ असं समजून उगाच वरच्या बोलवण्याची वाट पहात बसतो. जीवन ही एक रंगभूमी आहे म्हणून कोणी उगाच बराचसा रंग चोपडून बसतो, तर दिव्याच्या झगझगाटानें पडदा उघडावयाच्या आधींच डोळे दिपून गेलेला एखादा, जीवनाच्या रंगभूमीकडे कायमची पाठ फिरवतो, जीवन म्हणजे अज्ञानी माणसानं अज्ञानांतच श्वासोच्छ्वास घ्यायची कांहीं दिवसांपुरती धर्मशाळा म्हणून कोणी स्वतःचं मोजकं सामान घेऊन कोपऱ्यांतली जागा अडवतो तर जीवन म्हणजे पत्त्याचा बंगला आहे असं समजून प्रत्येक पाऊल आवाज न करतां टाकतो, घाबरत घाबरत भीतीनं जगतो तर जीवन म्हणजे आनंद, जीवन म्हणजे वसंत, जीवन म्हणजे अखंड यौवन, जीवन म्हणजे अखंड संगीत अशी जीवनाची रेशमी, गुलाबी, मखमली व्याख्या करणारा झिंगेपर्यंत ह्या आनंदांत बुडून जातो.

खरं म्हणजे ह्यांपैकीं कुठलीच खरी व्याख्या नाहीं. जीवनाची व्याख्या करणंच मुळीं शक्य नाहीं. जीवन जगण्याकरतां आहे, उगाच व्याख्या करण्यांत घालवलं कीं आमच्या अमेरिकन तत्त्वज्ञासारखं कांहीं तरी होतं आणि मग हे जग सोडतांना मला यत्किंचितहि दुःख होत नाहीं अशा चालीचं तत्त्वज्ञान जन्माला येतं. कसला कंटाळा आलेला असतो अशा व्यक्तींना हेंच मला कधीं कळत नाहीं. खरं म्हणजे, "अगदीं कंटाळवाणा वेळ जातो बुवा आमचा" असं कोणी म्हटलं किंवा "कंटाळा आला बुवा" असं अगदीं तोंडभर जांभई देत चुटक्यांच्या तालांत म्हटलं म्हणजे मला हंसू येतं! नुसतं खिडकीबाहेर डोकावलं तरी निळं आकाश, ढगाच्या हालचालीनं रंगरूप बदलणारं आकाश, निसर्गानं माणसाला फुकट वाटलेला

खजिनाच जणूं! आणि तो फुकट आहे म्हणूनच बहुधा कधीं आपलं त्याकडे लक्ष जात नसावं नि त्याच्या सानिध्यानं तासन्‌तास घालविणाऱ्या तत्त्ववेत्त्या रस्किन्‌चं सुख आपणांस पारखं झालं असावं, वृक्षवेली, तुडुंब जलाशय, शांत आणि उग्र स्वरूप धारण करणारा महासागर, तपस्व्यासारखे हजारों वर्षं समाधी लावून बसलेले डोंगर, घाम गाळायला लावणारा मित्र रवी आणि वसुंधरेला हिरव्या शालूनं नटविणारी पर्जन्यवृष्टी एक ना दोन, निसर्गानं आपल्यापुढें मांडून ठेवलेलं हें ताट उगाच व्यथित मनानं दूर ढकलायचं आणि निर्जीव जिणं जगायचं तरी कशाला? निसर्गाबरोबर गुजगोष्टी करण्याइतकं समजा वेड नसलं तरी आपल्या भोंवतालीच काय कमी भांडार आहे? एवढंच कशाला हें निराशेच्या रंगानं रंगलेलं पुस्तक मी हातांत घेऊन माझ्या डब्याकडे येतांना जीवनांतल्या कितीतरी कडा दिसल्या.

मोठ्या अधिकाऱ्याला पोहोंचवायला आलेली त्याच्या साध्या विनोदालाहि तोंडभर हास्यानं साथ देणारी स्वार्थी नोकरशाही होती. कॉलेजशिक्षणाकरतां जाणाऱ्या मुलाला निरोप द्यायला आलेलीं कुटुंबांतील मंडळी होती. कायमचा सुखदुःखाचा वाटेकरी मिळविण्याकरतां निघालेली वऱ्हाडी मंडळी होती. कामानिमित्त बाहेरगांवीं जाणारा प्रियकर, नि आतांपासूनच विरह तोंडावर दिसणारी विरहिणी होती. पैलतीरीं नेत्र लागलेल्याहि पुण्यसंचयाच्या दृष्टीनें वाटचाल करणाऱ्या व्यक्ती होत्या. दूर कोठेंतरी दूर जाऊन एकमेकांत कायमचं मिसळण्याकरतां स्वतःच्या आनंदांत जगालाहि विसरून जाण्याकरतां प्रवासास निघालेली मधुचंद्रीं युगुलं होतीं आणि ही सारी माझ्या बाजूची होती. हे सारं ती करत होती भविष्याकरतांच, आनंदी जीवन जगण्यासाठींच, जीवनाचा पुरेपूर आस्वाद घेण्यासाठींच! उद्यांच्या सोयीसाठींच,

आणि म्हणूनच वाटलं मला उगाचच तें पुस्तक घेतलं! प्रवास संपेपर्यंत तें मी उघडणार नाहीं; कदाचित् कधींहि उघडणार नाहीं. एका वाक्यानंच एवढं निराशेचं जाळं टाकलंन् न जाणो आणखी कांहीं असंच त्यांत असलं तर आणि इतर कसला कुणालाहि कंटाळा आलेला मला आवडत नसला तरी हें पुस्तक उघडायचा मात्र मला कंटाळा आला आहे आणि तो कंटाळा मात्र अगदीं कायमचा. प्रवासांत वाचनाचं साहित्य संपलं तर मी गाडी थांबल्यावर प्लॅटफॉर्मवर हिंडून येईन आणि प्रत्येक वेळां मला जीवनाचा नवा धडा शिकायला मिळेल नि त्याच्या चिंतनांत कंटाळाहि मागें गेलेल्या स्टेशनाप्रमाणेंच दिसेनासा होईल.

•••

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३५६८२ वि: ...
क्रमांक ...९.४११.० नों: दि: ३०/११/६३

२०

# कुर्यात् सदा मंगलम्

मला नेहमीं वाटतं कीं वर्तमानपत्राची खरी गोडी माणसाला वाटते ती त्याच्या नाविन्यपूर्ण मथळ्यामुळंच! आणि आकर्षक मथळ्याखालीं "असें कळतें कीं" अशी अध्याहृत सुरुवात करून तिखटमीठ लावून लिहिलेल्या बातमीमुळंच! नाहींतरी सामान्य माणसाच्या मनाला, कुवतीला पेलणारं निदान आजच्या तरी वर्तमानपत्रांत कांहीं नसतं. कुठलंहि वर्तमानपत्र घ्या. त्यांत एकाहून एक सरस गतीनं धावणारीं विमानं, स्फोटक सामुग्रीच्या भयंकर बातम्या, मोठाले अपघात, भल्या मोठ्या सैन्याच्या हालचाली आणि त्याहूनहि भयंकर म्हणजे पृथ्वी अपुरी पडली म्हणून कीं काय विश्वमालेच्या बिचाऱ्या चंद्रासकट इतर ग्रहांवर स्वाऱ्या. पूर्वीं 'चंद्रावर स्वारी' हा मथळा बाळगोपाळांच्याकरितां गोष्टी लिहिणाऱ्या लेखकांकरतां राखून ठेवलेला होता; पण आज वर्तमानपत्रांचा तो कायमचा मथळा होऊन बसला आहे आणि शाळेंत असतांना वाचलेल्या महम्मूद गझनवीच्या दहाव्या अकराव्या स्वारीप्रमाणें बिचाऱ्या चंद्रावरहि स्वाऱ्या होऊं लागल्या आहेत. केवळ कवींच्या नि विरहाग्नीनं पेटलेल्या प्रियकरांच्याकरितां नि सुकुमार हातांनीं प्रतिपदेला ओवाळण्याकरितां राखून ठेवलेल्या चंद्रावर आजचं वैज्ञानिक जग रॉकेट्स नि स्पुटनिक्

फेकतं आहे. कुठल्या विरहिणीच्या शापाचीं फळं भोगतो आहे कुणास ठाऊक! ह्या रॉकेट स्पुटनिकाच्या बातम्या, दोन खोल्यांत राहणाऱ्या, चार कुटुंबियांना पोसणाऱ्या नि नोकरी देणाऱ्या मालकाला परमेश्वर समजणाऱ्या सामान्य माणसाला कशा झेंपायच्या! नि म्हणूनच तो ह्या साऱ्या भयंकर बातम्यांना कंटाळून एखादी, हलकासा गोड धक्का देणारी बातमी वाचून समाधान मानतो व त्या अज्ञानांतल्या समाधानांत एकाहून एक हिंसक बातम्या विसरून जातो. थोडसंहि सुख—मग तें तात्पुरतं कां होईना—पण माणसाला त्याचीं दुःखं विसरायला लावतं हा खरंच फार मोठा वर आहे. नाहींतर कदाचित् आजच्या ह्या भयंकर बातम्यांच्या जगांत हंसरा चेहरा दिसलाच नसता.

परवांचीच गोष्ट! एका पुढाऱ्याच्या खुनाच्या फसलेल्या प्रयत्नापासून ते ग्रहगोलांचं परिभ्रमण करणाऱ्या स्पुटनिकापर्यंत सर्व बातम्या वाचून झाल्यानंतर माझी दृष्टि खिळली ती एका गंमतीच्या मथळ्यावर. "वयाच्या नव्वदाव्या वर्षीं बोहल्यावर चढणारा तरुण" असा तो मथळा होता. वास्तविक सबंध जगाचं भवितव्य ठरविणाऱ्या एकाहून एक महत्त्वाच्या बातम्या वाचल्यानंतर, ह्या पोरकट, कांहीं अंशीं पाचकळ बातमीकडे लक्ष जावं नि मन त्याभोंवतींच रेंगाळत राहावं हें थोडं विचित्रच! पण मनाचे खेळ पुष्कळदां लहान मुलांपेक्षांसुद्धां जास्त लहरी असतात हेंच खरं.

नव्वद वर्षांच्या पांढऱ्या नि दन्तहीन प्रौढत्वांतही निजशैशवास जपणाऱ्या तरुणाबद्दल ती सारी बातमी होती. "लग्न कर्तव्य आहे" अशी स्वतःच्या जन्मतारखेसकट त्यानं जाहिरात देतांच शंभरावर अर्ज आले होते आणि त्यांत षोडशवर्षीय कन्यकांपासून वय झालेल्या सर्व तऱ्हेच्या स्त्रियांचे अर्ज होते. ही विचित्र बातमी वाचून, 'शारदे' तल्या आईबापावर नि अशाच इतरांवर आपण उगाच तर आजवर आग पाखडली नाहीं ना अशी शंका मनांत डोकावून गेली. तो बोहल्यावर

चढणारा वृद्ध दिसूं लागला नि अत्र्यांच्या एकट्या अवधूतलाच लग्नाच्या बेडीचं आकर्षण नव्हतं तर 'पैलतिरी नेत्र' लागलेल्या वयोवृद्धालाहि मुंडावळ्यांची हौस होती नि त्याची ती हौस फेडायला, जणूं नोकरीकरतां अर्ज यावे तसे भराभर अर्जहि आले होते. "**कधीं करीशी लग्न माझें। तुज ठावे ईश्वरा**" ह्या चालीवर झुरणाऱ्या, त्याच्या त्या लग्नाच्या बायकोच्या, मुलाबाळांच्या नि कानफुटक्या कपाच्या, अवधूतच्या संसारचित्राला उगाचच हंसलों ह्याची जाणीव होते.

विवाहाविरुद्ध कुणीहि किती ओरड केली तरी "**कुर्यात् सदा मंगलम्**" ह्या शद्बांचं आकर्षण आत्म्याप्रमाणंच अमर आहे. बर्नार्ड शॉच्या 'लग्न म्हणजे पद्धतशीर, सनदशीर वेश्यावृत्ति' ह्या अभद्र व्याख्येपासून तें 'लग्न म्हणजे दोन जीवांचं, दोन विश्वांचं अभेद्य मीलन आहे' ह्या मंगल व्याख्येपर्यंत ज्यानं त्यानं मनाला येईल तें लिहिलं. एकानं लग्नाला व्यापारी पेठेंत नेऊन 'लग्न म्हणजे एकाच्या फायद्याकरितां दोघांनीं केलेला उपद्व्याप' असं म्हटलं तर ड्यूमास-सारख्या लेखकानं लग्नाला तुरुंगांतील बेडीची उपमा देऊन 'ही लग्नाची बेडी इतकी जड असते कीं तिला पेलायला एकाऐवजीं दोन व्यक्ती लागतात' असा निवाडा दिला. मीनँडरनें 'विवाह म्हणजे पुरुषानें स्वतःच स्वतःवर ओढवून घेतलेली आपत्ति' असं वर्णिलं तर भवभूतीनं देवलांच्या '**लग्नगांठ ही पडे एकदां न ये पुन्हां कधीं ती सोडवितां**' ह्याविरुद्ध स्वतःचं मत नोंदवून 'लग्न ही सुरगांठ असून अपत्य हीच विवाहाची निरगांठ आहे' असा सिद्धांत मांडला. तिसऱ्यानं 'Hanging and wiving go by destiny' असं म्हणून विवाहाला देवाच्या ओटींत घातलं तर 'विवाह म्हणजे स्त्रीला करतां येण्यासारखी एकमेव गोष्ट' असं लिहून स्त्रीच्या कर्तृत्वाचा दर्जा खालीं आणला. सी. ई. एम्. जोड सारख्या लेखकानं 'लग्न म्हणजे निसर्गानं

निर्माण केलेल्या परस्पर आकर्षणांतून उद्‌भवणारा एक परिणाम ' अशी त्याची कार्यकारणपरंपरा सांगून वैज्ञानिक सिद्धांतापलीकडे त्याला महत्त्व नाहीं असं सूचित केलं, तर एकानं 'पुरुषांच्या भांडवलावर स्त्रियांनीं चालविलेली संस्था म्हणजे विवाह ' अशी अर्थशास्त्रीय व्याख्या केली.

ओ. हेन्रीसारखा मिष्कील लेखक 'ह्या संसाराच्या लोकप्रिय नाटकांत, लग्नांत, नायकाचा मृत्यु विवाहाचें दिवशींच झालेला असतो ' असं म्हणतो. मार्क ट्वेन वयोमानाचं मोजमाप लावून 'प्रत्येक माणूस विवाहाच्या दिवसापासून स्वतः स्वतःलाच सात वर्षे जास्त वयाचा भासूं लागतो ' अशी धोक्याची घंटा वाजवतो. मॉंटेनसारखा विचारवंत सुद्धां 'विवाह सुखकर व्हावयाचा असल्यास बायको आंधळी आणि नवरा ठार बहिरा हवा ' असं चिडून म्हणतो तर एखादा देशभक्त 'सुखाच्या शोधांत स्वतःचं स्वातंत्र्य गमावून बसलेला पुरुष म्हणजे नवरा ' अशी पराभूत व्याख्या करतो. पण खरं म्हणजे कुणीहि, कितीहि सांगितलं, अगदी बजावून सांगितलं, लिहून ठसवलं किंवा विनवून समजावलं तरी लग्न ही संस्था नितांत लोकप्रिय आहे आणि तिचं अमर्याद आकर्षण कुणालाहि नाकबूल करतां येणार नाहीं.

एवढंच कशाला, पण विवाहाचं आकर्षण एकदां करूनहि थांबत नाहीं असा इतिहासाचा आणि वर्तमानाचाहि दाखला आहे. समंजसांची, विचारवंतांची, अलौकिक व्यक्तींची मजल दुसऱ्या, तिसऱ्या नि चौथ्या लग्नापर्यंतहि गेली आहे ह्यावरून हेंच सिद्ध होत नाहीं का? डॉ. जॉन्सनसारखा विचारवंत 'दुसरं लग्न म्हणजे अनुभवावर आशेनें मिळविलेला विजय ' असं बजावतो तर डच भाषेंतील एक लोकप्रिय म्हण 'एकवेळ विवाह करणं कर्तव्य आहे, दुसरे वेळीं मूर्खपणा व तिसरे वेळीं वेडेपणा ' असें तुणतुणें वाजवितें तरीहि हा आवडीचा मूर्खपणा नि हवासा वाटणारा वेडे-

पणा करणारे अनंत लोक आपल्या भोंवतीं आहेत, ह्याची पूर्ण जाणीव असते म्हणूनच कीं काय व्यवहारी मनुष्य उगाच उठल्या-सुटल्या विवाहाविरुद्ध हाकाटी करण्यापेक्षां जोडीदाराची निवड करतांना ‘डोळ्यापेक्षां कानांनीं निवड करा’ असा सल्ला देतो तर दुसरा ‘ओंठ पाहून लग्न करण्यापेक्षां त्या ओठांतून शब्द कसे निघतात हें पहा’ असें सुचवितो. तिसरा प्रेयसीच्या कुटुंबाची कुळकथा वाचायचा उपदेश करतो तर आणखी एखादा “विचारसाधर्म्य हवें; विकारसाधर्म्य नको” असला जड विचार डोक्यावर आदळतो.

हा सगळा फुकाचा वैचारिक उहापोह चालू असतानांच जणू, निसर्ग मात्र “स्त्री” ह्या परमेश्वराच्या प्रत्यक्ष मूर्तीलाच नवीं नवीं लेणीं नि नवीं नवीं शस्त्रें बहाल करीत असतो नि बिचारा पुरुष स्वतःला बुद्धिजीवी म्हणवून घेण्याच्या दाव्यांत विवाहाभोवतीं उगाच शब्दाचें फाजील अवडंबर रचून इतक्या नाजूक, मंगल नि पवित्र विषयाची वैज्ञानिक चिकित्सा करीत राहातो. खरं म्हणजे ‘स्त्री’ ही त्या थोर कलावंताची–विश्वकर्म्याची–फार महान् कलाकृति आहे. ह्या कलाकृतीची जगांत आवृत्तीहि फार मोठी आहे आणि म्हणूनच प्रत्येकाजवळ स्वतःची प्रत हवीच ह्या रसिकाला साजेशा विचारानं त्या नव्वद वर्षांच्या तरुणानं नितांतसुंदर, प्रेमानं न्हालेली नि त्यागानं नटलेली प्रत मिळविण्याकरितां “लग्न कर्तव्य आहे” ची नौबत झडविली. त्या हांकेला किती जणींनीं ‘ओ’ दिली हें तिखटमीठ लावून सांगणारा व त्यांच्या वयाची आंकडेवारी देणारा वर्तमानपत्राचा बातमीदार विचारवंतांना कसा वाटतो ह्याची मला कल्पना नाहीं. पण सामान्य वाचकाला मात्र सैन्याच्या हालचाली, स्फोटक सामुग्रीच्या भयंकर बातम्या, सत्ताधीशांचीं कारस्थानें, स्वार्थाकरतां विकलेले शब्द, धर्म नि विचार ह्या सगळ्या बातम्यांच्या उग्र नि तापट वातावरणांत, वयाच्या नव्वदाव्या वर्षीं बोहल्यावर चढणाऱ्या तरुण रसिकाची बातमी थंड हवेच्या झुळुकीसारखी वाटते हें मात्र निश्चित.

●●●

REFBK-0013123